Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in
मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज
# महासागर
e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com
* वर्ष ५४ * अंक २१० * * नागपूर *
गुरुवार, दिनांक ०७ नोव्हेंबर २०२४ | ८ पाने • किमत रु. २/-+ वितरण खर्च रु. १ = एकुण ३ रु.)

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018
महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

अग्राग्रलेख

## खरीखरी...

# ट्रम्पचा एक्का

आज अपेक्षेप्रमाणे अमेरिकेच्या अध्यक्षपदाचा निकाल लागला. त्यामध्ये आपल्या तथाकथित भारतीय वंशाच्या कमलाबाईंचाही निकाल लागला. अमेरिकेच्या निवडणुकीत पहिल्यांदा हिलरी क्लिंटन यांना ट्रम्प यांनी हरवले होते. हिलरी क्लिंटन या त्यापूर्वीच्या राष्ट्राध्यक्षांच्या पत्नी होत्या. हा संदर्भ खूप महत्त्वाचा आहे. आताही कर्मधर्म संयोगाने डेमोक्रॅटिक पक्षाला महिलाच मिळाली. राष्ट्रपती बायोडेन यांच्या उमेदवारीवर प्रश्नचिन्ह लागल्या नंतर उपराष्ट्रपती कमला यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले गेले. कमला हॅरीस यांनी अत्यंत अटीतटीने निवडणूक लढवली. तिकडे ट्रम्प साहेब कोणत्याही नितीनियमाला मानण्यास तयार नव्हते. गेल्या निवडणुकीत ट्रम्प यांनी आपला पराभव झाल्याचे कळताच प्रचंड थयथयाट केला. पण व्हाईट हाऊस मध्ये ट्रम्प यांनी पुन्हा राहायचे, हे मतदारांनी तेव्हा अमान्य केले होते. मात्र, यावेळी डेमोक्रॅटिक पक्षाची डळमळीत भूमिका ट्रम्प यांच्या पथ्यावर पडली. युद्धखोर इस्त्राईलला पाठिंबा किती मर्यादेपर्यंत द्यावा? याचे स्पष्ट धोरण अमेरिकेला आखता आले नाही. ट्रम्प यांनाही ते आखता येईल, असे वाटत नाही. अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेत बड्या बड्या ज्यू उद्योगपतींचा कब्जा आहे. त्यांना नाराज करणे अमेरिकेतील कोणत्याही पक्षाला शक्य नाही. त्यामुळेच इस्त्रायला अमेरिकेकडून भीषण अस्त्रे पुरवण्यात आली. ही बाब अशी होती की, धरले तर चावते आणि सोडले तर पळते, त्यामुळे जगाच्या एकूण राजकारणात बलाढ्य अमेरिकेला युद्धविरोधी भूमिका प्रत्यक्षात घेता आली नाही. ही शोकांतिका म्हणावी काय? असो... काही प्रमाणात कमला हॅरीस यांना त्याचाही फटका बसला. अमेरिकेत आलेले बाहेरचे लोक म्हणजे अमेरिकेवर बोजा आहे, असे ट्रम्प ठणकावून सांगतात. परंतु कमला हॅरीस यांचे म्हणणे असे आहे की, अमेरिकेत बहुसंख्य जनता आयातीत आहे. म्हणजेच बाहेरून आलेली आहे. एकूण बायडेन यांची कारकीर्द अमेरिकन मतदारांना तेवढी रुचली नाही. उपराष्ट्रपती कमला हॅरीस आपल्या परीने जनतेवर प्रभाव टाकण्यासाठी अनेकदा बोलत असत. पण उपराष्ट्रपती असल्यामुळे त्यांच्या बोलण्याला मर्यादित अर्थ मिळायचा. कमला हॅरीस निवडून आल्या असत्या. तर अमेरिकेला पहिली महिला राष्ट्रपती मिळाली असती. हिलरी काय किंवा कमला काय दोन्ही महिला अत्यंत प्रभावशाली आहेत. पण अमेरिकेच्या जनतेने या दोघींनाही नाकारलेले आहे. याबाबतीत भारत कितीतरी पुढारलेला आहे. यावेळीही अमेरिकन लोकांची पुराणमतवादी (अर्थात ऑर्थोडॉक्स विचारसरणी) मानसिकता या निवडणुकीतही दिसून आली. ट्रम्प यांच्यापेक्षा सर्वाथार्ने उत्तम नीतिमान महिला निवडली गेली असती. तर अमेरिकेचे पुरोगामीत्व पूर्णपणे सिद्ध होऊन प्रसिद्ध झाले असते. तसे न होता हडेलहप्पी ट्रम्पचा एक्का, आता शिक्का घेऊन, पक्का अमेरिकेच्या उरावर बसलेला आहे. न्यायनितीशी फारसा संबंध नसलेल्या ट्रम्प यांना ही निवडणूक जिंकल्यानंतर राष्ट्रपतीपदी आरुढ होण्यापासून त्यांना आता कोणीही रोखू शकत नाही. आता पुढील चार वर्षे ट्रम्प कोणता धुमाकूळ घालतात. हे आपल्याला पुन्हा पहावे लागेल. ट्रम्प यांच्या अचाट आणि अमाप लीला सर्वश्रुत आहेत. तरीही ट्रम्प यांच्या गळ्यात विजयाची माळ पडलेली आहे. ते विजयी झाल्यामुळे त्यांचे अभिनंदन केलेच पाहिजे. आता अमेरिका त्यांच्या ट्रम्प कार्ड मधील एक्क्यासारखी जिंकते की, ट्रम्प यांची पुढील कारकीर्द प्रश्नचिन्हात्मक बनते. याचा उलगडा दस्तूरखुद्द ट्रम्प लवकरच करतील, यात शंका नाही.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# संविधान नसते तर निवडणूक आयोग नसते!

**संविधान सन्मान संमेलनात राहुल गांधींचे रोखठोक प्रतिपादन**

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :** संविधान नसते तर देशात लोकशाहीच नसती. निवणूक आयोगच नसते. स्वातंत्रपूर्व काळात देशात अनेक राजे होते. त्यांच्या राज्यात लोकशाही नव्हती, तेथे निवडणुकाही घेतल्या जात नव्हत्या. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून सर्व सामान्य लोकांना मतांचा अधिकार दिला. त्यामाध्यमातून तो दिल्लीतील सत्ता बदलवू शकतो. हे संविधानाचे महत्व आहे, असे राहुल गांधी म्हणाले.

ऐन निवडणुकीच्या तोंडावर नागपूरमध्ये झालेले संविधान सन्मान संमेलन सर्वार्थाने गाजले. यात राहुल गांधी यांनी दिलेले भाषण राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरू शकते. संविधानाचे महत्व समजावून सांगताना राहुल गांधी म्हणाले, संविधानाने समाजातील मागास घटकांमध्ये आरक्षण दिले. पण केवळ पाच टक्के लोकच देशाची सुत्रे आपल्या हाती ठेवून आहेत.

देशातील ९० टक्के लोकांवर सध्या अन्याय होत आहे. त्याविरोधात लढा देणे हेच आमचे कर्तव्य आहे. जातनिहाय जनगणना हे यावरचा उपाय आहे. ही गणना कोणीच थांबवू शकत नाही. सरकारला जातनिहाय जनगणना करावीच लागेल त्याच प्रमाणे आरक्षणावरील ५० टक्के मर्यादा उठवावीच लागेल, असे राहुल गांधी म्हणाले.

राहुल गांधी यांच्या भाषणाला उपस्थितांकडून उत्तम प्रतिसाद मिळत होता. त्यांच्या भाषणाच्या वेळी सुरेशभट सभागृह गच्च भरले होते. अमन कांबळे यांनी आभार मानले. नागपूरमध्ये झालेले संमेलन यशस्वी झाले. समानता विरुद्ध विषमता असे या पार्श्वभूमीवर यासंमेलनाकडे बघितले जात होते. त्याला मिळालेल्या प्रतिसादामुळे ते यशस्वी झाल्याचे दिसून आले.



**संविधान केवळ पुस्तक नाही तर जगण्याचा मंत्र**

राहुल गांधी यांनी बुधवारी नागपूर येथे आयोजित संविधान सन्मान परिषदेतून भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर सडकून टीका केली. भाजप व संघाच्या लोकांना संविधानावर समोरून टीका करता येत नाही. त्यामुळे ते त्याच्यावर लपून हल्ला करतात. हे लोक विकास, प्रगती व अर्थव्यवस्था आदी शब्दांमागे लपून येतात. पण त्यांचे उद्दीष्ट संविधानाच्या पाठीत खंजीर खुपसणे हेच आहे, असे ते म्हणाले.

बाबासाहेब आंबेडकर बोलत होते तेव्हा त्यांच्या तोंडातून कोट्यवधी लोकांचा आवाज निघत होता. ते स्वतःच्या नव्हे तर समाजातील दीनदुबळ्यांच्या वेदना मांडत होते. त्यांची पुस्तके वाचल्यानंतर आपल्याला त्याची प्रचिती येते. मी स्वतः त्यांचा अभ्यास केला. त्यातून मला हे प्रकर्षाने जाणवल्याचे राहुल गांधी म्हणाले.

## महिलांना ३ हजार, तरुणांना ४ हजार, मविआची गॅरंटी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :** येथील बीकेसी मैदानावर महाविकास आघाडीची सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत कॉंग्रेसचे राहुल गांधी यांच्यासह राज्यातील अनेक नेते उपस्थित होते . सभेत राहुल गांधी महाविकास आघाडीची पंचसूत्री जाहीर केली.

जातीनिहाय जनगणना करणे, ५० टक्के आरक्षणाची मर्यादा हटवणार, कुटुंब रक्षण योजनेत २५ लाखांपर्यंत आरोग्य विमा देणार, महालक्ष्मी योजनेत महिलांना महिन्याला ३ हजार रुपये देणार, युवकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी युवकांना महिन्याला ४ हजार रुपये देणार व शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा समावेश आहे.




## डोनाल्ड ट्रम्प यांना बहुमत, पुन्हा होणार राष्ट्राध्यक्ष

■ **वृत्तसंस्था, वॉशिंग्टन, दि. ६ :** अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प विजयी झाले आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर ४ वर्षांच्या कालावधीनंतर पुन्हा निवडणूक जिंकणारे ट्रम्प हे पहिले राष्ट्राध्यक्ष ठरले आहेत. ट्रम्प 2016 मध्ये पहिल्यांदा राष्ट्राध्यक्ष झाले. 2020 च्या निवडणुकीत ते जो बायडेन यांच्याकडून पराभूत झाले.

132 वर्षांपूर्वी ग्रोव्हर क्लीव्हलँड दोनदा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाले. 1884 आणि 1892च्या अध्यक्षीय निवडणुका त्यांनी 4 वर्षांच्या अंतराने जिंकल्या. अमेरिकेतील 538 जागांपैकी ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाला 277 जागा मिळाल्या आहेत. बहुमतासाठी 270 जागांची आवश्यकता आहे. त्याचबरोबर कमला हॅरिस यांच्या पक्षाने 224 जागा जिंकल्या आहेत. दोघांमध्ये केवळ 43 जागांचा फरक आहे. मात्र, उर्वरित सर्व 5 राज्यांमध्ये ट्रम्प आघाडीवर आहेत. चुरशीची लढत देऊनही कमला यांचा निवडणुकीत पराभव झाला आहे.



राष्ट्राध्यक्षीय निवडणुकीसोबतच अमेरिकन संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या, सिनेट आणि प्रतिनिधी गृहाच्या निवडणुकाही झाल्या. रिपब्लिकन पक्षाला सिनेटमध्ये बहुमत मिळाले असून हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हमध्ये आघाडीवर आहे.

विजयानंतर अमेरिकन जनतेला संबोधित करताना ट्रम्प म्हणाले, मी अमेरिकेला पुन्हा एकदा महान बनवणार आहे.

## ३७० पुनर्संचयित करण्याचा प्रस्ताव जेके विधानसभेत मंजूर



भाजप आमदारांचा गोंधळ

■ **वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. ६ :** जम्मू-काश्मीर विधानसभेने राज्याचा विशेष दर्जा (अनुच्छेद ३७०) पुनर्स्थापित करण्याचा प्रस्ताव मंजूर केला आहे. याला भाजप आमदारांनी विरोध केला. प्रस्तावाच्या प्रती फाडून वेलमध्ये जाऊन घोषणाबाजी केली. त्यांनी गदारोळ केला, त्यामुळे सभागृहाचे कामकाज तासाभराहून अधिक काळ तहकूब करण्यात आले.

विधानसभेचे अधिवेशन सुरू होताच उपमुख्यमंत्री सुरिंदर चौधरी यांनी हा प्रस्ताव मांडला. त्यात म्हटले आहे की, 'राज्याचा विशेष दर्जा आणि घटनात्मक हमी महत्त्वाच्या आहेत. हे जम्मू आणि काश्मीरमधील लोकांच्या अस्मिता, संस्कृती आणि हक्कांचे रक्षण करते. विधानसभा एकतर्फी काढून टाकल्याबद्दल चिंता व्यक्त करते.

## ६ तासांत दोन चकमकी

### एक दहशतवादी ठार

■ **वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. ६ :** जम्मू-काश्मीरमध्ये सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये ६ तासांच्या कालावधीत दोन चकमक झाली. कुपवाडा जिल्ह्यातील लोलाब जंगल परिसरात रात्री सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक सुरू झाली.

मंगळवारीच बांदीपोरा येथील केत्सुन वन परिसरात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. ज्यात एक दहशतवादी मारला गेला. लष्कर आणि सीआरपीएफचा प्रत्येकी एक जवान जखमी झाला. सजूसुरक्षा दलांना बांदीपोराच्या चोंटपथरी जंगलात दहशतवादी लपल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर परिसराची नाकाबंदी करून शोध मोहीम सुरू करण्यात आली.

## न्यायालयाला स्फोटाची धमकी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :** मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाची सुनावणी करणाऱ्या विशेष एनआयए कोटार्ला बॉम्बची धमकी मिळाली आहे. एका सरकारी वकिलाने सांगितले की, न्यायालयाच्या रजिस्ट्रार कार्यालयात ३० ऑक्टोबर रोजी फोन आला होता. पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत दक्षिण मुंबईतील दिवाणी न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे.

न्यायालयाने या खटल्यातील आरोपी क्रमांक एकच्या भाजप नेत्या प्रज्ञा सिंह ठाकूर यांच्याविरुद्ध सुनावणीला हजर न राहिल्याबद्दल जामीनपात्र वॉरंट जारी केले. प्रज्ञा यांनी वैद्यकीय प्रकृतीचे कारण देत ४ जूनपासून न्यायलयीन कामकाजात भाग घेतला नाही. २०१७ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने प्रज्ञा सिंह ठाकूरसह सातही आरोपींना जामीन मंजूर केला होता.

## भाजपामधील ४० बंडखोरांची पक्षातून हकालपट्टी


■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने बंडखोरी करणाऱ्या ४० सदस्यांवर कडक कारवाई केली असून त्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे, अशी माहिती भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे.

दरम्यान दोन दिवसांपूर्वीच भाजपप्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बंडखोरी करणाऱ्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात येईल असे जाहीर केले होते. यानंतर आता ३७ मतदारसंघातील ४० जणांवर ही कारवाई करण्यात आली आहे.

महायुतीमधील सर्वांत मोठा पक्ष असलेल्या भाजपच्या ४० जणांनी अर्ज मागे घेतले नाही. यातच छोट्या मित्रपक्षाकडून बंडखोरांवर कारवाईची मागणी करण्यात आली. तुषार भारतीय आणि श्रीकांत भारतीय यांच्यावर विशेषतः कारवाई करण्याचे आमदार राणा यांनी आवाहन केले होते.

दरम्यान, धर्मेंद्र ठाकरू, दिलीप विठ्ठल भोईल, बाळासाहेब मरकुटे, शोभा बनशेट्टी, सुनिल बंडकर, सुवर्णा पाचपुते, विशाल परब, श्रीकांत करर्ले, सोपान पाटील, मयूर कापसे, आश्विन सोनवणे, गजानन महाले, नागेश घोपे, तुषार भारतीय, जगदीश गुप्ता, प्रमोद गडरेल, सुरेश सोनवणे, एकनाथ जाधव, कुणाल सूर्यवंशी, आकाश साळुंखे यांच्यासह ४० जणांची हकालपट्टी झाली आहे .






# कौल कोणाला?

यंदा २०२४ ची राज्य विधानसभा निवडणूक खरोखरच अभूतपूर्व आहे. रस्त्यांवर पिंजऱ्यात बसलेल्या पोपटालाही बाहेर येऊन कोणता पक्ष सरकार बनवणार याचे कार्ड शोधणे अवघड आहे. कुडमुडे ज्योतिषी आणि मतदारांचा निवडणूकपूर्व व मतदानोत्तर कौल घेणाऱ्या वृत्तवाहिन्यांनीही यंदाच्या निवडणुकीत ताकही फुंकून प्यावे लागणार आहे. गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रातील राजकारणाने सभ्यतेच्या सर्व मर्यादा ओलांडल्या. पाच वर्षांत तीन मुख्यमंत्री आणि सर्व प्रमुख पक्षांना सत्ता उपभोगण्याची संधी या राज्यात मिळाली. ठाकरे यांच्या पक्षाचे ४० आणि शरद पवारांच्या पक्षाचे ४० अशा ८० आमदारांनी पक्ष नेतृत्वाला आव्हान दिले व पक्षाचे नाव व निवडणूक चिन्ह काबीज केले, असे महाराष्ट्रात प्रथमच घडले.

----------------

मराठीच्या अस्मितेचा अभिमान बाळगणारे उबाठा सेना, शिवसेना (शिंदे), मनसे हे तीनही पक्ष मैदानात आहेत. ठाकरेंच्या पक्षातून बाहेर पडलेले नेते उबाठा सेनेवर तुटून पडत आहेत. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन तुकडे झाल्यापासून काका विरुद्ध पुतण्या असा जंगी सामना रोज बघायला मिळत आहे.

यंदाच्या निवडणुकीला सर्वपक्षीय कुटुंबशाहीचा विळखा पडला असला तरी मतदारांनीच ही व्यवस्था स्वीकारली आहे. लोकसभा निवडणुकीच्या निकालाप्रमाणेच विधानसभेला मतदार कौल देतील काय, हा मोठा कळीचा मुद्दा आहे. कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रात महायुतीची सत्ता यायलाच हवी, यासाठी देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे यांनी चंग बांधला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचेही राज्यात मोठे दौरे होणार आहेत. देशाची आर्थिक राजधानी मुंबई ज्या राज्यात आहे, त्या राज्याची सत्ता वाट्टेल ते करून आपल्याच हाती राहिली पाहिजे यासाठी भाजपाने सर्वस्व पणाला लावले आहे. राज्याचा मुख्यमंत्री मित्रपक्षाचा असला तरी त्याचा रिमोट कंट्रोल हा भाजपाच्या हाती असतो, हे जनतेलाही पूर्ण ठाऊक आहे.

महाआघाडी व महायुतीतील मित्रपक्षांमध्ये स्पर्धा आहेच. आपल्या पक्षाचे जास्तीत जास्त आमदार निवडून आले तरच आपल्याला महत्त्व मिळते, हे त्यांच्या नेत्यांना चांगले ठाऊक आहेत. आमदारांच्या संख्याबळावरच नेत्यांची पत आणि प्रतिष्ठा मोजली जाणार आहे. आमदारांचे संख्याबळ असेल, तरच सौदेबाजी करता येते. म्हणूनच सहा पक्षांच्या सहा नेत्यांची विधानसभा निवडणुकीत कठोर परीक्षा आहे.

**एकनाथ शिंदे**

एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाविरोधात बंड करण्याची हिम्मत दाखवली. शिवसेनेतून एकाच वेळी ४० आमदार, १३ खासदार बाहेर पडल्यावर महाराष्ट्रात राजकीय भूकंप झाला. ठाकरेंना मुख्यमंत्री पदावरून पायउतार व्हावे लागलेच आणि महाआघाडीचे सरकारही कोसळले.

त्याचे बक्षीस म्हणून भाजपाने एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपद दिले. शिंदे हे भाजपाचे बाहुले मुख्यमंत्री असतील. महाराष्ट्राच्या सर्वोच्च पदावर बसल्यावर भाजपा बोले व शिंदे डोले असे वागतील असे अनेकांना वाटत होते.

पण शिंदे यांनी आपल्या कामाने स्वतःची तडफदार मुख्यमंत्री म्हणून प्रतिमा निर्माण केली. आपल्या कामगिरीने



त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा विश्वास संपादन केला. अहोरात्र काम करणारा कार्यक्षम मुख्यमंत्री अशी त्यांची ओळख झाली. लोकसभा निवडणुकीत त्यांच्या पक्षाने १५ जागा लढवल्या व ७ जिंकल्या. उबाठा सेनेपेक्षा शिंदेंच्या शिवसेनेचा स्ट्राइक रेट सरस ठरला.

शिंदे यांची शिवसेना विधानसभेच्या ८० जागा लढवत आहे. ज्यांनी बंडाला साथ दिली त्या सर्वांना शिंदे यांना निवडून आणायचे आहे. विधानसभा निवडणुकीत

**इंडिया कॉलिंग**
**डॉ. सुकृत खांडेकर**
sukritforyou@gmail.com

महायुतीला अपेक्षित चांगले यश मिळाले, तर शिंदे राज्याच्या सिंहासनावर पुन्हा बसू शकतील. भाजपा श्रेष्ठींनी त्यांच्यातील नेतृत्व, गुणवत्ता, तडफ हेरली आहे.

उद्धव व आदित्य यांच्या नावामागे ठाकरे आडनाव आहे. शिंदे हे स्वतःच्या कर्तृत्वाने नेते झाले आहेत. सतत सक्रिय राहून व संघर्ष करून त्यांना झगडावे लागले आहे. निकालानंतर ते स्वतः किंग होतील किंवा किंग मेकर म्हणून त्यांना भूमिका बजवावी लागेल.

शिवसेना हे पक्षाचे नाव व धनुष्यबाण हे चिन्ह निवडणूक आयोगाने शिंदे यांच्या गटाला दिले आहे. विधानसभा निवडणुकीत मतदारांनी त्यावर शिक्कामोर्तब करणे आवश्यक आहे. यंदाची निवडणूक ही ठाकरे विरुद्ध शिंदे आणि शिवसेना विरुद्ध उबाठा सेना अशी आहे. शिंदे यांना शिवसेना आपलीच आहे हे सिद्ध करून दाखवावे लागेल. भाजपाकडे अजित पवार व राज ठाकरे (महायुतीच्या बाहेरील) हे आणखी दोन मित्र आहेत, याचे भान ठेऊन शिंदे यांना राजकारण खेळावे लागणार आहे.

**देवेंद्र फडणवीस**

पाच वर्षे मुख्यमंत्रीपदावर राहिलेल्या देवेंद्र फडणवीस यांना २०१९च्या निवडणुकीनंतरच्या पाच वर्षांत मुख्यमंत्री (८०) तास, विरोधी पक्षनेता व उपमुख्यमंत्री अशा तीनही भूमिका पार पाडव्या लागल्या. आजही देवेंद्र हेच महाराष्ट्राचा भाजपाचा चेहरा आहेत. तेच भाजपाचे राज्यात नंबर १ चे नेते आहेत.

लोकसभा निवडणुकीत भाजपाने महाराष्ट्रात २८ जागा लढवल्या पण केवळ ९ जागांवर विजय मिळाला. केंद्रात व राज्यात भाजपा सत्तेवर असूनही राज्यात भाजपाला नामुष्की पत्करावी लागली. लोकसभा निवडणुकीतील पक्षाच्या खराब कामगिरीनंतर स्वतः देवेंद्र यांनी उपमुख्यमंत्री पदाचा राजीनामा देण्याची तयारी दर्शवली. आपण पक्षासाठी काम करू असे म्हटले होते.

पण श्रेष्ठींनी उपमुख्यमंत्री पदावर राहा असे सांगून पक्षाची महाराष्ट्राची सूत्रे त्यांच्याकडे सोपवली. लोकसभा निवडणुकीत झालेल्या चुकांची पुनरावृत्ती होणार नाही, असे स्वतः फडणवीस यांनी म्हटले आहे. मराठा आणि ओबीसी अशी भाजपाला मोठी कसरत करावी लागत आहे. फडणवीस हे नागपूरचे आहेत.

पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्यातील ते सेतू आहेत. यंदाच्या विधानसभा निवडणूक प्रचारात यावेळी संघ परिवार सक्रिय आहे. भाजपा जवळपास दीडशे जागा लढवत असून शंभरपेक्षा जास्त आमदार निवडून आणणे हे पक्षाचे लक्ष्य आहे.

भाजपाचे सर्वाधिक आमदार असूनही गेली पाच वर्षे मुख्यमंत्रीपद फडणवीसांना हुलकावणी देत आहे. देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांच्यात वर्चस्वाचे द्वंद्व चालू आहेच. यंदाच्या निवडणुकीत काही चमत्कार घडू शकेल का?

**शरद पवार**

गेली सहा दशके महाराष्ट्राच्या राजकारणात आघाडीवर असलेल्या ८४ वर्षे वयाच्या शरद पवार यांच्या दृष्टीने यंदाची निवडणूक मोठी आव्हानात्मक आहे. पाच वर्षांपूर्वी उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री पदावर बसविण्यात आणि भाजपाला सत्तेपासून दूर ठेवण्यात पवारांची कौशल्यपूर्ण रणनिती व मुत्सद्देगिरी कारणीभूत होती. महाविकास आघाडीचे सरकार स्थापन करण्यात पवार यांचाच पुढाकार होता.

भाजपाकडून दुखावलेल्या उद्धव ठाकरेंना महाआघाडीच्या तंबूत खेचण्यामागे पवार यांचाच आराखडा होता. आता महाविकास आघाडीचे सरकार हटविण्यासाठी पवार जिद्दीने मैदानात उतरले आहेत. आपल्या स्वतःच्या पक्षात झालेले बंड मोडून काढणे पवारांना जमले नाही, पण मतदारांसमोर जाऊन आपण स्थापन केलेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हाच खरा पक्ष आहे हे सिद्ध करण्याचे आणखी मोठे आवाहन पवारांसमोर आहे.

लोकसभा निवडणुकीत बारामती मतदारसंघ काकांनी जिंकून दाखवला. तिथे सुनेत्रा पवारांचा पराभव करून सुप्रिया सुळे विजयी झाल्या. आता विधानसभा निवडणुकीत घरातलेच उमेदवार पुन्हा तोच खेळ खेळत आहेत.

काही महिन्यांपूर्वीच्या लोकसभा निवडणुकीत पवारांच्या पक्षाने १० जागा लढवल्या व ८ जिंकल्या. विधानसभेसाठी त्यांचा पक्ष ८७ जागा लढवत आहे. पक्षाच्या प्रचारासाठी ते दिवस-रात्र वणवण करीत आहेत. उपमुख्यमंत्री असलेल्या पुतण्याशी बारामतीत आपल्याच होम ग्राऊंडवर थेट लढा देण्याची वेळ काकांवर आली आहे.

●●●●●

## मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी काय करावे लागेल?

कुठल्याही निवडणुकीत मतदानाच्या टक्केवारीला फार महत्त्व असते. तो लोकशाही व्यवस्थेचा प्राण आहे. या प्राणवायूची शुध्दता कायम रहावी यासाठी काही बंधने ही निवडणूक आयोगाने घालून दिलेली आहेत. यालाच आचारसंहिता म्हणून संबोधले जाते.

निवडणुकीत विविध प्रकारची प्रलोभने मतदारांना दाखविली जातात. खरे तर हे नियमबाह्य वर्तन ठरत असते. परंतु निवडणूक आयोग योग्य वेळेत कठोर कारवाई करू शकत नसल्याने फक्त दमदाटी करून, दंडात्मक कारवाई करून मोकळे होत असते.

कारण जवळपास सगळेच पक्ष निवडणूक काळात निवडणूक नियमांचे उल्लंघन करीत असतात. यातून कुणीही सुटलेले नाहीत. यासाठी एकमेकांविरोधात आघाडी उघडलेली पहायला मिळते.मतदानाची टक्केवारी वाढल्यास यांस काही प्रमाणात आळा बसू शकतो.

मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी फक्त ईव्हीएम वर अवलंबून असता कामा नये. यासाठी विविध पर्यायांचा वापर केला गेला पाहिजे. यामध्ये ईव्हीएम व्यतिरिक्त बॅलेट पेपर,क्यूआर कोड,ओटीपी इत्यादी पर्यायांचा विचार केला गेला पाहिजे. तसेच मतदान हे कुठूनही करता आले पाहिजे. असे झाले तर मतदानासाठी विशिष्ट तारखेची गरज पडणार नाही.

यामुळे मतदान यंत्रणेवरील, निवडणुक आयोगावरील व सुरक्षा यंत्रणेवरील भार कमी होण्यास मदत होणार आहे. यामुळे निवडणूक खर्चात मोठी बचत होवू शकते. याचा अवश्य विचार झाला पाहिजे. आपणं आज डिजीटल युगात वावरत असल्याने याचा आग्रह निवडणूक आयोगाकडे लावून धरला गेला पाहिजे.

मतदानाची प्रक्रिया यामुळे वेगवान आणि मतदारांच्या सोयीनुसार कुठूनही पार पाडता येईल. मतदानासाठी कमीत कमी पंधरा दिवसाची मुदत घालून दिली गेली पाहिजे. यामुळे एकगठ्ठा मतदानाला काही प्रमाणात आळा बसू शकतो.

मतदानाची टक्केवारी कमी रहात असल्याने विविध पक्षांचा कल मते खरेदी करण्याकडे वळलेला आहे. याला आळा घालण्यासाठी मतदानाची टक्केवारी मोठ्या प्रमाणावर वाढली पाहिजे.

मतदानाच्या अधिकाराचा वापर न करणाऱ्यांना याबाबतची विचारणा करून योग्यरीत्या दंडीत केले गेले पाहिजे. मतदानाची टक्केवारी वाढल्याशिवाय लोकशाही व्यवस्थेला चांगले दिवस पहायला मिळणार नाहीत.

निकोप लोकशाही व्यवस्थेसाठी मतदान प्रक्रियेत अनेक बदल करावे लागणार आहेत. कमी मतदान हा लोकशाही व्यवस्थेला लागलेला कलंक आहे. तो कलंक धुवून काढण्यासाठी निवडणूक आयोगाने निश्चितपणे पुढाकार घेतला पाहिजे.

--------------

**मिलिंद गड्डमवार**
**राजुरा. जि. चंद्रपूर.**
**९५११२१५२००**

■ ■ ■

## मनसे वाजवणार का महायुतीचे खळ्ळ खट्याक




मुंबईतील परप्रांतीय असो किंवा मस्तवाल अधिकाऱ्याला धडा शिकवायचा असेल तर त्यासाठी राज ठाकरे खळ्ळ खट्याक वाजवा, असा शब्द वापरतात. म्हणजे विरोधकांवर हल्ला करा, असा आदेश ते देतात. विधानसभेच्या निवडणुकीत मुंबईमध्ये महायुती आणि मनसेमध्ये माहीमच्या मुद्यावरून वाढत चाललेला तणाव पाहता २२ जागी मनसे महायुतीचे खळ्ळ खट्याक वाजवू शकते, अशी स्थिती आहे.

मनसेचा विधानसभा निवडणुकीत १२९ जागी महायुतीशी थेट सामना होणार आहे. त्यातील मुंबईतील २२ मतदारसंघांमध्ये मनसेकडे महायुतीचा उमेदवार पाडण्याइतकी मते आहेत, असे म्हटले जाते. शिंदेसेनेविषयी मनसेत नाराजी वाढत असल्याचे बोलले जात आहे. मनसेचा महायुतीला फटका बसणार असल्याचीही चर्चा आहे. ■ ■ ■

## विद्यार्थी दिन

७ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण राज्यात विद्यार्थी दिन साजरा केला जातो. याच दिवशी म्हणजे ७ नोव्हेंबर १९०० साली विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रतापसिंग हायस्कूल, राजवाडा चौक जिल्हा सातारा येथे शाळेत प्रवेश घेतला होता. त्यावेळी शाळेत भिवा म्हणून त्यांच्या नावाची नोंद करण्यात आली होती.

या शाळेतील जनरल रजिस्टरमध्ये १९१४ या क्रमांकासमोर त्यांच्या नावाची नोंदणी व त्यासमोरील स्वाक्षरी ही ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून आजही शाळा प्रशासनाने जपून ठेवली आहे. या शाळेत ते १९०४ सालापर्यंत म्हणजे चौथी पर्यंत शिकले. ई स २००३ पासून पत्रकार अरुण जावळे हे हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा व्हावा यासाठी प्रयत्न करीत होते.

२०१७ मध्ये बाबासाहेबांच्या शाळा प्रवेशाचे स्मरण म्हणून तसेच विद्यार्थ्यांना शिक्षण हेच उन्नतीचे एकमेव साधन असून त्याच्या परिश्रमाची जाण व्हावी यासाठी महाराष्ट्र सरकारने हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. या दिवशी राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित विविध पैलूंवर निबंध, वक्तृत्व, काव्य वाचन स्पर्धा आयोजित केल्या जातात. यावर्षी दिवाळीची सुट्टी असल्याने शाळा, महाविद्यालये बंद असली तरी या स्पर्धा ऑनलाइन आयोजित केल्या जाणार आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश खऱ्या अर्थाने शैक्षणिक क्रांतीची आणि युगाची चाहूल म्हटली पाहिजे. कारण डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे पाऊल शाळेत पडल्यामुळे ते स्वतः सुशिक्षित आणि प्रज्ञावंत झाले आणि करोडो दलितांचे आणि वंचितांचे उध्दारकर्तेही झाले. विशेष म्हणजे ज्या संविधानाचा आज सर्वात आदर्श संविधान म्हणून देशभर गौरव होत असतो त्या भारतीय संविधानाचे ते शिल्पकारही ठरले.

परिणामतः भारतीय समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही मानवी मूल्ये रुजू शकली गेली म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा शाळा प्रवेश दिन ही अत्यंत महत्वाची आणि इतिहासाला कूस बदलायला लावणारी घटना आहे.

डॉ बाबासाहेब आंबेडकर हे आजीवन विद्यार्थी होते त्यांनी आपला विद्याव्यासंग शेवटपर्यंत जपला. आजचा विद्यार्थी हा या देशाचे भविष्य आहे. त्यामुळे आदर्श विद्यार्थी निर्माण होणे ही काळाची गरज आहे. जर देशात आदर्श विद्यार्थी निर्माण झाले तर आपल्या देशाला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. या ऐतिहासिक दिवशी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन! तसेच सर्व विद्यार्थी मित्रांना विद्यार्थी दिनाच्या हार्दीक शुभेच्छा!



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

■ ■ ■

## औरंगजेबाच्या देहाची आणि कीर्तीची कबर खोदणारी!



उत्तरार्ध

तिने दावा केला की तो एक ढोंगी आहे आणि तिने शाहूसमोर राजाराम आपला नातू म्हणून खोटी साक्ष दिली होती. यापूर्वी ऑक्टोबर १७५०मध्ये ताराबाईंनी पेशवाविरोधी, उमाबाई दाभाडे यांची भेट घेतली होती.

उमाबाईंनी ताराबाईंच्या समर्थनार्थ दामाजीराव गायकवाड यांच्या नेतृत्वात १५ हजार सैन्य पाठवले. गायकवाड यांनी साताऱ्याच्या उत्तरेस निंब येथे एका लहानशा गावात पेशवाईचा निष्ठावंत त्र्यंबकराव पुरंदरे यांच्या नेतृत्वात असलेल्या २० हजार बलाढ्य सैन्याचा पराभव केला. त्यानंतर त्यांनी साताऱ्याला कूच केले, जिथे त्यांचे ताराबाईंनी स्वागत केले. तथापि त्र्यंबकरावांनी पुन्हा आपले सैन्य स्थापन केले आणि १ मार्च रोजी वेण्णा नदीच्या काठावर असलेल्या गायकवाडच्या सैन्यावर हल्ला केला.

या युद्धात गायकवाड यांचा पराभव झाला व त्याला मोठ्या प्रमाणात नुकसान सोसावे लागले. दरम्यान, पेशवे मोगल सीमेवरून परत आले आणि २४ एप्रिल रोजी सातारा येथे पोहोचले. त्यांनी ताराबाईच्या सैन्यांचा पराभव करीत सातारा येथील यवतेश्वरच्या चौकीवर हल्ला केला. त्यांनी सातारा किल्ला घेरला आणि ताराबाईंना छत्रपती राजारामला सोडण्यास सांगितले. त्यावेळी राजारामाची शारीरिक व मानसिक स्थिती खूपच खालावली होती.

ताराबाईंनी नकार दिला आणि पेशवे पुण्याला निघून गेले कारण सुसज्ज आणि मजबूत सातारा किल्ला घेण्यास सोपा होणार नव्हता. दरम्यान, पेशवाईच्या माणसांनी दामाजी गायकवाड, उमाबाई दाभाडे आणि त्यांच्या नातेवाईकांना अटक केली. त्याचवेळी सातारा सैन्याच्या तुकडीने तिच्याविरुद्ध बंड केले. तिने बंडखोरांचे नेते आनंदराव जाधव यांचा शिरच्छेद केला. तथापि, तिला समजले की ती पेशव्यांविरुद्ध लढू शकणार नाही आणि शांततेच्या करारासाठी पुण्यात भेटण्याची तयारी दर्शविली. पेशव्यांचा प्रतिस्पर्धी जानोजी भोसले हा पुष्कळ सैन्य घेऊन पुण्याजवळ होता आणि त्यामुळे पेशव्यानी तिचे संरक्षण करण्याचे मान्य केले. पुण्यात पेशवे तिच्याशी आदराने वागले आणि काही नाखुषीनंतर ताराबाईंनी पेशव्याचे श्रेष्ठत्व स्वीकारले. पेशवे यांना नापसंत करणारे सरदार जाधव यांना काढून टाकण्याचे तिने मान्य केले. त्या बदल्यात पेशवाईने तिला माफ केले. दि.१ सप्टेंबर १५५२ रोजी दोघांनी परस्पर शांततेचे वचन देऊन जेजुरीतील खंडोबा मंदिरात शपथ घेतली. या शपथविधीत ताराबाईंनीही शपथ घेतली की राजाराम दुसरा तिचा नातू नाही. तथापि, पेशव्यांनी राजारामला एक शक्तीहीन छत्रपती म्हणून कायम ठेवले.

राजारामांनतर मराठी राज्याला नेतृत्व नसताना, ताराबाई यांनी मराठी राज्य टिकवूना ठेवले. मराठी राज्य जिंकण्यासाठी आलेल्या औरंगजेबाच्या देहाची आणि कीर्तीची कबर महाराष्ट्राच्या भूमीतच खोदली गेली. राज्याला, गादीला आणि समाजाला खंबीर नेतृत्व दिले, सवार्चे नीतिधैर्य टिकवून ठेवले. वयाच्या ८६व्या वर्षी ताराबाईंचे सिंहगडावर दि.६ नोव्हेंबर १७६१ रोजी निधन झाले. मराठ्यांच्या इतिहासात महाराणी ताराबाई हे एक ज्वलंत पर्व आहे. या काळात तिने मुघल सत्तेच्या विरुद्ध लढे देऊन मराठी राज्याला नेतृत्व बहाल करण्याचे काम केले व आपले कार्य आणि कर्तृत्व निर्विवादपणे सिद्ध केले. स्मृतिदिनी महाराणी ताराबाई भोसले यांना विनम्र अभिवादन !!

------------

**संकलन**
**कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी.**
**गडचिरोली.**
**9423714883**

●●●●●

## दिवाळीत मिठाई आणि पदार्थांमुळे वजन वाढले

## फेस्टिव्ह फॅट कसे बर्न करणार?



भारतात उत्सव म्हणजे काहीतरी गोड हे असणारच. दिवाळी हा स्वादिष्ट मिठाईसोबतच प्रकाश आणि आनंदाचाही सण आहे. कधीतरी सुरू झालेली मिठाई आणि दिव्यांची ही परंपरा आजतागायत सुरू आहे.

विशेष म्हणजे हा केवळ एक दिवसाचा उत्सव नाही. हा जवळपास आठवडाभराचा संपूर्ण पॅकेज फेस्टिव्हल आहे. यामध्ये, लोक त्यांच्या कुटुंबासह आणि मित्रांसोबत उत्सव साजरा करतात आणि मनभरून मिठाई खातात.

आठवडाभर स्वादिष्ट पदार्थ आणि मिठाईचा आस्वाद घेतल्याने आपल्या कॅलरीजचा वापर खूप वाढतो. परिणामी आपले वजन झपाट्याने वाढते. याशिवाय मिठाई आणि पदार्थांचे अतिसेवन केल्याने आपल्या शरीरातील विषद्रव्ये वाढते. हे शरीरासाठी एक वेगळे आव्हान आहे. लठ्ठपणा आणि विषद्रव्ये मिळून अनेक आजारांचा धोका निर्माण होतो.

सणासुदीच्या दिवसात अनेकजण मिठाईचे सेवन मोठ्या प्रमाणात करतात. आजकाल बहुतेक खाद्यपदार्थ खूप तळलेले असतात. एकंदरीत, सणासुदीच्या दिवसांत खाल्ल्या जाणाऱ्या बहुतेक गोष्टी जास्त कॅलरीयुक्त पदार्थ असतात. त्यामुळे वजन झपाट्याने वाढते.

सणाच्या आधी खबरदारी म्हणून बरेच लोक कार्ब आणि साखरयुक्त पदार्थ खाणे बंद करतात. जास्त साखरयुक्त पदार्थ खाणे किंवा ते पूर्णपणे टाळणे, दोन्ही मार्ग आपल्या शरीरासाठी हानिकारक असू शकतात. आपण आहारातून कार्बोहायड्रेट आणि चरबी पूर्णपणे कमी करू नये कारण संतुलित आहार आणि त्वरित उर्जेसाठी हे खूप महत्वाचे आहे. मात्र, त्याचे प्रमाण मर्यादित राहील याची काळजी घ्यावी.

**फेस्टिव्ह फॅट म्हणजे काय?**

सण-उत्सवांमध्ये वाढलेल्या वजनाला फेस्टिव्ह फॅट म्हणतात. साधारणपणे फेस्टिव्हल फूडमुळे लोकांचे वजन वाढते. याचे सर्वात मोठे कारण म्हणजे सण-उत्सवात जास्त कॅलरीयुक्त अन्नाचे सेवन. हे वजन सामान्यतः साखर, कार्बोहायड्रेट्स आणि अतिरिक्त चरबी असलेल्या पदार्थांमुळे वाढते.

**फेस्टिव्ह फॅटची मुख्य कारणे**

फेस्टिव्ह फॅटच्या मुख्य कारणांमध्ये सणासुदीच्या दिवसांमध्ये मिठाईचे अतिसेवन यांचा समावेश होतो. लाडू, बर्फी, गुलाब जामुन यांसारख्या गोड पदार्थांमध्ये साखर आणि चरबीचे प्रमाण जास्त असते. साखर आणि चरबी दोन्ही वजन वाढण्यास जबाबदार असतात.

याशिवाय, शॉर्टब्रेड, चिप्स आणि नमकीन यांसारख्या तळलेल्या पदार्थांच्या सेवनाने सणात वजन वाढते. या काळात, आपण आपली नियमित खाण्याची दिनचर्या सोडतो आणि असंतुलित अन्न खाण्यास सुरुवात करतो, ज्यामुळे चयापचय प्रभावित होते आणि वजन वाढते.

स्नॅक्स आणि मिठाईमध्ये त्यांच्या नेहमीच्या थाळीपेक्षा जास्त कॅलरीज असतात. हे असे समजून घ्या की एका समोस्यामध्ये 300 कॅलरीज असू शकतात आणि गुलाब जामुनमध्ये 200 कॅलरीज असू शकतात. सण-उत्सवात, सुट्ट्या आणि कुटुंबातील सदस्य घरी येणे यामुळे आपला दिनक्रम बदलतो. आपण बहुतेक वेळ घरी घालवतो आणि आपण जे खातो त्यातून कॅलरीज बर्न करू शकत नाही, ही खरी समस्या आहे.

(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

●●●●●

## अशोकायन

### निवडणुकीच्या काळात

निवडणुकीच्या काळात
यात्रेसारखे माहूल असते
गल्लीतील लोकांनाही
दिल्लीची चाहूल असते ..

निवडणुकीच्या काळात
कार्यकर्त्यांना धुंदी असते
बियरबार व ढाब्यावर
पाय ठेवायला जागा नसते ..

निवडणुकीच्या काळात
चमच्यांनाही भाव येतो
कधी नव्हे ती किमंत
उमेदवाराकडून
घेऊन जातो ..!



**प्रा. अशोक सारडा**
मेहकर
(९४२१३९४३३९)

# उमेदवारी मागे घेण्यासाठी कपिल भोंडेकर यांना जीवे मारण्याची धमकी

■ महासागर प्रतिनिधी,

भंडारा, दि. ६: निवडणूक जिंकण्यासाठी काही अती महत्वाकांशी उमेदवारांनी आता साम, दाम, दंड, भेद वापरण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठी अन्य उमेदवारांना निवडणुकीच्या स्पर्धेतून बाहेर पडण्याची धमकी सुध्दा दिली जात आहे. एका अपक्ष उमेदवाराला देखील अर्ज मागे घेण्याच्या आदल्या रात्री अशाच प्रकारे आलेल्या धमकीवजा फोनमुळे सर्वत्र खळबळ उडाली असून उमेदवारांमध्ये आता भीतीचे वातावरण पसरले आहे. भंडारा जिल्ह्यात प्रथमच असा प्रकार घडला आहे. धमकी देणाऱ्या विरोधात पोलीस तक्रार करण्यात आली असून उमेदवाराने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना निवेदन देवून अर्ज मागे घेण्याची परवानगी मागितली. मात्र नामांकन मागे घेण्याची वेळ निघून गेल्यामुळे उमेदवाराची मागणी खारीज करण्यात आली. आता भीतीपोटी या उमेदवाराला प्रचारासाठी घराबाहेर पडणे अशक्य झाले असून प्रशासनाने या प्रकाराची गांभीर्याने दखल घेण्याची मागणी उमेदवाराने केली आहे. भंडारा विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढविण्याच्या तयारीत असलेल्या



कपिल भोंडेकर यांना अर्ज मागे घेण्याच्या आदल्या रात्री एक धमकीवजा फोन आला. निवडणुकीतून माघार घेतली नाही तर जिथे दिसेल तिथे जीवे मारण्याची आणि कुटुंबाला उद्धवस्त करण्याची धमकी देण्यात आली. याबाबत कपिल यांनी भंडारा पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. कपिल भोंडेकर यांनी मंगळवारी सायंकाळी परिषदे दरम्यान ही माहिती दिली.

विधानसभा निवडणुकीची तारीख जसजशी जवळ येत आहे तसतसे वातावरण चांगलेच तापत चालले आहे. मतदारांसोबत रिंगणात प्रतिस्पर्धी असलेल्या उमेदवारांनाही उमेदवारी मागे घेण्यासाठी काही उमेदवारांकडून दबाव आणला जात आहे. जे उमेदवार कोणत्याही अमिषाला बळी पडत नाहीत त्यांच्यावर धमकीचा प्रयोग केला जात आहे. भंडारा विधानसभेत निवडणुकीच्या रिंगणात असलेल्या कपिल भोंडेकर यांना अशाचप्रकारे धमकी देण्यात येत असल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. अज्ञात व्यक्तींकडून असे धमकीचे फोन येत असून याचा खरा सूत्रधार शोधून कठोर कारवाई करून कुटुंबाला पोलीस संरक्षण देण्याची मागणी कपिल यांनी केली आहे.

कपिल सदालाल भोंडेकर हे गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा तालुक्यातील चांदोरी गावचे रहिवासी आहेत. त्यांनी भंडारा विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवारी दाखल केली होती. सोमवार, ४ नोव्हेंबर रोजी दुपारी १२.५५. वाजता एका अज्ञात नंबरवरून त्यांना फोन आला. अनोळखी नंबर असल्याने त्यांनी कॉल उचलला नाही. थोड्याच वेळात त्यांना त्याच मोबाईल क्रमांकावरून त्यांना धमकीवजा मेसेज आले. त्यांनी त्या मेसेजकडे दुर्लक्ष केले. मात्र त्यानंतर त्यांच्या वडिलांच्या मोबाईलवर मेसेज आले, कुठे आहेस, भंडाऱ्यात येऊन राजकारण करतोस, तुला भंडाऱ्यामध्ये मरायचे आहे का, तुला जास्त खाज आली का? मी तुला सुपारी देऊन मारीन. तुमच्या पोटात दोन-चार हत्यारे टाकू, तुझ्या कुटुंबाला उद्धवस्त करून टाकू, माघार घेतली नाही तर जिथे दिसेल तिथे ठार मारू अशी धमकी देण्यात आली. घडलेल्या प्रकाराची माहिती भंडारा पोलिसांना देण्यात आली आहे. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरू झाल्यानंतरही कायदा हातात घेतला जात असल्याने सर्वत्र आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

भंडारा विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीवर बळाचा आणि दबाव तंत्राचा वापर करून प्रभाव पाडण्याचे प्रयत्न सुरू आहेत. काही अतीमहत्वकांक्षी उमेदवारांनी असे प्रकार सुरू केले आहेत. कपिल भोंडेकर यांच्याप्रमाणेच इतरही काही कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना संपवण्याच्या धमक्या मिळाल्याचे वृत्त आहे. मंगळवारी दिवसभर याबाबतचे वृत्त सुरूच होते. काही लोक केवळ निवडणुकीपुरते मर्यादित ठेवून पोलिस तक्रार देण्यास टाळाटाळ करत आहेत. आज सकाळी कपिल भोंडेकर यांना सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलीस प्रशासनाकडून एक गनमॅन देण्यात आला आहे.

# बंडखोर पाझारे, अली, वारजूकर, गायकवाड यांची भाजपातून हकालपट्टी

■ महासागर प्रतिनिधी,

चंद्रपूर, दि. ६ : अनुसूचित जातीसाठी राखीव चंद्रपूर मतदारसंघातून बंडखोरी करीत भाजप उमेदवार आमदार किशोर जोरगेवार यांना आवाहन देणारे अपक्ष उमेदवार ब्रिजभूषण पाझारे यांच्यासह वरोरा मतदारसंघातून प्रहार पक्षाकडून निवडणुकीच्या रिंगणात असलेले माजी नगराध्यक्ष अहतेशाम अली, वसंत वारजूकर व राजू गायकवाड या चौघांची भाजपातून हकालपट्टी करण्यात आली आहे. या चौघांचेही सहा वर्षासाठी निलंबन करण्यात आहे.

भाजपा प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यभरातील ४० बंडखोर नेत्यांची भाजपातून हकालपट्टी केली आहे. यामध्ये चंद्रपूर जिल्ह्यातून पाझारे, अहतेशाम अली, वारजूकर व गायकवाड यांचा समावेश आहे. पाझारे हे भाजपाचे महामंत्री होते. चंद्रपूरातून विधानसभेसाठी त्यांचेच नाव आघाडीवर होते. मात्र शेवटच्या क्षणी अपक्ष आमदार किशोर जोरगेवार यांचा भाजपा प्रवेश झाला व चंद्रपुरातून उमेदवारी दिली गेली. त्यामुळे पाझारे यांनी जोरगेवार यांना







आवाहन देत अपक्ष नामांकन दाखल केले. नामांकन दाखल करण्यापूर्वी पाझारे यांनी भाजपाचे महानगर अध्यक्ष राहुल पावडे यांच्याकडे राजीनामा सोपविला होता. त्यांच्या राजीनाम्यानंतरच पक्षाने त्यांनी पक्षातून हकालपट्टी केली आहे.

विशेष म्हणजे पाझारे मागील पंधरा वर्षापासून सातत्याने विधानसभा निवडणुकीची तयारी करित आहेत. मात्र दरवर्षी त्यांच्या पदरी निराशाच पडत आहे. शेवटी त्यांनी बंडखोरी केली असता पक्षाने त्यांची हकालपट्टी केली. वरोरा येथे माजी नगराध्यक्ष अहतेशाम अली प्रहार पक्षाकडून निवडणुकीच्या रिंगणात उभे आहे. अली यांचे पक्ष विरोधी बंड बघता त्यांनाही बाहेरचा रस्ता दाखविण्यात आला आहे. ब्रम्हपुरी मतदार संघातून वसंत वारजूकर यांनीही नामांकन दाखल केले होते. मात्र अखेरच्या क्षणी त्यांनी उमेदवारी मागे घेतली. मात्र तरीही त्यांना पक्षातून बाहेर करित सहा वर्षासाठी निलंबित केले आहे. तर राजू गायकवाड यांचीही हकालपट्टी केली आहे. दरम्यान पक्षासाठी ३० वर्षपेक्षा अधिक सेवा करून रक्ताचे पाणी करणाऱ्या ब्रिजभूषण पाझारे सारख्या प्रामाणिक कार्यकर्त्यांची तसेच वसंत वारजूकर, माजी नगराध्यक्ष अहतेशाम अली व राजू गायकवाड या चौघांची पक्षातून हकालपट्टी करित सहा वर्षासाठी निलंबित केल्याने भाजपाचा प्रामाणिक कार्यकर्ता अस्वस्थ आहे. कार्यकर्ता हा पक्षाचा आत्म आहे मात्र पक्षासाठी झिजणाऱ्या अशा प्रामाणिक कार्यकर्त्यांला अशा पध्दतीने बाहेरचा रस्ता दाखविल्याने प्रामाणिकपणाची हिच ती पावती का असाही प्रश्न भाजपाच्या स्थानिक नेत्यांना पाझारे समर्थक विचारत आहेत.

# युवा अग्रवाल संमेलनाच्या पुढाकाराने जीवनावश्यक साहित्याचे वितरण




■ महासागर प्रतिनिधी,

अकोला, दि. ६ : दीपावलीत वंचित,आदिवासी बहुल भागात महाराष्ट्र राज्य युवा अग्रवाल संमेलनाच्या शाखेतर्फे जीवनावश्यक साहित्याचे वितरण करण्यात आले. दुर्गम भागातील गरीब, गरजूंनाही दीपावलीचा आनंद मिळावा, त्यांचीही दिवाळी आनंदात जावी, यासाठी नन्हीमुस्कानउपक्रम राबवण्यात आला. वापरण्यासारखे कपडे, लहान मुलांना खेळणी, चादर, नमकीन, मिष्टान्न, चॉकलेट आदीचे वितरण करून त्यांच्या सोबत दीपावलीचा आनंद व्यक्त करण्यात आला.

मेळघाट परिसरातील भीलखेडा, गंगाधरी, सोनापूर, मोरगढ वाकी, रुइपाठा, धरमडोह, खोंगडा, अम्बापाटे, दत्त गिरी जलालपूर, बोपापूर या भागात साहित्याचे वितरण करण्यात आले. या उपक्रमाचा प्रारंभ युवा अग्रवाल संमेलनाचे मार्गदर्शक नीकेश गुप्ता यांच्या मार्गदर्शनात व अग्रवाल समितीचे अध्यक्ष दीपक गोयनका, शाखेचे अध्यक्ष प्रतीक अग्रवाल, सचिव कुशल गोयनका यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

# गांधी चौकात भगवान महावीरस्वामींच्या पावापुरीचा देखावा

## १० नोव्हेंबरपर्यंत दर्शनार्थ खुला

■ महासागर प्रतिनिधी,

अकोला, दि. ६ : भगवान महावीर स्वामी यांच्या व्या निर्वाण वर्षानिमित्त महानगरात सकल श्वेतांबर जैन समाजाच्या वतीने अनेक कार्यक्रम होत असून त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. भगवान महावीर स्वामी २५५० निर्वाण कल्याणक महामहोत्सव समितीच्या वतीने आयोजित या महाउत्सवात गांधी चौकात पाच दिवसीय भगवान महावीर निर्वाण स्थळ पावापुरी जलमंदिर देखावा साकार केला आहे.

हा नयनरम्य देखावा १० नोव्हेंबरपर्यंत दर्शनार्थ खुला राहणार आहे. या देखावा कार्यक्रमाचा प्रारंभ या पावापुरी जल मंदिराचे मुख्य लाभार्थी प्रेमचंद भिखाभाई शाह परिवार हस्ते भरत शाह कुटुंब यांच्या उपस्थितीत जेष्ठ समाजसेवी साकरचंद



शाह यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी अनेक मान्यवरांनी या देखाव्यास भेट देत महावीर स्वामी यांच्या प्रतिमेचे दर्शन घेतले. या महाउत्सवात रविवार, १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता संघवी वाडी येथे सर्व महावीर भक्तांसाठी शासन स्पर्शना हा संगीतमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. अहिंसा परमो धर्म या संकल्पनेवर आधारित या संगीतमय कार्यक्रमात मुंबई येथील प्रसिद्ध संगीतकार भाविक शाह हे महावीर यांच्या गीतांवर हा कार्यक्रम साकार करणार आहेत.

या महामहोत्सवात समस्त सकल श्वेतांबर जैन समाजाने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन भगवान महावीर स्वामी २५५० निर्वाण कल्याणक महामहोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे. या देखावा कार्यक्रमात भगवान महावीर स्वामी निर्वाण कल्याणक महामहोत्सव समितीचे अध्यक्ष राजेश शाह, सतीश कोठारी, महेंद्र मेहता, राजू भंडारी, स्वप्निल शाह, सुभाष शाह, विक्रम गोलेछा आदी उपस्थित होते.

१० नोव्हेंबरपर्यंत दर्शनार्थ खुला

■ महासागर प्रतिनिधी,

अकोला, दि. ६ :भगवान महावीर स्वामी यांच्या व्या निर्वाण वर्षानिमित्त महानगरात सकल श्वेतांबर जैन समाजाच्या वतीने अनेक कार्यक्रम होत असून त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. भगवान महावीर स्वामी २५५० निर्वाण कल्याणक महामहोत्सव समितीच्या वतीने आयोजित या महाउत्सवात गांधी चौकात पाच दिवसीय भगवान महावीर निर्वाण स्थळ पावापुरी जलमंदिर देखावा साकार केला आहे. हा नयनरम्य देखावा १० नोव्हेंबरपर्यंत दर्शनार्थ खुला राहणार आहे.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **NIDA / NIDA MUZAFFAR KHAN.** NOW MY NEW NAME IS **NIDA FATIMA MUZFFAR KHAN** .
**ADD** : PLOT NO. 87/A, SANJAY BAGH COLONY, RAZA CHOWK, DR. AMBEDKAR MARG, NAGPUR 440017 MS

MY OLD NAME WAS **ZAFAR KHAN.** NOW MY NEW NAME IS **ZAFAR KHAN MAJID KHAN.**
**ADD** : HOUSE NO.289, JAWAHAR WARD, SARKARI DAWAKHANA DESAIGUNJ, GADCHIROLI - 441207

MY OLD NAME WAS **SHABANA BEGUM.** NOW MY NEW NAME IS **SHABANA BEGAM ZAFAR KHAN.**
**ADD** : HOUSE NO.289, JAWAHAR WARD, SARKARI DAWAKHANA DESAIGUNJ, GADCHIROLI - 441207

MY OLD NAME WAS **NOOR MOHAMMAD PATHAN SHAMIM PATHAN.** NOW MY NEW NAME IS **SHAMIM NOOR MOHAMMAD PATHAN.**
**ADD** : PLOT NO.36, NETAJI CO.OPP.HOU.SOCIETY,NEAR PALLOTI SCHOOL, SURAJ NAGAR ,NAGPUR 440013 MS

MY OLD NAME WAS **AMAR LAXMANDAS SAHAJRAMANI.** NOW MY NEW NAME IS **AMARLAL LAXMANDAS SAHAJRAMANI.**
**ADD** : PLOT NO. 16 SINDHU NAGAR SOCIETY JARIPATKA NAGPUR 440014

# दक्षिण-पश्चिमविभाग आंतर विद्यापीठ ज्युडो (पुरुष) स्पर्धेकरीता विद्यापीठाची चमू घोषित

■ महासागर प्रतिनिधी,

अमरावती, दि. ६ : एल.एन.सी.टी विद्यापीठ, भोपाळ येथे २७ ते ३० नोव्हेंबर, २०२४ दरम्यान होणा-या दक्षिण-पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ ज्युडो (पुरुष) स्पर्धेकरीता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संघाची चमू घोषित करण्यात आली आहे.




चमूमध्ये बी.बी. आर्टस्, एन.बी. वाणिज्य व बी.पी. विज्ञान महाविद्यालय, दिग्रसचा सागर जाधव व साबीर चौहाण, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा केशव तित्राम, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचा राज नंदवंशी व वेद बुंदेले, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीचा ओमसिंह चौहाण आणि जी.एस. टोम्पे महाविद्यालय, चांदुरबाजारचा यश पिढेकर यांचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व खेळाडूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे.

चमूचा प्रशिक्षण वर्ग डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती येथे दि. १५ ते २४ नोव्हेंबर दरम्यान होणार आहे. प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.



# आजीमाजी सैनिक सेवाभावी संस्थेच्या वतीने चव्हाण, देशपांडे यांचा सत्कार

## गांधी पीस फाउंडेशन नेपाळतर्फे डॉक्टरेट सन्मान

**बार्शीटाकळी :** देशभक्त आजी-माजीसैनिक सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष, माजी सैनिक डॉ. मनोहर गोकुळ चव्हाण यांना उल्लेखनीय समाज कार्य व सैनिकांसाठी केलेल्या कार्याबद्दल गांधी पीस फाउंडेशन नेपाळतर्फे डॉक्टरेट सन्मान मिळाल्याबद्दल व डॉ. रघुवीर देशपांडे यांना गांधी नोबेल पुरस्कार मिळाल्याबद्दल देशभक्त आजी-माजीसैनिक सेवाभावी संस्थेच्या वतीने बार्शीटाकळी येथील राजयोग मंगल कार्यालय आळंदा फाटा येथे सत्कार करण्यात आला.

डॉक्टरेट मिळवणारे अकोला जिल्ह्याचे व भारतीय सेनेतील पहिले सैनिक आहेत. मेजर डॉ. मनोहर गोकुळ चव्हाण हे काजळेश्वर गावाचे भूमिपुत्र असून त्यांना समाजकार्यामध्ये डॉक्टरेट पदवी प्राप्त झाली. त्याबद्दल संघटनेचे सर्व पदाधिकारी व जिल्ह्यातील सर्व आजी-माजी सैनिक बांधव परिवारा सोबत या कार्यक्रमाला उपस्थित होते, अशी माहिती संघटनेचे सचिव मेजर श्रीकृष्ण आखरे यांनी दिली. सुभेदार अर्जुन बुधनेर, मेजर किशन राठोड, मेजर सदानंद वानखडे, मेजर दत्ता ढोरे, मेजर दीपक गाडगे, मेजर विठ्ठल इंगळे व अकोला जिल्ह्यातील आजी-माजीसैनिक सहपरिवार या कार्यक्रमाला उपस्थित होते.

# श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालया तर्फे बेघर निवारा येथे राहणाऱ्यांसोबत साजरी



■ महासागर प्रतिनिधी,

अकोला, दि. ६ : श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातर्फे बेघर निवारा येथे राहणाऱ्यांसोबत सामाजिक दिवाळी साजरी करण्यात आली.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे, वाणिज्य व्यवस्थापन शाखेचे प्रमुख डॉ. संजय तिडके, मानव विद्या शाखेचे प्रमुख डॉ. नाना वानखेडे, समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आनंदा काळे, मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय पोहरे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. सचिन भुतेकर, अमरावती विद्यापीठाचे ब्रँड अँबॅसिडर रोहन बुंदेले, निवारा व्यवस्थापक उषा राऊत, अक्षय बुंदेले उपस्थित होते.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तथा सर्वोपचार रुग्णालय, आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांतर्फे आरोग्य तपासणी व औषधी वाटप करण्यात आले. सामाजिक दिवाळी उपक्रमाकरिता महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आर्थिक स्वरूपात मदत केली. कार्यक्रमाला राष्ट्रीय छात्र सेनेचे राष्ट्रीय सेवा योजनेचे रोहन मोराडे, साक्षी तायडे, खुशी जाधव, मयुरी सिरसोले, सेजल ठाकरे, तेजस्विनी इंगळे आदी विद्यार्थी उपस्थित होते.

**नागपूर सुधार प्रन्यास**

**जाहीर सूचना**

मौजा-चिंचभवन, खसरा क्रमांक 32/1 (पार्ट), 32/2 (पार्ट), क्राऊन को. ऑप. हाऊसींग सोसायटी या अनधिकृत अभिन्यासातिल भुखंडाचे नियमितीकरणावर त्वरीत निर्णय घेण्याबाबत व मा. उच्च न्यायालयाचे दिनांक 14/08/2024 चे आदेश प्राप्ती पासून कोणत्याही परिस्थितीत 3 महीन्याचे कालावधीत याचीकाकर्ता भुखंडधारकाचे नियमितीकरणाचे अर्ज निकाली काढण्याबाबतचे मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपिठ यांचे रिट याचीका क्र. 1662/2023 मध्ये आदेश प्राप्त आहेत. मा.उच्च न्यायालय च्या आदेशाच्या अनुषंगाने याचीकाकर्ता यांना दि. 28/10/2024 रोजी सुनावणी देण्यात आलेली होती व तसेच पुढील सुनावणी दि. 12/11/2024 रोजी ठेवण्यात आलेली आहे.

तत्पुर्वी क्राऊन को. ऑप. हाऊसींग सोसायटी प्लॉट धारक असोसिएशन यांनी सादर केलेल्या नविन अभिन्यास नकाशाच्या नियमितीकरणाबाबत सुनावणी देण्यात आलेली आहे. सदर सूनावणी दरम्यान उक्त अनधिकृत अभिन्यासात जो गुंठेवारी कायद्याअंतर्गत नासुप्र व्दारे दिनांक 01/11/2003 ला नियमित करण्यात आलेला आहे त्याच अभिन्यास नकाशास कायम ठेवण्याचा निर्णय दि. 22/05/2024 रोजी घेण्यात आलेला आहे. व संबंधीतांना सदर्हु आदेश दि. 24/05/2024 च्या पत्रान्वये कळविण्यात आलेला आहे.

तरी सुध्दा मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक 14/08/2024 रोजीचे आदेश लक्षात घेऊन सदर प्रकरणी खसरा क्रमांक 31/1 (पार्ट), 32/2 (पार्ट), मौजा-चिंचभवन, क्राऊन को.ऑप. हाऊसींग सोसायटी या अभिन्यासातील भुखंडधारकांनी या सुचनेद्वारे आपले लेखी आक्षेप / म्हणणे नागपूर सुधार प्रन्यास, स्टेशन रोड, सदर नागपूर येथे दि. 12/11/2024 पुर्वी सादर करावे.

**कृपया याची नोंद घ्यावी.**

स्वा./-
महाव्यवस्थापक,
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर

जाहिरात क्र. अधि.अभि./58/2024-25
दिनांक : 06.11.2024

**Format C-1**

*(for candidate to publish in Newspaper, TV)*

**Declaration about Criminal Cases**

As per the judgment dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No.536 of 2011 (Public Interest Foundation and others V/s. Union of India and Another's)

**Name and address of Candidate: RISHIKESH (BUNTY) NARAYAN SHELKE** ALSO KNOWN AS **BUNTY BABA SHELKE**, R/O. HOUSE NO. 222, "BABA SHELKE HOUSE", DASARA ROAD, RAJPATH CHOWK, MAHAL, NAGPUR-440032

**Name of Political Party :- INDIAN NATIONAL CONGRESS**

**Name of Election :- MAHARASHTRA STATE ASSEMBLY ELECTION, 2024**

**Name of Constituency :- 55, CENTRAL ASSEMBLY CONSTITUENCY, NAGPUR**

I, **RISHIKESH (BUNTY) NARAYAN SHELKE** ALSO KNOWN AS **BUNTY BABA SHELKE**, a candidate for the abovementioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

**(A) Pending criminal cases**

| Sl. No. | Name of Court | Case No. and dated | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|
| 1 | Additional Chief Judicial Magistrate, 8th Court, Esplanade, Mumbai | POLICE CASE PS NO. 800902/2024 REGISTRATION DATE- 19/08/2024 NEXT DATE- 30/12/2024 | IPC 143 - BEING MEMBER OF UNLAWFUL ASSEMBLY.<br>IPC 145 JOINING OR CONTINUING IN UNLAWFUL ASSEMBLY, KNOWING IT HAS BEEN COMMANDED TO DISPERSE<br>IPC 149 - OFFENCE COMMITTED BY ANY MEMBER OF AN UNLAWFUL ASSEMBLY IN PROSECUTION OF THE COMMON OBJECT OF THAT ASSEMBLY.<br>IPC 188 - DISOBEDIENCE TO ORDER PROMULGATED BY PUBLIC SERVANT.<br>135- MAHARASHTRA POLICE ACT PENALTY FOR CONTRAVENTION OF RULE OR DIRECTIONS<br>37 (3) MAHARASHTRA POLICE ACT POWER TO PROHIBIT CERTAIN FOR PREVENTION OF DISORDER<br>"NOT HEARD CASES"- SUMMONS ARE YET TO BE ISSUED |
| 2 | 11TH J.C.J.J.D. & JMFC, PUNE | S.C.C. NO. 64848/2024 REGISTRATION DATE-13/06/2024 NEXT DATE- 14/11/2024 | IPC 188 - DISOBEDIENCE TO ORDER PROMULGATED BY PUBLIC SERVANT.<br>IPC 336 ACT ENDANGERING LIFE OR PERSONAL SAFETY OF OTHERS<br>3- MOTOR VEHICLES ACT NECESSITY FOR DRIVING LICENSE<br>5- MOTOR VEHICLES ACT RESPONSIBILITY OF OWNERS OF MOTOR VEHICLES FOR CONTRAVENTION OF SECTIONS 3 & 4<br>199 (A) - MOTOR VEHICLES ACT OFFENCE BY JUVENILES<br>"UNREADY BOARD"- SUMMONS ARE YET TO BE ISSUED |
| 3 | 14TH J.C.J.J.D. & JMFC, NAGPUR | S.C.C. NO. 11648/2022 REGISTRATION DATE- 09/06/2022 NEXT DATE- 21/11/2024 | IPC 323 VOLUNTARILY CAUSING HURT.<br>IPC 506 CRIMINAL INTIMIDATION<br>"N.B.W. UNREADY" |
| 4 | JMFC, RAILWAY COURT, NAGPUR | R.C.C. NO. 123/2023 REGISTRATION DATE- 22/02/2023 NEXT DATE- 02/12/2024 | IPC 141 UNLAWFUL ASSEMBLY<br>IPC 143 - BEING MEMBER OF UNLAWFUL ASSEMBLY.<br>IPC 341 - WRONGFUL RESTRAIN.<br>"AWAITING SUMMONS" |
| 5 | 9TH J.C.J.J.D. & JMFC, NAGPU | R.C.C. NO. 1557/2023 REGISTRATION DATE- 11/05/2023 NEXT DATE- 12/11/2024 | IPC 143 - BEING MEMBER OF UNLAWFUL ASSEMBLY.<br>IPC 147 - RIOTING.<br>IPC 149 - OFFENCE COMMITTED BY ANY MEMBER OF AN UNLAWFUL ASSEMBLY IN PROSECUTION OF THE COMMON OBJECT OF THAT ASSEMBLY.<br>IPC 341 - WRONGFUL RESTRAIN.<br>IPC 353- ASSAULT OR CRIMINAL FORCE TO DETER POLICE SERVANT FROM DISCHARGE OF HIS DUTY.<br>IPC 504- INTENTIONAL INSULT WITH INTENT TO PROVOKE BREACH OF PEACE.<br>"SUMMONS READY" |
| 6 | 9TH J.C.J.J.D. & JMFC, NAGPUR | S.C.C. NO. 4569/2023 REGISTRATION DATE- 18/04/2023 NEXT DATE- 19/11/2024 | IPC 143 - BEING MEMBER OF UNLAWFUL ASSEMBLY.<br>IPC 188 DISOBEDIENCE TO ORDER DULY PROMULGATED BY PUBLIC SERVANT<br>IPC 341 - WRONGFUL RESTRAIN.<br>135 OF MAHARASHTRA POLICE ACT- PENALTY FOR CONTRAVENTION OF RULE OR DIRECTION<br>"SUMMONS READY" |
| 7 | 7TH J.C.J.J.D. & JMFC, NAGPUR | S.C.C. NO. 22726/2022 REGISTRATION DATE- 14/12/2022 NEXT DATE- 28/11/2024 | IPC 143 - BEING MEMBER OF UNLAWFUL ASSEMBLY.<br>IPC 188 DISOBEDIENCE TO ORDER DULY PROMULGATED BY PUBLIC SERVANT<br>135 OF MAHARASHTRA POLICE ACT- PENALTY FOR CONTRAVENTION OF RULE OR DIRECTION<br>"AWAITING SUMMONS" |
| 8 | 8TH J.C.J.J.D. & JMFC, NAGPUR | S.C.C. NO. 22705/2022 REGISTRATION DATE- 23/12/2021 NEXT DATE- 27/11/2024 | IPC 143 - BEING MEMBER OF UNLAWFUL ASSEMBLY.<br>IPC 188 DISOBEDIENCE TO ORDER DULY PROMULGATED BY PUBLIC SERVANT<br>IPC 269 NEGLIGENT ACT LIKELY TO SPREAD INFECTION OF DISEASE DANGEROUS TO LIFE<br>135 OF MAHARASHTRA POLICE ACT- PENALTY FOR CONTRAVENTION OF RULE OR DIRECTION<br>"FIRST ORDER" |
| 9 | 19TH J.C.J.J.D. & JMFC, NAGPUR | S.C.C. NO. 22568/2022 REGISTRATION DATE- 22/12/2021 NEXT DATE- 14/11/2024 | IPC 448 PUNISHMENT FOR HOUSE TRESS-PASS<br>IPC 504 INTENTIONAL INSULT WITH INTENT TO PROVOKE BREACH OF PEACE<br>IPC 506 PUNISHMENT FOR CRIMINAL INTIMIDATION.<br>"AWAITING SUMMONS" |
| 10 | 14TH J.C.J.J.D. & JMFC, NAGPUR | S.C.C. NO. 18754/2021 REGISTRATION DATE- 10/11/2021 NEXT DATE- 11/12/2024 | IPC 143 - BEING MEMBER OF UNLAWFUL ASSEMBLY.<br>IPC 188 DISOBEDIENCE TO ORDER DULY PROMULGATED BY PUBLIC SERVANT<br>IPC 269 NEGLIGENT ACT LIKELY TO SPREAD INFECTION OF DISEASE DANGEROUS TO LIFE<br>IPC 270 MALIGNANT ACT LIKELY TO SPREAD INFECTION OF DISEASE DANGEROUS TO LIFE<br>135 OF MAHARASHTRA POLICE ACT- PENALTY FOR CONTRAVENTION OF RULE OR DIRECTION<br>"AWAITING SUMMONS" |
| 11 | 8TH J.C.J.J.D. & JMFC, NAGPUR | R.C.C. NO. 1670/2021 REGISTRATION DATE-25/05/2021 NEXT DATE- 26/12/2024 | IPC 143 - BEING MEMBER OF UNLAWFUL ASSEMBLY.<br>IPC 188 DISOBEDIENCE TO ORDER DULY PROMULGATED BY PUBLIC SERVANT<br>IPC 269 NEGLIGENT ACT LIKELY TO SPREAD INFECTION OF DISEASE DANGEROUS TO LIFE<br>IPC 270 MALIGNANT ACT LIKELY TO SPREAD INFECTION OF DISEASE DANGEROUS TO LIFE<br>IPC 505(1)(C)- STATEMENTS CONDUCING PUBLIC MISCHIEF<br>135 OF MAHARASHTRA POLICE ACT- PENALTY FOR CONTRAVENTION OF RULE OR DIRECTION<br>51(B)- REFUSING TO COMPLY WITH DIRECTIONS<br>3-EPIDEMIC ACT-PENALTY<br>"B.W. READY" |
| 12 | 14TH J.C.J.J.D. & JMFC, NAGPUR | S.C.C. NO. 6517/2021 REGISTRATION DATE-04/05/2021 NEXT DATE- 20/02/2025 | IPC 143 - BEING MEMBER OF UNLAWFUL ASSEMBLY.<br>IPC 341 PUNISHMENT FOR WRONGFUL RESTRAINT.<br>IPC 188 DISOBEDIENCE TO ORDER DULY PROMULGATED BY PUBLIC SERVANT<br>IPC 269 NEGLIGENT ACT LIKELY TO SPREAD INFECTION OF DISEASE DANGEROUS TO LIFE<br>IPC 270 MALIGNANT ACT LIKELY TO SPREAD INFECTION OF DISEASE DANGEROUS TO LIFE<br>135 OF MAHARASHTRA POLICE ACT- PENALTY FOR CONTRAVENTION OF RULE OR DIRECTION<br>51(B)- REFUSING TO COMPLY WITH DIRECTIONS<br>3-EPIDEMIC ACT-PENALTY<br>"AWAITING BAILABLE WARRANT" |
| 13 | 19TH J.C.J.J.D. & JMFC, NAGPUR | R.C.C. NO. 2922/2022 REGISTRATION DATE-21/11/2020 NEXT DATE- 07/11/2024 | IPC 143 - BEING MEMBER OF UNLAWFUL ASSEMBLY.<br>IPC 147 - RIOTING.<br>IPC 149 - OFFENCE COMMITTED BY ANY MEMBER OF AN UNLAWFUL ASSEMBLY IN PROSECUTION OF THE COMMON OBJECT OF THAT ASSEMBLY.<br>IPC 452 HOUSE TRESSPASS<br>3 OF PREVENTION OF DAMAGE TO PUBLIC PROPERTY ACT- MISCHIEF CAUSING DAMAGE TO PUBLIC PROPERTY<br>"AWAITING SUMMONS" |
| 14 | 18TH J.C.J.J.D. & JMFC, NAGPUR | S.C.C. NO. 12220/2021 REGISTRATION DATE-13/08/2021 NEXT DATE- 12/11/2024 | IPC 188 DISOBEDIENCE TO ORDER DULY PROMULGATED BY PUBLIC SERVANT<br>IPC 270 MALIGNANT ACT LIKELY TO SPREAD INFECTION OF DISEASE DANGEROUS TO LIFE<br>135 OF MAHARASHTRA POLICE ACT- PENALTY FOR CONTRAVENTION OF RULE OR DIRECTION<br>"AWAITING SUMMONS" |
| 15 | 19- CHIEF JUDICIAL MAGIS-TRATE, PATIALA HOUSE, DELHI | CR. CASE NO. 9009/2022 REGISTRATION DATE-26/09/2022 NEXT DATE- 26/11/2024 | IPC 283 DANGER OR OBSTRUCTION IN PUBLIC WAY OR LINE OF NAVIGATION<br>IPC 188 - DISOBEDIENCE TO ORDER PROMULGATED BY PUBLIC SERVANT.<br>IPC 336 ACT ENDANGERING LIFE OR PERSONAL SAFETY OF OTHERS<br>IPC 285 NEGLIGENT CONDUCT WITH RESPECT TO FIRE OR COMBUSTIBLE MATTER<br>IPC 269 NEGLIGENT ACT LIKELY TO SPREAD INFECTION OF DISEASE DANGEROUS TO LIFE<br>IPC 435 MISCHIEF WITH FIRE OR EXPLOSIVE SUBSTANCE WITH INTENT TO CAUSE DAMAGE<br>IPC 34 ACTS DONE BY SEVERAL PERSONS IN FURTHERANCE OF COMMON INTENTION.<br>4 PREVENTION OF DAMAGE TO PUBLIC PROPERTY ACT MISCHIEF CAUSING DAMAGE TO PUBLIC PROPERTY BY FIRE OR EXPLOSIVE SUBSTANCE<br>"MISC. CASES" |
| 16 | 12TH J.C.J.J.D. & JMFC, NAGPUR | S.C.C. NO. 6381/2024 REGISTRATION DATE-22/05/2024 NEXT DATE- 14/11/2024 | 135 - DISOBEDIENCE OF AN ORDER LAWFULLY MADE UNDER SECTION 37, 39 OR 40 OF BP ACT OR ABETS THE DISOBEDIENCE THEREOF.<br>IPC 188 - DISOBEDIENCE TO ORDER PROMULGATED BY PUBLIC SERVANT.<br>IPC 171- WEARINIG GARB OR CARRYING TOKEN USED BY PUBLIC SERVANT WITH FRAUDULENT INTENT<br>IPC 447 - CRIMINAL TRESSPASS.<br>"AWAITING SUMMONS" |
| 17 | 14TH JT. CIVIL JUDGE JR. DN. J.M.F.C. NAGPUR | SCC NO. 18658/2018 REGISTRATION DATE-14/08/2018 NEXT DATE- 13/11/2024 | IPC 294 - OBSCENE ACTS<br>IPC 323 - VOLUNTARILY CAUSING HURT<br>IPC 427 - MISCHIEF THEREBY CAUSING LOSS<br>"B.W. UNREADY" |
| 18 | 8TH J.C.J.J.D. & JMFC, NAGPUR | R.C.C. NO. 3878/2022 REGISTRATION DATE-17/09/2022 NEXT DATE- 28/11/2024 | IPC 143 - BEING MEMBER OF UNLAWFUL ASSEMBLY.<br>IPC 147 - RIOTING.<br>IPC 149 - OFFENCE COMMITTED BY ANY MEMBER OF AN UNLAWFUL ASSEMBLY IN PROSECUTION OF THE COMMON OBJECT OF THAT ASSEMBLY.<br>IPC 297 - TRESS PASSING ON BURIAL PLACES.<br>IPC 341 - WRONGFUL RESTRAIN.<br>IPC 34 - COMMON INTENTION.<br>"AWAITING SUMMONS" |
| 19 | 7TH JT. CIVIL JUDGE JR. DN. J.M.F.C. NAGPUR | SCC NO. 7153/2018 REGISTRATION DATE-26/03/2018 NEXT DATE- 29/11/2024 | IPC 186 - OBSTRUCTING PUBLIC SERVANT IN DISCHARGE OF PUBLIC FUNCTIONS.<br>IPC 294 - DOING ANNOYANCE BY WAY OF OBSCENE ACT OR SONGS.<br>IPC 506 - CRIMINAL INTIMIDATION.<br>"AWAITING N.B.W." |
| 20 | 8TH JT. CIVIL JUDGE JR. DN. J.M.F.C. NAGPUR. | SCC NO. 5446/2018 REGISTRATION DATE-06/03/2018 NEXT DATE- 17/12/2024 | 3 OF PREVENTION OF DAMAGE TO PUBLIC PROPERTY ACT<br>-MISCHIEF CAUSING DAMAGE TO PUBLIC PROPERTY<br>"AWAITING N.B.W." |
| 21 | SEARCHED ON THE OFFICIAL WEBSITE OF COURT BUT NOT FOUND | SEARCHED ON THE OFFICIAL WEBSITE OF COURT BUT NOT FOUND | FIR NO. / CR. NO. 3012/2017<br>PS KOTWALI, MAHAL, NAGPUR.<br>SEC 3 OF PREVENTION OF DAMAGE TO PUBLIC PROPERTY ACT |
| 22 | SEARCHED ON THE OFFICIAL WEBSITE OF COURT BUT NOT FOUND | SEARCHED ON THE OFFICIAL WEBSITE OF COURT BUT NOT FOUND | FIR NO. / CR. NO. 445/2017<br>PS PRATAPNAGAR, NAGPUR.<br>135 - DISOBEDIENCE OF AN ORDER LAWFULLY MADE UNDER SECTION 37, 39 OR 40 OF BP ACT OR ABETS THE DISOBEDIENCE THEREOF. |
| 23 | 11TH JT. CIVIL JUDGE JR. DN. J.M.F.C. NAGPUR | SCC NO. 10344/2016 REGISTRATION DATE-28/06/2016 NEXT DATE- 26/02/2025 | 135 - DISOBEDIENCE OF AN ORDER LAWFULLY MADE UNDER SECTION 37, 39 OR 40 OF BP ACT OR ABETS THE DISOBEDIENCE THEREOF<br>"SUMMONS READY" |
| 24 | 7TH JT. CIVIL JUDGE JR. DN. J.M.F.C. NAGPUR | SCC NO. 11979/2016 REGISTRATION DATE-25/07/2016 NEXT DATE- 12/02/2025 | 3 OF PREVENTION OF DAMAGE TO PUBLIC PROPERTY ACT<br>-MISCHIEF CAUSING DAMAGE TO PUBLIC PROPERTY<br>"AWAITING N.B.W." |
| 25 | 19TH JT. CIVIL JUDGE JR. DN. J.M.F.C. NAGPUR | SCC NO. 6295/2016 REGISTRATION DATE-26/04/2016 NEXT DATE- 29/11/2024 | 135 - DISOBEDIENCE OF AN ORDER LAWFULLY MADE UNDER SECTION 37, 39 OR 40 OF BP ACT OR ABETS THE DISOBEDIENCE THEREOF<br>"AWAITING SUMMONS" |

# दिवाळीत इलेक्ट्रिक गाड्यांना दुप्पट मागणी

## वाढत्या पेट्रोलच्या किमतीमुळे लोकांची पसंती

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. ६: रस्त्यांवर इलेक्ट्रिक वाहनांची संख्या झपाट्याने वाढत आहे. त्यात यंदा दिवाळीमध्ये वाहन खरेदीसाठी नागरिकांनी ई -बाईकलाअधिक पसंती दिल्याचे विक्रीवरून पुढे येते. मागील वर्षी म्हणजेच २०२३ मध्ये दुचाकी इलेक्ट्रिक वाहनांमध्ये जवळपास टक्के वाढ होती. ती यंदा दुप्पट झाली आहे.



प्रदूषणाच्या चिंता व इंधनाच्या किमती गगनाला जाऊन पोहोचल्यामुळे इलेक्ट्रिक वाहनांची मागणी वाढली आहे. शहरात इलेक्ट्रिक वाहनांची संख्या लाखाच्या उंबरठ्यावर पोहोचली आहे. इलेक्ट्रिक वाहने पर्यावरणस्नेही असून ध्वनी प्रदूषणसुद्धा करत नाहीत. त्यामुळे प्रदूषण कमी करण्यासाठी इलेक्ट्रिक वाहनांची मागणी वाढत आहे.

पेट्रोल व डिझेलच्या किमती वाढल्यामुळे वाहनचालकाचे बजेट बिघडत आहे. वीज ही तुलनेने स्वस्त असल्याने इंधनाची बचत होते. भारत सरकार इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी अनेक योजना राबवत आहे. यात सबसिडी, माफक व्याजदर कर्ज व घरच्या गॅरेजमध्ये चार्जिंग स्टेशन उभारणीसाठी अनुदान यांचा समावेश आहे. इलेक्ट्रिक वाहनांचे इंजिन पारंपरिक गाड्यांच्या इंजिनापेक्षा सोपे असते. त्यामुळे देखभाल खर्च कमी होतो.

### भविष्यात किमती कमी होण्याची शक्यता :

इलेक्ट्रिक वाहनांची मागणी वाढत असली तरी काही आव्हाने अजूनही आहेत. चार्जिंग स्टेशनचा अभाव आणि तुलनेने जास्त किंमत ही आव्हाने आहेत, मात्र शासन आणि खासगी कंपन्या चार्जिंग स्टेशनची संख्या वाढवण्यासाठी प्रयत्नशील आहेत, तसेच तंत्रज्ञान सुधारत असल्यामुळे इलेक्ट्रिक वाहनांची किंमत कमी होण्याची शक्यता आहे, असे विक्रेता भरत शर्मा सांगतात.

### अशा आहेत किमती

सध्या बाजारात८० हजारापासून ई बाईकच्या किमतींना सुरूवात होते. गुणवत्ता व बॅटरीच्या आधारावर चार लाखापर्यंतच्या ई बाईक बाजारामध्ये उपलब्ध आहे.

काही नामांकित कंपन्यांच्या गाड्यांना अधिक मागणी आहे. सध्याच्या स्थितीत खरेदीसाठी वेटिंग सुद्धा पाहायला मिळत आहे. साधारण एक आठवड्यापूर्वी गाडी बुक करावी लागत आहे. ग्राहकांकडून एक लाखावर किमतीच्या गाड्यांना अधिक पसंती दिला जात आहे, असे शहरातील विक्रेत्यांकडून सांगण्यात आले.

# पाणी नियोजन बैठकीवरून वादंग

## शेतकऱ्यांची नाराजी

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. ६: काटेपूर्णा प्रकल्पांतर्गत यंदा रब्बी हंगामात पिकांना पाणी सोडण्याबाबत पाटबंधारे विभागाने घेतलेल्या पाणी वापर संस्थांची बैठक काही शेतकऱ्यांनी आक्षेप घेतल्याने वादात सापडली आहे. आधी अभियंत्यांनी विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेचा दाखला देत कालवा सल्लागार समितीची सभा घेत नसल्याचे शेतकऱ्याला कळवले. तसेच पाणी सोडण्याबाबचा निर्णय लवकरच कळवण्यात येईल, असेही सांगितले. मात्र, त्यानंतर दुसऱ्याच दिवशी कार्यकाळ संपलेल्या पाणी वापर संस्थांच्या काही पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली, असा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. याबाबत आता काटेपूर्णा प्रकल्प बचाव संघर्ष समिती शेतकरी संवाद सभा घेणार आहे.



यंदा खरीप हंगामातील शेतमालाचे उत्पादन घटल्याने शेतकरी रब्बी हंगामातून तरी काही उत्पन्न हातात पडेल, या उर्वरित

शेतकऱ्यांचा सहभाग नव्हता अनेक पाणी वापर संस्थांचा कार्यकाळ केव्हाच संपला आहे. तसेच पाणी सोडण्याच्या नियोजन बैठकीला, झालेल्या चर्चेत शेतकरी सहभागी नव्हते. त्यामुळे बैठक, चर्चेत तथ्यच नाही. आम्ही लवकरच शेतकरी संवाद सभा घेणार असून, लवकरच जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊ.

**- ॲड. संतोष गावंडे, समन्वयक, काटेपूर्णा प्रकल्प बचाव संघर्ष समिती.**

पाणीवापर संस्थांशी चर्चा केली सध्या आचारसंहिता सुरू असून, कालवा सल्लागार समितीची जाहीर सभा घेतली नाही. मात्र, पाणी वापर संस्थांच्या पदाधिकाऱ्यांशी पाणी सोडण्याबाबत चर्चा केली. बैठकीत कोणाला डावलण्यात आले नाही. पुढील आठवड्यापासून पाणी सोडण्यास प्रारंभ होईल.

**-पद्माकर घुगे, उपविभागीय अधिकारी, पाटबंधारे विभाग.**

# मेळघाटातील आदिवासी बांधवांना दिवाळीनिमित्त कपडे, मिष्टान्न वाटप

■ महासागर प्रतिनिधी,
नांदगावखंड, दि. ६: आनंदाचा क्षण असलेली दिवाळी साजरी करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटक आपापल्या परीने प्रयत्न करतो. मात्र या धामधुमीत गोरगरीब वंचित राहतात. अशा वंचितांच्या जीवनात आनंद फुलवण्यासाठी जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे उपअभियंता अतुल रामटेके यांनी मेळघाटात जाऊन आदिवासी बांधवांना कपडे, मिष्टान्न व इतर चीज वस्तूंचे वितरण केले.



मेळघाटातील चिखलदरा तालुक्यांतर्गत येणाऱ्या भवई येथे त्यांनी हा उपक्रम राबवला. दिवाळीनिमित्त आदिवासी बांधवांना नवीन कपडे, मिठाई देऊन दीपावलीचा आनंद द्विगुणित करणाऱ्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. अतुल रामटेके हे दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबवतात.

त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी यंदा मेळघाटची वारी केली. यावेळी जि. प. बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता प्रतीक दांडगे, नांदगाव खंडेश्वर पं. स.चे संगणक परिचालक मनीष मदनकर, सामाजिक कार्यकर्ते मिलिंद सवाई, राजेश राऊत आदी उपस्थित होते.

# आचारसंहिता उल्लंघनाच्या ४४ तक्रारी

## सी-व्हीजीलवस्तक्रार दाखल करण्याचे नागरिकांना आवाहन

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. ६ :निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्यास सर्वसामान्य मतदार नागरिकांना आता थेट निवडणूक आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. निवडणूक आयोगाने सी व्हिजिल सिटिझन ॲप विकसित केले आहे. या ॲपवर दाखल होणाऱ्या तक्रारीची दखल घेऊन तातडीने कारवाई केली जाणार आहे. मंगळवारी रात्री वाजेपर्यंत तक्रारी केल्या आहेत.




आचारसंहिता कालावधीत काय करावे आणि काय करू नये, याविषयी निवडणूक उमेदवार, प्रशासन आणि राजकीय पक्षांना माहिती दिली जाते. पण, काहीवेळा आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होते. त्याची तक्रार करणे आता पूर्वीपेक्षा अधिक सुलभ झाले आहे. आचारसंहिता उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सी-व्हिजिल ॲप विकसित केले आहे. या मोबाइल ॲपद्वारे मतदारांना आता थेट आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. या सी- व्हिजिलवर तक्रार प्राप्त होताच तातडीने त्यावर कारवाई केली जाते. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवले जाते. सीव्हिजिल अँड्रॉइड आणि आयओएस डिव्हाइसवर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे. उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी, वापरकर्त्यांनी फक्त ॲप उघडणे, उल्लंघनाचा प्रकार निवडणे आणि घटनेचा तपशील, स्थान, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हिडिओ प्रदान करणे आवश्यक आहे.

# बीएलओंची तक्रार आल्यास कारवाई करावी : कटियार

## निवडणुकीत १००% वोटर स्लिप देण्याची ग्वाही

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. ६ : जिल्हाकचेरीतील बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी व इतर अधिकारी.




विधानसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढण्यासाठी मतदार चिठ्ठ्या प्रभावी माध्यम ठरणार आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व मतदारांना मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांच्या (बीएलओ) मार्फत संपूर्ण वोटर स्लिप देण्यात येणार आहे. याबाबत सूचना देण्यात आल्या असून येत्या दोन दिवसांत मतदार चिठ्ठीचे वाटप सुरू करण्यात येणार आहे. यात कसूर करणाऱ्या बीएलओंविरुद्ध कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी मंगळवारी दिले.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात आज बैठक घेण्यात आली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे व इतर उपस्थित होते. मतदारांना मतदानाआधी मतदान चिठ्ठी मिळाल्यास त्यांना आपले मतदान कोणत्या केंद्रावर आहे, याची माहिती मिळण्यास मदत होते. तसेच मतदान केंद्रस्तरीय अधिकारी प्रत्येक मतदाराच्या घरी गेल्यास त्यांना मतदानासाठी आवाहनही करणे शक्य आहे.

प्रामुख्याने शहरी भागात मतदानाची टक्केवारी कमी असते. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत ज्या भागात कमी मतदान झाले, त्याच भागात जनजागृतीचे उपक्रम राबवावे. या भागावर लक्ष केंद्रीत केल्यास मतदानाची टक्केवारी वाढण्यास निश्चितच मदत होणार आहे. निवडणुकीसाठी दोन आठवड्यांचा कालावधी आहे. या काळात बहुसंख्य मतदारांपर्यंत पोहोचणे शक्य आहे. त्यामुळे मनपा क्षेत्रात मतदार जनजागृतीकडे लक्ष देण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी केली. मतदान करण्यासाठी येणाऱ्या मतदारांसाठी मतदान केंद्रांवर सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. प्रामुख्याने पाणी आणि परिसर स्वच्छ राहील, याची दक्षता घेण्याची सूचनाही त्यांनी केली.

# गौण खनिजाची तस्करी रोखण्यासाठी निवेदन

## राळेगाव तालुक्यामध्ये अवैध मुरूम, वाळू वाहतूक

■ महासागर प्रतिनिधी,
वडकी , दि. ६ : राळेगाव तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात अवैध मुरूम, वाळू तस्करी सुरु असून याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. राळेगाव तालुक्यामध्ये वर्धा नदीची वाळू मुरूमाच्या अवैध खदान मोठ्या प्रमाणात आहे.



तहसील व पोलिस प्रशासनातील काही झारीतील शुक्राचार्यांना विश्वासात घेऊन हे गौण खनिज तस्कर आपला व्यवसाय दिवस रात्र बिनधास्तपणे चालवत आहेत. आत्ता वरिष्ठ अधिकारी निवडणुकीच्या कामामध्ये व्यस्त असल्यामुळे तस्करांचे चांगभले होताना दिसत आहे.

यातून मात्र सर्व सामान्यांना त्रास सहन करावा लागत असून कधी कधी तर साहेब आले पळा पळा असा गोपनीय मॅसेज आला की अनेक वाळू माफिया काहींच्या उभ्या पिकाची नासाडी करतात, ही बाब प्रशासनाच्या निदर्शनास येऊन कधी कारवाई होत नसल्यामुळे यांची मुजोरी वाढली आहेत. अवैध वाळू घाटावरून तस्करी अद्याप सुरुच राळेगाव तालुक्यातील नदी नाला यामध्ये रामतीर्थ, बोरी, आष्टा, रोहिणी, रामगंगा नदी मुधापूर, लाडकी, येवती या ठिकाणावरून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा सुरु असून ही सर्व वाळू शासकीय कामावर वापरत असल्याचे दिसून येते.

# पंधरा वर्षांपासून शेतकऱ्यांना करावी लागतेय बेंबळाच्या पाण्याची प्रतीक्षाच

■ महासागर प्रतिनिधी,
मारेगाव , दि. ६: तालुक्यातील शेती हिरवीगार व्हावी, शेतकरी समृद्ध होऊन त्यांची आर्थिक उन्नती व्हावी, या उदात्त हेतूने जवळपास पंधरा वर्षापुर्वी कुंभा, मार्डी, केगाव, चिंचमंडळ आदी भागातून बेंबळा प्रकल्पाची कामे करण्यात आली. त्यासाठी असंख्य शेतकऱ्यांच्या शेतजमीन संपादित करण्यात आल्या. परंतू अनेक शेतशिवरातून जाणारा कालव्यामध्ये असंख्य मोठे मोठे वृक्ष वाढले असून त्याला भेगा गेल्या असल्याने कालव्याची दुरवस्था झाल्याचे दिसून येत असून त्या रस्त्याने चालनेही काठीन होत आहे.



शिवारात कॅनॉल निर्माण केले, मात्र गेल्या पंधरा वर्षांपासून केगाव चींचमंडळ शिवारात बेंबळाचे पाणी पोहचले नसल्याने सिंचनाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तालुक्यात बोटावर मोजण्या इतक्याच सिंचनाच्या सुविधा आहे. त्यामुळे अनेक शेतकरी कोरडवाहू शेती करत आहेत. त्यात उत्पन्न कमी होत असल्याने नैराशेतून टोकाचे पाऊल उचलल्या जात असल्याने आत्महत्या वाढत असल्याचे जनमानसात बोलल्या जात आहे.

त्यामुळे एवढा मोठा बेंबळा प्रकल्प पांढरा हत्ती ठरत आहे. बेंबळा प्रकल्पच्या माध्यमातून हरित क्रांती व्हावी, शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पाणी पोहचवून त्यांचा आर्थिक स्तर वाढावा, या उद्देशाने प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली. परंतु मारेगाव तालुक्यासाठी बेंबळा प्रकल्प पांढरा हत्ती ठरत असल्याने शेतकऱ्यात बोलल्या जात आहे. बेंबळा प्रकल्प सुरू करताना अनेक शेतकऱ्यांना आपलेही शेत शिवार हिरवेगार होईल असे वाटू लागले होते.

त्यासाठी लागणारी तालुक्यातील केगाव चिंच मंडळ सह इतर शिवारातील हजारो हेक्टर शेतजमीन प्रशासनाने संपादित करून सुरू झालेला प्रकल्प आज खोटा ठरत आहे. बेंबळाचे तालुक्यातील अनेक ठिकाणी अर्धवटच काम झाले आहे. त्यामुळे कॅनॉलमध्ये मोठे-मोठे वृक्ष वाढल्याने कॅनॉल मातीने बुजत आहे.

मार्डीपासून समोर जाणाऱ्या बेंबळा प्रकल्पाची कामे अद्यापही अपूर्ण असल्याने हिवरा केगाव परिसरात बेंबळाचे पाणी पोचलेच नाही. यामुळे या परिसरातील शेतकऱ्यांत संताप व्यक्त केल्या जात आहे. तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीने खरीप पिकाच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. नदीकाठावरील शेतातील पिकाची तर तीनदा पेरणी करून पिके खरडून गेली. खरिपाची पिके गेल्याने रब्बी पिकाच्या माध्यमातून कशी तरी तडजोड करायची म्हणून रब्बीची लागवड केली. परंतु बेंबळाने निराशा केली. या पिकांना पाण्याची नितांत गरज आहे.

# आपुलकी, भूतदयेच्या लख्ख प्रकाशाने उजळल्या झोपड्या

## खासदार संजय देशमुख मित्र मंडळाचा पुढाकार

■ महासागर प्रतिनिधी,
दिग्रस , दि. ६ : दीपोत्सवात सर्व घरे, व्यापारी-प्रतिष्ठाणे, रस्ते व गल्ल्या लख्ख प्रकाशात न्हाऊन निघतात. पण अनेक गरिबांच्या तुटक्या-फाटक्या झोपड्यात यादिवशी किर्रर असतो, ही वस्तुस्थिती असून बऱ्याच लोकांचे लक्ष याकडे जात नाही, हे त्यापेक्षाही दुर्दैवी आहे. हीच बाब हेरून उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शिवसेनेचे यवतमाळ व वाशीम जिल्ह्याचे खासदार संजय देशमुख आपल्या मित्र-परिवारासोब रस्त्याच्याकडेला चिंचोली खुर्द येथील धंदाट झुडूप व तुटक्या-



फाटक्या झोपड्यात जीवन व्यतीत करणाऱ्या पाथरवट समाज बांधवांसोबत फराळ करून आगळ्या-वेगळ्या पद्धतीने मागील वर्षांपासून दिवाळी साजरी करत आहेत. दि. ३ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता तेथे जाऊन त्यांनी सर्वांना दिवाळीच्या फराळाचे वाटप केले व त्यांच्यासोबत बसून फराळसुद्धा केला.

यावेळी खासदार संजय देशमुख, ड. सुधाकर जाधव, रुस्तम पप्पूवाले, सलीम दादूवाले, अमित देशमुख, अ. एजाज, हमीद, प्रज्योत अरगडे, सतीश तायडे, दीपक वानखडे, कैलास स्वर्गे, विठ्ठल चौधरी, विनोद काळे, ड. रवींद्र गावंडे, कैलास वाकोडे, राम नरळे, सखाराम तुंडलवार, दामू राठोड, महादेव घोडे, पुंडलिक स्वर्गे, आनंदा बेले, नितीन मनवर, दादाराव शेंबाडे, गुणवंतराव देशमुख, निखिल देशमुख, प्रतीक देशमुख, दत्ता वानखडे, गजानन कदम, आकाश देशमुख, राहुल देशमुख, प्रतीक सोळंखे सह मित्र पक्षाचे असंख्य मान्यवर उपस्थित होते.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

**पालघरमधील वसई, नालासोपारा आणि बोईसर या तीन मतदारसंघांमध्ये बहुजन विकास आघाडीचे आमदार आहेत. पालघरमध्ये शिवसेनेचे श्रीनिवास वनगा, विक्रमगडमध्ये शरद पवार गटाचे सुनील भुसारा आणि डहाणू मतदारसंघामध्ये विनोद निकोले हे आमदार आहेत. स्थानिक पक्ष असूनही 'बविआ'ने या मतदारसंघांवर वरचष्मा ठेवला आहे; मात्र या मतदारसंघामध्ये लोकसभा निवडणुकीत हेमंत सावरा निवडून आल्याने भाजप समोरील आव्हान वाढले आहे; परंतु शिवसेनेच्या शिंदे आणि ठाकरे गटात नाराजी उफाळून आली. त्याचा फटका महाविकास आघाडी आणि महायुतीलाही बसण्याची शक्यता आहे.**

# प्रमुख पक्षांमध्ये नाराजीनाट्य

'बविआ'साठी ही अस्तित्वाची लढाई आहे, तर युती-आघाडी पालघर जिंकण्यासाठी जोर लावणार आहे. वसई हा जवळपास तीन लाख ५१ हजार मतदार असलेला मतदारसंघ मुख्यतः नायगावपासून वसई ते अर्नाळा असा पश्चिम पट्ट्यात पसरला आहे. या मतदारसंघामध्ये पूर्वीपासून राहणाऱ्या स्थानिक मतदारांची संख्या मोठी आहे. या भागात कोळी, आगरी, वाडवळ, भंडारी, ख्रिस्ती, मुस्लिम आणि गुजराती असे विविध जाती-धर्माचे मतदार असून त्यांची मते निर्णायक आहेत. वसई मतदारसंघ 'बविआ'चा बालेकिल्ला समजला जातो. या मतदारसंघामधून १९९० पासून पक्षाध्यक्ष तथा विद्यमान आमदार हितेंद्र ठाकूर निवडणूक लढवत आहेत. पक्षाने हा मतदारसंघ सातपैकी सहा वेळा हातात ठेवला आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये विजय मिळाल्यानंतर, 'ही माझी शेवटची निवडणूक असेल', असे ठाकूर यांनी पत्रकार परिषद घेऊन जाहीर केले होते; मात्र २०२४ च्या निवडणुकीआधी पुन्हा निवडणूक लढवणार असल्याचे सांगत ते रिंगणात उतरले आहेत. वसईतून महाविकास आघाडीने दिलेला उमेदवार पाहता त्यांनी बविआला पुढे चाल दिली आहे. शरद पवार आणि बाळासाहेब थोरात यांनी ठाकूर यांच्यांशी चर्चा केली होती. नालासोपारा जिल्ह्यातील सर्वाधिक म्हणजे जवळपास पाच लाख ९८ हजार मतदार असलेला मतदारसंघ आहे. या मतदारसंघाची वैतरणापासून ते बरफ पाडा, विरारमधील समेळपाडा, बोळींज, तुळींज, वलई पाडा, मनवेलपाडा अशी हद्द आहे. या मतदारसंघात सर्वाधिक म्हणजेच ४६ टक्के इतके परप्रांतीय मतदार आहेत. तेथील समस्यांवर 'बविआ'कडून तोडगा काढण्याचा नेहमी प्रयत्न केला जातो. शिवाय महापालिकेमध्ये सत्ता असल्यामुळे या भागातील प्रत्येक प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न पक्षाकडून केला जात असल्याने 'बविआ'ला मानणारा मोठा वर्ग आहे. पक्षाचे क्षितिज ठाकूर सलग तीन वेळा निवडून आले असून यंदाही ते रिंगणात आहेत. हा मतदारसंघ भाजपने शिवसेनेकडून पुन्हा मिळवला आहे. यामध्ये भाजपने महायुतीतर्फे राजन नाईक यांना उमेदवारी जाहीर केली आहे. मनसेने विनोद मोरे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे 'बविआ' हा गड राखणार का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.




पालघर जिल्ह्यातील बोईसर विधानसभा मतदारसंघ अनुसूचित जमातीसाठी राखीव आहे. या मतदारसंघाचा निम्मा म्हणजेच ५० टक्के भाग वसई-विरार महापालिकेमध्ये, तर निम्मा भाग पालघर जिल्ह्यामध्ये मोडतो. या मतदारसंघामध्ये वसई पूर्वेच्या गोखिवरे, वालीव नालासोपारामधील संतोष भुवन, पेल्हारपासून मांडवीपर्यंतचा भाग, तर पालघरमधील सफाळे, मनोर आणि बोईसर शहरांचा समावेश होतो. यात उत्तर भारतीय मतदारांची संख्या २५ टक्क्यांपर्यंत वाढली आहे. बोईसर हा औद्योगिक पट्टा आहे. येथील बहुतांश कामगार वर्ग उत्तर भारतीय आहे. तर मनोर, तारापूर हा मुस्लिमबहुल भाग आहे. या मतदारसंघामध्ये २००९पासून 'बविआ'चाच आमदार निवडून येत असून यंदाही पक्षातर्फे विद्यमान आमदार राजेश पाटील हे रिंगणात आहेत. २०१९च्या निवडणुकीत राजेश पाटील यांचा निसटता विजय झाला होता. यंदा महायुतीसोबत महाविकास आघाडीचेही आव्हान त्यांच्यापुढे असणार आहे. २०१९मध्ये सेना-भाजप युतीमधील शिवसेनेच्या विलास तरे यांचे आव्हान पाटील यांच्यासमोर होते; मात्र तेव्हा भाजपतर्फे तिकीट न मिळाल्याने संतोष जनाठे यांनी बंडखोरी केली. ही बंडखोरी 'बविआ'च्या पथ्यावर पडली. आता पुन्हा तरे यांनी शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेश करून उमेदवारी मिळवली आहे. शिवसेनेच्या ठाकरे गटातून डॉ. विश्वास वळवी यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. डॉ. वळवी हे सामाजिक कार्यकर्ते असून विश्वास फाऊंडेशनच्या माध्मयातून त्यांचे काम चालू असते. या मतदारसंघामध्ये तिरंगी लढत बघायला मिळणार आहे. दुसरीकडे ठाकरे गटातर्फे येथे डॉ. वळवी यांचे नाव उमेदवार म्हणून जाहीर झाल्यानंतर पालघर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य कमलाकर दळवी हे नाराज झाले आहेत. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत अविभक्त शिवसेनेचे उमेदवार असलेले कमलाकर दळवी यांनी त्या निवडणुकीत सुमारे ५६ हजार मते मिळवली होती. पराभूत झाल्यानंतरही पक्ष संघटनेत कार्यरत राहून ग्रामीण भागात पक्ष वाढवण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरु ठेवले होते. शिवसेना पक्षफुटी दरम्यान अनेक मातब्बर नेते शिंदे गटात सामील होत असताना,त्यांनी ठाकरे गटात राहून आपले काम सुरू ठेवले होते. लोकसभा निवडणुकीत पालघर लोकसभा मतदार संघाच्या ठाकरे गटाच्या उमेदवार भारती कामडी यासाठी प्रचंड मेहनत घेतली होती. या पार्श्वभूमीवर डॉ. वळवी हे बोईसर विधानसभा मतदार संघातून उमेदवारी मिळवण्यात यशस्वी झाल्यामुळे ठाकरे गटातील अनेक जण नाराज झाले आहेत.

**रण तापले**

पालघर हा एकेकाळी समाजवादी पक्षाचा बालेकिल्ला असणारा मतदारसंघ. दोन वेळा काँग्रेस आणि त्यानंतर अविभाजित शिवसेनेकडे आला. त्यामुळे आत्तापर्यंत हा शिवसेनेचा बालेकिल्ला असून, तब्बल पाच वेळा या पक्षाचे अविनाश सुतार, मनीषा निमकर, कृष्णा घोडा, अमित घोडा आणि श्रीनिवास वनगा हे प्रत्येक वेळी भरघोस मतांनी निवडून आले आहेत. या मतदारसंघातून शिवसेनेच्या ठाकरे गटाकडून जिल्हा परिषदेतील गटनेते जयंत दुबळा यांना उमेदवारी मिळाली आहे. या मतदारसंघामध्ये २०१९ ला श्रीनिवास वनगा निवडून आले; मात्र महाविकास आघाडीचे सरकार पडल्यानंतर ते शिवसेनेच्या शिंदे गटासोबत गेले. त्या वेळी शिंदे यांनी त्यांना विधानसभेत तिकीट देण्याची ग्वाही दिली होती; मात्र वनगा यांना उमेदवारी न देता ती भाजपतून राजेंद्र गावित याना आयात करून त्यांना देण्यात आली. त्यांनी शिंदे यांचा विश्वासघातकी असा उल्लेख करताना ठाकरे यांचे कौतुक केले.

विक्रमगड विधानसभा मतदारसंघातील राजकीय गणिते वेगाने बदलत आहेत. विधानसभेत खरी लढत दुहेरी होत असली तरी सध्या येथे सर्वच पक्षांची उमेदवारीसाठी रस्सीखेच सुरू आहे. शरद पवार गटाने विद्यमान आमदार सुनील भुसार यांना पुन्हा तिकीट दिले आहे, तर भाजपने हरिश्चंद्र भोये यांना उमेदवारी दिली आहे. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम येथून इच्छुक होते. भाजपने लोकसभेला त्यांना थांबवून विधानसभेला विचार करू, असे सांगितले होते; परंतु शिवसेनेच्या शिंदे गटाला हा मतदारसंघ सुटला नाही. त्यामुळे निकम यांनी बंडाचे निशाण फडकावले आहे. विक्रमगड-मोखडा या दोन तालुक्यांत शिंदे गटाची ताकद जास्त आहे. या मतदारसंघात कुपोषण, बेरोजगारी या मुद्द्यांवर निवडणूक लढवली जात असून, यात जव्हार, मोखाडा, विक्रमगड व वाडा तालुक्यातील दोन जिल्हा परिषद गटांचा समावेश आहे. भाजपला मागील निवडणुकीत पराभवाची धूळ चाखावी लागली असली तरी पराभूत उमेदवार हेमंत सवरा सध्या विद्यमान खासदार असून विक्रमगड विधानसभा क्षेत्रातून त्यांना घसघशीत मते मिळाली आहेत. जिजाऊ संघटना आपला उमेदवार उभा करण्याची चाचपणी करीत असून, निकम यांना त्यांची उमेदवारी मिळाली, तर तिरंगी लढतीत पवार यांच्या पक्षाच्या उमेदवाराचा फायदा होण्याची शक्यता आहे.

डहाणू विधानसभा मतदारसंघ हा अनुसूचित जमातीसाठी राखीव आहे. २००९ साली मतदारसंघ पुनर्रचनेत डहाणू आणि तलासरी तालुक्यांचा समावेश झाला. हा मतदारसंघ मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा बालेकिल्ला मानला जातो. या निवडणुकीत महाविकास आघाडीकडून माकपचे विद्यमान आमदार विनोद निकोले यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. महायुतीकडून हा मतदार संघ भाजपला सुटला आहे. वाढवण बंदर, मुंबई-अहमदाबाद रस्त्याची दुरवस्था अशा अनेक प्रश्नांवर निकोले लढले आहेत. त्यांचा साधेपणा, विधानसभेत सर्वाधिक प्रश्न मांडणारा आमदार म्हणून ओळख या त्यांच्या जमेच्या बाजू आहेत. लोकसभा निवडणुकीत पालघर मतदारसंघामध्ये भाजपने निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले, तरी सहापैकी डहाणू विधानसभा मतदारसंघात भाजपचा उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर राहिला. तेव्हापासून निकोले यांची विधानसभेसाठी उमेदवारी पक्की समजली गेली. माकपच्या राज्य समितीने त्यांच्या नावाची घोषणा केल्यानंतर महाविकास आघाडीने पाठिंबा दिला.




# अजितदादांच्या खेळीमुळे निवडणूक अवघड

**आर. आर. पाटील यांचा मतदारसंघ ही तासगाव-कवठे महांकाळची ओळख. येथे आर. आर. पाटील यांच्या पत्नी सुमनताई आमदार आहेत. या वेळी त्यांचे पुत्र रोहित पाटील यांना येथून उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांच्यासाठी निवडणूक अवघड नव्हती; परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माजी खासदार संजयकाका पाटील यांना निवडणुकीत उतरवले आणि अजित घोरपडे-संजयकाकांचे मनोमिलन घडवून आणले. त्यामुळे रोहित यांच्यासमोर तगडे आव्हान उभे राहिले आहे.**

अजित पवार यांनी पुढाकार घेऊन तासगाव - कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघात माजी खासदार संजय पाटील आणि माजी आमदार अजित घोरपडे यांच्यात समेट घडवून आणला आहे. पवारांच्या या खेळीमुळे दिवंगत आर. आर. पाटील यांचे पुत्र रोहित पाटील यांच्या समोर तगडे आव्हान निर्माण झाले आहे. लोकसभा निवडणुकीत संजयकाका यांचा पराभव झाला. त्यात त्यांचा स्वभाव तापट. कवठेमहांकाळमध्ये नुकत्याच झालेल्या एका मारामारी प्रकरणात ही ते अडकले. त्याविरोधात आमदार सुमनताई आणि रोहित यांनी रस्त्यावर उतरून संघर्ष केला. रोहित सध्याच्या युवा पिढीचे प्रतिनिधित्व करतात. त्यांचे वक्तृत्वही चांगले आहे. रोहित पाटील गेल्या तीन - चार वर्षांपासून विधानसभेची तयारी करत आहेत. त्यांचा जनसंपर्क चांगला आहे. प्रबळ विरोधक नसल्यामुळे यंदाची विधानसभा निवडणूक रोहित पाटीलांसाठी काहीशी सोपी जाईल, असे वाटत होते; पण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात पडलेल्या फुटीमुळे रोहित पाटील त्यांची कोंडी झाली आहे. महाविकास आघाडीच्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून रोहित पाटील यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. दुसरीकडे महायुतीच्या जागा वाटपात ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या वाट्याला गेली आहे. अजित पवारांनी ही जागा निवडून आणण्याचा चंग बांधला असून संजयकाका यांनाच उमेदवारी दिली आहे. रोहित पाटील यांचे पारडे काहीसे जड दिसत होते. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत तासगाव-कवठेमहांकाळ मतदारसंघामध्ये भाजपचे उमेदवार असलेले संजय पाटील पिछाडीवर होते. त्यामुळेच अजित पवार यांनी पुढाकार घेऊन माजी आमदार अजित घोरपडे आणि संजय पाटील यांच्यातील वाद मिटवून समेट घडवून आणला आहे. घोरपडे- पाटील यांच्यात झालेल्या समेटामुळे रोहित पाटील यांच्यासमोर तगडे आव्हान निर्माण झाले आहे. प्रारंभी रोहित पाटील यांच्यासाठी सोपी वाटणारी निवडणूक आता चुरशीची होणार आहे. १९९० पासून तासगाव - कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघावर दिवंगत आर. आर. पाटील कुटुंबीयांचे वर्चस्व आहे. आर. आर. पाटील यांनी तासगाव विधानसभा मतदारसंघातून १९९०, १९९५, १९९९ आणि २००४ ची निवडणूक जिंकली होती. मतदारसंघांच्या फेररचनेनंतर तासगाव - कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघातून २००९ आणि २०१४ ची निवडणूकही पाटील यांनी जिंकली होती. त्यांच्या निधनानंतर झालेली पोटनिवडणूक आणि २०१९ ची विधानसभा निवडणूक पाटील यांच्या पत्नी सुमन पाटील यांनी मोठ्या मताधिक्याने जिंकली होती. त्यामुळे या मतदारसंघात रोहित पाटील यांचा पराभव करून विजय खेचून आणणे संजयकाका पाटील यांच्यासाठी फारसे सोपे असणार नाही. आर. आर. पाटील - संजय पाटील यांच्यातील चुरशीच्या लढती राज्याने पाहिल्या आहेत. लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपचे उमेदवार असलेले संजय पाटील यांच्या विरोधात अजित घोरपडे यांनी खासदार विशाल पाटील यांचा प्रचार केला होता.



रोहित पाटील संजयकाका पाटील

जाहीर सभांमधून जोरदार आरोप-प्रत्यारोप झाले होते. संजय पाटील ही जिल्ह्याला लागलेली कीड आहे, अशी जहरी टीका करणारे अजित घोरपडे आता विधानसभा निवडणुकीत त्यांचाच प्रचार करणार आहेत. वरिष्ठ पातळीवरील तडजोडीतून समेट झाला खरा; पण नेत्यांमध्ये झालेले मनोमिलन कार्यकर्त्यांच्या पचनी पडेल का, कार्यकर्ते एकजुटीने काम करणार का, हे लवकरच दिसून येणार आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत निवडणुकीच्या आखाड्यात उतरण्याचा निर्णय संजयकाका पाटील यांनी जाहीर केला. याचवेळी माजी राज्यमंत्री अजित घोरपडे यांनीही संजय पाटील यांना साथ देण्याची भूमिका जाहीर केली.

**लक्षवेधी लढत**


जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात हा निर्णय धक्कादायक आणि अनपेक्षित मानला जात आहे. तासगाव-कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघ महायुतीत कोणत्या पक्षाला जाणार आणि उमेदवार कोण असणार, याबाबत सातत्याने चर्चा होत होती. या चर्चेवर पडदा पडला. हा मतदारसंघ अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला जाणार असल्याचे शिक्कामोर्तब झाल्यानंतर राष्ट्रवादी पक्षातून भाजपचे माजी खासदार संजयकाका पाटील यांना विधानसभेच्या आखाड्यात उतरविण्याचा निर्णय झाला. तासगाव तालुक्यात तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील आणि संजयकाका पाटील यांचे २००८ साली मनोमिलन झाले होते. त्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसकडून संजयकाका सहा वर्षे विधान परिषद सदस्य होते. २०१४ ला त्यांनी राष्ट्रवादीपासून फारकत घेत भाजपमध्ये प्रवेश केला. तब्बल दहा वर्षांनंतर पुन्हा त्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केल्यामुळे संजयकाकांचे एक राजकीय वर्तुळ पूर्ण झाले आहे.

**शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे चिरंजीव आदित्य ठाकरे यांच्याविरोधात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खासदार मिलिंद देवरा यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. उद्धव यांच्यापेक्षाही आदित्य यांनी शिवसेनेतील बंडानंतर शिंदे यांच्यावर अधिक कडवी टीका केली होती. आदित्य यांच्या पराभवासाठी शिंदे यांनी आता मिलिंद यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले असले, तरी त्यांचा हा डाव मुंबईकर किती यशस्वी होऊ देतात, हा प्रश्नच आहे.**

# वरळीच्या 'हॉट सीट'वर काय होणार?

आदित्य ठाकरे वरळी मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. गेल्या वेळीही ते याच जागेवरून निवडून आले होते; मात्र या वेळी त्यांचा मार्ग गेल्या वेळेइतका सोपा दिसत नाही. त्यांच्या विरोधात शिंदे यांच्या शिवसेनेने मिलिंद देवरा यांना उमेदवारी दिली आहे. वरळी मतदारसंघ्घ ही 'हाय प्रोफाईल' जागा आहे. २०१९ मध्ये आदित्य या जागेवरून विजयी झाले होते. त्या वेळी शिवसेना एक होती आणि शिवसेनेची भाजपशी युती होती. त्यांना ८९,२४८ मते मिळाली, तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार सुरेश माने २१,८२१ मतांनी दुसऱ्या क्रमांकावर राहिले. आदित्य जवळपास ६७ हजार मतांनी विजयी झाले होते. त्यानंतर राजकारणाच्या पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. शिवसेनेत दोन गट पडले आहेत. वरळी विधानसभेची जागा मुंबई दक्षिण लोकसभेत येते. हा परिसर देवरा घराण्याचा गड मानला जातो. आदित्य यांना कोंडीत पकडण्यासाठी शिंदे यांनी देवरा यांच्यासारख्या तगड्या चेहऱ्याला रिंगणात उतरवले आहे. राष्ट्रीय राजकारणात मिलिंद यांचे उत्तम वजन आहे. शिवसेनेत येण्यापूर्वी ते काँग्रेसमध्ये होते. १४व्या आणि १५व्या लोकसभेतही त्यांनी मुंबई दक्षिण लोकसभेचे प्रतिनिधित्व केले आहे. आदित्य यांच्याविरोधात मिलिंद यांना उभे करून शिंदे यांनी मोठा राजकीय जुगार खेळला आहे; मात्र मिलिंद आदित्य यांना पराभूत करू शकणार का, मिलिंद निवडणुकीच्या रिंगणात उतरल्यास आदित्यला वॉकओव्हर मिळेल का, असे प्रश्नही राजकीय वर्तुळात उपस्थित केले जात आहेत.




मिलिंद देवरा हे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मुरली देवरा यांचे चिरंजीव. गांधी घराण्याशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते. इंदिरा गांधी, राजीव गांधी, सोनिया गांधी यांच्यांशी संबंध असताना देवरा यांना दक्षिण मुंबईची जागा न सोडल्याने त्यांनी पक्षांतर केले. मिलिंद यांनी २००४ मध्ये राजकारणात प्रवेश केला. काँग्रेसने त्यांना मुंबई दक्षिण मतदारसंघातून उमेदवारी दिली. २००४ आणि २००९ मध्ये या मतदारसंघामध्ये विजयी होऊन मिलिंद देवरा संसदेमध्ये पोहोचले. २०११ मध्ये मिलिंद यांना डॉ. मनमोहन सिंग सरकारमध्ये राज्यमंत्री करण्यात आले. मिलिंद हे मुंबई काँग्रेसचे अध्यक्षही राहिले आहेत. तसेच ते राहुल गांधींच्या जवळचे मानले जात होते; मात्र २०२४ च्या निवडणुकीपूर्वी मिलिंद यांनी शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. शिवसेनेने त्यांना राज्यसभेवर पाठवले. देवरा यांनी २००९, २०१४ आणि २०१९ मध्ये दक्षिण मुंबईतून लोकसभा निवडणूक लढवली होती. २००९ सोडल्यास, मिलिंद देवरा २०१४ आणि २०१९ मध्ये दक्षिण मुंबईतून पराभूत झाले. मिलिंद यांना २००९ मध्ये वरळीतून ३९ हजार, २०१४ मध्ये ३५ हजार आणि २०१९ मध्ये ४१ हजार मते मिळाली होती. २००९ वगळता दोन्ही निवडणुकांमध्ये शिवसेनेच्या उमेदवाराला मिलिंद याच्यापेक्षा जवळपास दुप्पट मते मिळाली. लोकसभेच्या निवडणुकीत वरळीच्या जागेवर उद्धव यांच्या उमेदवाराला सात हजारांची आघाडी मिळाली होती. येथून अरविंद सावंत हे उद्धव यांचे उमेदवार होते. शिंदे यांच्या शिवसेनेने दक्षिण मुंबईतून यामिनी जाधव यांना उमेदवारी दिली होती.

**वलयांकित**

२०१९ च्या आकडेवारीनुसार वरळीमध्ये सुमारे दोन लाख ७१ हजार मतदार आहेत. एके काळी येथे मनसेची स्थिती भक्कम होती; पण २०१९ मध्ये आदित्य रिंगणात आल्याने मनसेने येथे उमेदवार दिला नाही. जातीय समीकरणाबद्दल बोलायचे झाले तर वरळीमध्ये अकरा टक्के दलित आणि नऊ टक्के मुस्लिम आहेत. याशिवाय २.७ टक्के पाटील, दोन टक्के जाधव आणि दोन टक्के कांबळे असे मतदार या भागात आहेत. वरळीतील सर्व मतदार शहरी समाजातील आहेत. १९९० पासून शिवसेनेने फक्त एकदाच ही जागा गमावली आहे. २००९ मध्ये राष्ट्रवादीचे सचिन अहिर यांनी शिवसेनेच्या आशिष यांचा पराभव केला होता. मिलिंद यांचा ट्रॅक रेकॉर्ड खराब आहे. मिलिंद २०१४ पासून एकही निवडणूक जिंकू शकलेले नाहीत; मात्र त्यांच्यासाठी दिलासा देणारी एक बाब आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये या जागेवर शिंदे यांचे उमेदवार अवघ्या सहा हजार मतांनी मागे पडले. दुसरे म्हणजे उद्धव ठाकरे यांनी माहीमच्या जागेवर राज ठाकरे यांचे चिरंजीव अमित यांच्याविरोधात उमेदवार उभा केला आहे. राज आदित्य यांच्याविरोधात प्रचार करू शकतात. या साठमारीमध्ये नक्की कोणाची सरशी होते हे पाहायचे.




# भाजप नेत्यांकडून युती धर्माचे पालन नाही

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ६ :
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाजपच्या महाराष्ट्रातील नेत्यांवर आघाडी धर्माला हरताळ फासण्याचा आरोप केला आहे. यासंबंधी त्यांनी थेट भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाकडे तक्रार केली आहे. या तक्रारीनंतर भाजपच्या स्थानिक नेत्यांचा सूर बदललेला दिसून येत आहे. माहीम विधानसभा मतदारसंघातील भाजपने अमित ठाकरे यांना दिलेल्या कथित पाठिंब्यावर शिंदे नाराज असल्याचे सांगण्यात येत आहे.

### एकनाथ शिंदे यांची थेट भाजप नेतृत्वाकडे तक्रार



एका हिंदी वृत्तवाहिनीच्या वृत्तानुसार, एकनाथ शिंदे यांनी माहीम विधानसभा मतदारसंघात भाजपच्या नेत्यांनी अमित ठाकरे यांनी दिलेल्या पाठिंब्याप्रकरणी थेट भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाकडे तक्रार केली आहे.

महाराष्ट्र भाजपचे नेते आघाडी धर्माचे पालन करत नाहीत, अशा स्पष्ट शब्दांत त्यांनी आपली नाराजी व्यक्त केली. त्यानंतर भाजप नेतृत्वाने राज्यातील नेत्यांची कानउघाडणी केल्याची चर्चा आहे.

**भाजप नेत्यांचा सूर बदलला**

एकनाथ शिंदे यांच्या तक्रारीनंतर भाजपच्या नेत्यांचे सूर बदललेत. आता ते सदा सरवणकर हेच माहीम विधानसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार असल्याचा दावा करत आहेत. माहीम विधानसभा मतदारसंघात सदा सरवणकर हेच महायुतीचे अधिकृत उमेदवार आहेत.

शिंदे गटाने माहीम विधानसभा मतदारसंघात सदा सरवणकर यांना उमेदवारी दिली आहे. या ठिकाणी मनसेने राज ठाकरे यांचे सुपुत्र अमित ठाकरे यांना मैदानात उतरवले आहे. राज ठाकरे यांनी लोकसभा निवडणुकीत महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला होता. या पाठिंब्याची परतफेड म्हणून भाजपच्या आशिष शेलारांसारख्या स्थानिक नेत्यांनी अमित ठाकरे यांना पाठिंबा देण्याचे सूतोवाच केले. पण त्यानंतरही सदा सरवणकर यांनी आपली उमेदवारी मागे घेतली नाही. त्यानंतर राज ठाकरे यांनी शिवसेनेतील बंडखोरी व निवडणूक निशाणी चोरण्याच्या मुद्यावरून थेट शिंदेंवर घणाघात केला.

यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे चांगलेच नाराज झालेत.

या प्रकरणी अन्य एखादा निर्णय झाला तर तो महायुतीच्या टॉप लिडरशीपकडून होईल, असे ते म्हणत आहेत. खासदार नारायण राणे यांनी यासंबंधी केलेले विधान या प्रकरणी अत्यंत सूचक मानले जात आहे.

अमित ठाकरे यांच्या उमेदवारीविषयी नवी माहितीही उजेडात येत आहे. शिंदे गटाने अमित ठाकरे यांच्यापुढे माहीम ऐवजी भांडूप विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याचा प्रस्ताव ठेवला होता.

## अभ्यागत पुस्तिकेत लिहिला अनोखा संदेश....

# राहुल गांधींची दीक्षाभूमीला भेट





■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :
काँग्रेस नेते व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज दीक्षाभूमीला भेट दिली. यावेळी त्यांनी येथील अभ्यागत पुस्तिकेत संदेश दिली. तो वाचून स्मारक समितीच्या सदस्यांनी आनंद व्यक्त केला.

राहुल गांधी यांच्या उपस्थितीत बुधवारी नागपुरात संविधान सन्मान संमेलन आयोजित करण्यात आले होते. ककार्यक्रम स्थळी जाण्यापूर्वी त्यांनी पवित्र दिक्षाभूमीला भेट दिली. त्यांचे स्वागत डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष भदन्त आर्य नागार्जुन सुरई ससाई यांनी स्वागत केले. राहुल गांधी यांनी बुद्ध वंदना केली, ध्यान केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केले. त्यानंतर त्यांनी येथील अभ्यागत पुस्तिकेत संदेश लिहिला. मला ही त्यागाची भूमी नेहमीच प्रेरणा देते... असा हा संदेश आहे.

ओबीसी युवा अधिकार मंचतर्फे आयोजित संविधान संमेलनात ओबीसी, एससी, एसटी आणि महिलांसंबंधित विषयांवर चर्चा करण्यात आली. या संमेलनात विदर्भातील वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी, सामाजिक संघटनांचे प्रमुख सहभागी झाले होते. काँग्रेस कार्यकर्त्यांतर्फे राहुल गांधी यांचे स्वागत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर केले आहे. काँग्रेस नेते मुकुल वासनिक, रमेश चेंनिथला, नाना पटोले, विजय वडेट्टीवार, विकास ठाकरे, प्रफुल्ल गुडघे, अनिस अहमद, बंटी शेळके सोबत होते.

## रासप उमेदवाराचा आत्महत्येचा प्रयत्न

■ वृत्तसंस्था, नांदेड, दि. ६ :
नांदेड - किनवट - माहूर मतदारसंघाचे राष्ट्रीय समाज पक्षाचे उमेदवार गोविंद जेठेवाड यांनी विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. नागरिकांनी त्यांना गोकुंदा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी आदिलाबाद येथे हलवण्यात आले आहे. या घटनेमागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पण आर्थिक व्यवहारातून हा प्रकार घडला असल्याची चर्चा आहे.

## भारत जोडो यात्रेतून अराजकता पसरविण्याचे काम

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ६ :

### फडणवीसांचा गंभीर आरोप



काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याकडून देशात अराजकता पसरवण्याचे काम होत असल्याचा गंभीर आरोप उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. राहुल गांधी यांच्या भारत जोडो या समुहातील अनेक संघटना अतिशय टोकाच्या डाव्या विचारांच्या आहेत. त्यांची ध्येय धोरणे पाहिली, त्यांची कामाची पद्धत पाहिली तर त्या अराजकता पसरवत असल्याचे स्पष्ट आहे, असे ते म्हणालेत.

काँग्रेस नेते राहुल गांधी आज महाराष्ट्राच्या दौऱ्यावर होते. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्यावर देशात शहरी नक्षलवाद पसरवण्याचा आरोप केला आहे.

फडणवीस बुधवारी सकाळी पत्रकारांशी बोलताना म्हणाले, भारत जोडो समुहातील अनेक संघटना अतिशय टोकाच्या डाव्या विचारांच्या आहेत. त्यांची ध्येय धोरणे पाहिली, त्यांची कामाची पद्धत पाहिली, तर त्या अराजक पसरवणाऱ्या संघटना असल्याचे स्पष्ट होते. त्याला अराजकतावादी असेही म्हणता येईल.

एकीकडे राहुल गांधी एक पुस्तक आपल्याला दाखवतात. खरे म्हणजे संविधानाचा सन्मानच केला पाहिजे. पण लाल संविधान का? तुम्ही लाल पुस्तक दाखवून कुणाला इशारा देत आहात? संविधानाचा अर्थ असतो ऑर्डर आणि अराजकतावादाचा अर्थ असतो डिसऑर्डर. तुम्ही अराजक पसरवत आहात. त्यामुळे संविधान व भारत जोडोच्या नावाखाली अराजकता पसवणाऱ्या लोकांना एकत्र करून समाजात विद्वेष आणि अराजकता तयार करण्याचे काम याठिकाणी होत आहे. अर्बन नक्षलवाद हा यापेक्षा वेगळा नाही.

अर्बन नक्षलवादाचा अर्थ असा आहे की, लोकांची मने प्रदूषित व कलुषित करायची. एकात्मतेला धोका निर्माण होईल. हीच अराजकता पसरवण्याचे काम राहुल गांधी यांच्यामुळे देशात होत आहे आणि मी त्यावरच बोललो, असे फडणवीस म्हणाले.

## संविधानाला नक्षलवाद समजता का? पटोलेंचा सवाल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :



फडणवीस यांनी केलेल्या वक्तव्यावर नाना पटोले यांनी प्रत्युतर दिले आहे. फडणवीस लाल रंगाच्या संविधानाला नक्षलवाद समजता का? लाल रंग अपवित्र वाटत असेल, तर तुमचे हिंदुत्व गेले कुठे? असा सवाल नाना पटोले यांनी विचारला आहे. भाजपचे लोक राहुल गांधींना घाबरले आहेत, त्यामुळेच त्यांच्याकडून अशी वक्तव्ये येत असल्याचेही पटोले म्हणाले.

राहुल गांधी यांच्यावर अर्बन नक्षलवादाचा प्रभाव आहे. लोकसभेतील विरोधी पक्षांचे नेते उपद्रवी व अर्बन नक्षलवाद्यांच्या ताब्यात सापडलेत. राहुल गांधींमध्ये आज फार थोड्या प्रमाणात काँग्रेसचा विचार उरला आहे. ते निळ्या रंगातील संविधानाऐवजी लाल कव्हरचे संविधान लोकांना दाखवत आहेत, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले होते. यावर नाना पटोले यांनी त्यांचा खरपूस समाचार घेतला.

कोणत्याही पुजापाठमध्ये लाल रंगाचे वेगळे महत्व आणि पावित्र्य असते. फडणवीसांना लाल रंग अपवित्र वाटत असेल तर, ह्यांचे हिंदुत्व गेले कुठे? सत्तेसाठी हिंदुत्व सोडायला तयार आहेत काय? असा सवाल नाना पटोले यांनी केला.

राहुल गांधींनी संविधान बचाव मोहिमेच्या माध्यमातून ते संविधानाचे पुस्तक दाखवतात. संविधानाच्या पुस्तकाच्या रंग कोणता असावा, हे संविधान विरोधी लोकांना ठरवण्याचा अधिकार नाही. पण लाल रंगावर आक्षेप घेऊन त्याला शहरी नक्षलवाद म्हणत असतील, म्हणजे संविधानालाच हे नक्षलवाद समजत असतील, तर देवेंद्र फडणवीसांना याचे उत्तर द्यावे लागणार आहे, असे नाना पटोले म्हणाले.

आता निवडणुकीत याच मुद्द्यावरून देवेंद्र फडणवीसांच्या वक्तव्याचा आम्ही समाचार घेऊ, असा इशाराही त्यांनी दिला.

## अनाथ मुलांसोबत सोशल हॅन्डस फाउंडेशनची दिवाळी

**लोकजागर**




देशभरात मोठ्या उत्साहात साजरा होणारा सण दिवाळी म्हणजे दीपोत्सव. मात्र, आजही समाजातील अनेक घटक असे आहेत ज्यांच्या आयुष्यात वर्षभर अंधारच असतो.

पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथील माऊली अनाथ आश्रमातील मुलांच्या आयुष्यात सुखाचा प्रकाश यावा म्हणून सोशल हॅन्डस फाउंडेशन, पिंपरी चिंचवड या बहुउद्देशीय संस्थेच्या संकल्पनेतून दिवाळी उत्सव साजरा करण्यात आला. नेहमीच समाजातल्या तळागाळात जाऊन आनंदाचे क्षण घेऊन पोहोचणाऱ्या या सामाजिक संस्थेने यंदा या अनाथ मुलांची दिवाळी गोड केली आहे.

याही वर्षी वायफळ खर्च न करता सोशल हॅन्डस फाउंडेशन सामाजिक बहुदेशीय संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्र येत विविध कार्यक्रम आणि उपक्रम या ठिकाणी पार पाडले. यासाठी संस्थेने प्रमुख पाहुणे म्हणून भवताल संस्थेचे संस्थापक, पर्यावरण तज्ञ अभिजीत घोरपडे यांना आमंत्रीत केले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला या आश्रमातील मुलांनी स्वागत गीत सादर करून सोशल हॅन्डस फाउंडेशन मधील सर्व पदाधिकाऱ्यांचे अनोख्या पद्धतीने स्वागत केले. त्याचबरोबर आईवर कवीता, तबला वादन, माहितीपर भाषण देखील यावेळी विद्यार्थ्यांकडून सादर करण्यात आले.

यानंतर सोशल हॅन्डस फाउंडेशन बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने या विद्यार्थ्यांना दिवाळीच्या निमित्ताने विविध फराळाच्या पदार्थांचे वाटप करण्यात आले. तसेच विविध खेळांचे साहित्य गिफ्ट म्हणून देण्यात आले.


यावेळी भवताल संस्थेचे संस्थापक, पर्यावरण तज्ञ अभिजीत घोरपडे, ओझर्डे इंस्टीट्यूट ऑफ रॅडिकल एज्युकेशन संस्थेचे डायरेक्टर प्रा. भूषण ओझर्डे, ह्यमाऊली अनाथ आश्रमह्चे संस्थापक अध्यक्ष प्रेममूर्ती नवनाथ लिम्हन महाराज, अद्वैत मीडिया संस्थेचे डायरेक्टर नितिन येलमार, सोशल हॅन्डस फाउंडेशनचे संस्थापक मदन दळे, सचिव सचिन अडागळे, अशोक एडगे, राज गोंगडे आदि उपस्थित होते. अभिजीत घोरपडे यांनी मुलांमध्ये सोबत गप्पागोष्टी करत, अभ्यास करून पुढे जा अशी सूचना करतानाच चांगले लोक सदैव तुमच्या पाठीशी असल्याचे सांगितले. दिवाळीच्या आनंदात अनाथांना सामावून घेण्यासाठी सोशल हॅन्डस फाउंडेशन संस्थेच्या पुढाकाराचे कौतुक केले.

या मुलांना शैक्षणिक हातभार लाभावा म्हणून सोशल हॅन्डस फाउंडेशन संस्थेचे सल्लागार प्रा. भूषण ओझर्डे त्यांच्या ओझर्डे इंस्टीट्यूट ऑफ रॅडिकल एज्युकेशन या संस्थेमध्ये मोफत स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण देण्याचे आश्वासन दिले.

शैक्षणिक साहित्य वाटप देखील करण्यात आलं. तसेच सर्वांनी एकत्र येत यावेळी अनेक खेळ खेळले गेले. यावेळी या मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद गगनात मावेनासा झाल्याचं बघायला मिळालं.आमच्या आई वडिलांचे छत्र हरपलं तेव्हापासून आम्ही या ठिकाणीच राहतो. दिवाळीनिमित्ताने सोशल हॅन्डस फाउंडेशन संस्थेचेच्या वतीने आमच्या जीवनातील दिवाळी प्रकाशमय व्हावी. म्हणून करण्यात आलेला हा छोटासा प्रयत्न आमच्यासाठी लाखमोलाचा असल्याची भावना यावेळी विद्यार्थ्यांनी बोलून दाखवली.

■ ■ ■

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे



तुकाराम भाऊराव साठे हे अण्णा भाऊ साठे म्हणून ओळखले जाणारे एक मराठी समाजसुधारक, लोककवी आणि लेखक होते. त्यांचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कृतिशीलतेवर आधारलेले होते.

साठे हे मार्क्सवादी-आंबेडकरवादी प्रवृत्तीचे होते, सुरुवातीला त्यांच्यावर साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव होता. दलित साहित्याचे संस्थापक म्हणून त्यांना श्रेय दिले जाते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत देखील त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती.अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे ठरले आहे. महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत आणि परिवर्तनात या साहित्याचे योगदान हे महत्त्वपूर्ण मानले जाते. आजही मोठ्या संख्येने विद्यार्थी व अभ्यासक हे त्यांच्या या साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास करताना दिसतात.

संयुक्त महाराष्ट्र चळवळ लोकमानसात रुजविण्याचे काम शाहीर अण्णा भाऊ साठे, शाहीर अमर शेख आणि शाहीर द.न. गव्हाणकर यांनी केले. मुंबई, मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र तसेच सीमाभागातील अनेक ठिकाणी शाहिरांनी आपल्या लालबावटा कलापथकाचे कार्यक्रम सादर केले.

साठे यांनी मराठी भाषेत ३५ कादंबऱ्या लिहिल्या. त्यामध्ये फकिरा (१९५९) समाविष्ट आहे, जिला इ.स. १९६१ मध्ये राज्य सरकारच्या उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला आहे. साठेंच्या लघु कथांचा संग्रह १५ आहे, ज्यामध्ये मोठ्या संख्येने बऱ्याच भारतीय भाषांमध्ये आणि २७ अ-भारतीय भाषांमध्ये भाषांतरित केल्या गेल्या आहेत.

कादंबरी आणि लघुकथा यांच्याव्यतिरिक्त साठे यांनी नाटक, रशियातील भ्रमंती, १२ पटकथा आणि मराठी पोवाडा शैलीतील १० गाणी लिहिली. साठेंच्या पोवाडा आणि लावणी यांसारख्या लोककथात्मक कथा शैलींच्या वापराने लोकांमध्ये ते लोकप्रिय बनले व त्यांचे कार्य अनेक समुदायांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला अर्पण केलेल्या फकिरामध्ये, साठेंनी आपल्या समुदायाला पूर्ण भुखमरीपासून वाचवण्यासाठी ग्रामीण रूढिवादी प्रणाली आणि ब्रिटिश शासनाच्या विरुद्ध विद्रोह करणाऱ्या नायक फकिराला चित्रित केले. मुंबई मधील शहरी पर्यावरणाने त्यांच्या लिखाणावर लक्षणीय प्रभाव टाकला. त्यांनी तो डायस्टोपियन परिवाराच्या रूपात दाखवला.. त्यांनी त्यांच्या मुंबईची लावणी आणि मुंबईचा गिरणीकामगार या दोन गाण्यांतून मुंबईला 'दुर्व्यवहारी, शोषणकारी, असमान और अन्यायपूर्ण' असे म्हणले आहे. ■ ■

**: संकलन व संयोजन :**
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

**शब्दार्थ : BBC**

बीबीसी ही पहिली राष्ट्रीय प्रसारण संस्था आहे. ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कंपनी लिमिटेड या नावाने १८ ऑक्टोबर १९२२ मध्ये स्थापित झाल्यानंतर १९२७ मध्ये ही संस्था सार्वजनिक बनली.

ही संस्था अनेक मनोरंजन आणि माहितीपर कार्यक्रम निर्मित करते, जे सर्व जगभरात दूरचित्रवाणी (दूरचित्रवाणी), आकाशवाणी आणि इंटरनेटच्या माध्यमातून प्रसारित केले जातात. माहिती, शिक्षण आणि मनोरंजन पुरवणे हे या संस्थेचे ध्येय आहे. ■

## खिशात लिंबू घेऊन मनसे उमेदवाराचा प्रचार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ६ :
शिवडी विधानसभा मतदारसंघातील मनसेचे उमेदवार बाळा नांदगावकर यांचा एक व्हिडिओ सध्या चांगलाच व्हायरल झाला आहे.

या व्हिडिओत नांदगावकर यांच्या खिशातून एक पिवळे धमक लिंबू खाली पडताना दिसून येत आहे. हे लिंबू रस्त्यावर पडल्यानंतर नांदगावकर ते उचलून लगेच आपल्या खिशात ठेवतात. त्यामुळे ते निवडणूक जिंकण्यासाठी लिंबू-मिरची घेऊन फिरत आहेत का? अशी कुजबूज राजकीय वतुर्ळात सुरू झाली आहे.

# ५० मतदारसंघासाठी ७० जाहीरनामे

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :
अजित पवार यांचा पक्ष राष्ट्रवादी काँग्रेसने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाचा स्वतंत्र जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. इतकेच नाही तर राज्यातील ५० विधानसभा मतदारसंघासाठी ५० जाहीरनामे पक्षाच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

अजित पवार यांच्या एनसीपीने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसंदर्भात आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. ज्यामध्ये राज्यासाठी अनेक मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहेत. कालही महायुतीच्या वतीने जाहीरनामा प्रतिद्ध करण्यात आला होता. त्या व्यतिरीक्त पक्षाच्या वतीने हा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला आहे. अजित पवार यांनी बारामतीसाठी आपला स्वतंत्र जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे.

लाडकी बेहन योजना 1500 रुपयांवरून 2100 रुपये करण्यात येणार, महिला सुरक्षेसाठी पोलिस दलात 25000 महिलांची भरती, धान उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी 25 हजार रुपये देण्याचे आश्वासन, जीवनावश्यक वस्तूंच्या किमती कमी करण्यासाठी प्रयत्न, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे आश्वासन, शेतकऱ्यांच्या पिकांच्या एमएसपीमध्ये 20 टक्के वाढ करण्याचे आश्वासन महाराष्ट्रातील ग्रामीण भागात 45000 जोड रस्ते जोडणे, वृद्धापकाळ निवृत्ती वेतन 1500 वरून 2100 पर्यंत वाढवणे, वीज बिलात 30% कपात, सौरऊर्जेला प्राधान्य, 10 लाख विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी 10000 हजार शिष्यवृत्ती, राज्यात 25 लाख रोजगार निर्माण करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

याआधी महायुतीने 10 आश्वासने देत युतीचा जाहीरनामा जारी केला होता.या प्रचार सभेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार उपस्थित होते. त्यांच्या वतीने 10 आश्वासने जाहीर करण्यात आली होती. आता राष्ट्रवादीचे स्वतंत्र जाहिरनामे आले आहेत.

महारोगी सेवा समिती, वरोरा द्वारा संचालित
आनंद निकेतन विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय आनंदवन



वरोरा जि. चंद्रपूर - ४४२९१४ (महाराष्ट्र) नॅक पुर्नमुल्यांकित बी++
कनिष्ठ महाविद्यालय विभाग- कला, वाणिज्य व विज्ञान
कनिष्ठ महाविद्यालय विभाग- कला, वाणिज्य व विज्ञान
व व्यावसायिक अभ्यासक्रमात - Electronics, IT, OM, SISE, Computer Science
वरिष्ठ महाविद्यालय विभाग- B.A., B.Com., ke B.Sc., तसेच M.A., M.Com., ke M.Sc., आणि Physics, Chemistry, Botany, Zoology Electronics मध्ये संशोधन केंद्र आणि नियमित उत्कृष्ट निकालाची परंपरा आहे.
समस्त जनतेला दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा..!

महासागर
# नागपूर वृत्तसागर
■ गुरूवार, दि. ७ नोव्हेंबर २०२४ ■

## स्टील कंपनीत भीषण स्फोट:१९ कामगार गंभीर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :

नागपूरपासून काही अंतरावरील वर्धा जिल्ह्यातील भुगाव येथील एवोनिथ स्टील कंपनीत भीषण स्फोट झाल्याची घटना घडली आहे. फर्निश विभागाजवळ झालेल्या या स्फोटामुळे मोठी आग लागली, ज्यात कंपनीतील १९ कामगार गंभीर जखमी झाले आहेत.

या स्फोटामुळे कंपनी परिसरात मोठा गोंधळ उडाला असून, जखमींना तातडीने शहरातील सावंगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. काही गंभीर जखमींना नागपूरला हलवण्यात आले असून, त्यांच्यावर तातडीने उपचार सुरू आहेत.

स्फोटाची नेमकी कारणे अद्याप स्पष्ट झालेली नाहीत. मात्र, कुलिंग प्रोसेसचे काम सुरू असताना हा स्फोट झाल्याचे समजते. स्फोटाच्या भीषणतेमुळे कंपनीत मोठ्या प्रमाणावर आग पसरली. स्थानिक नागरिक आणि अग्निशमन दलाच्या त्वरित मदतीने आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत, परंतु आगीच्या रौद्र स्वरूपामुळे नियंत्रण आणणे आव्हानात्मक ठरले आहे. या दुर्घटनेत कंपनीचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचेही स्पष्ट होत आहे.

विशेष म्हणजे, याआधीही कंपनीत स्फोटाची घटना घडली होती. त्या वेळी आमदार बच्चू कडू यांनी कंपनी व्यवस्थापनास कामगारांच्या सुरक्षेविषयी कठोर सूचना दिल्या होत्या. व्यवस्थापनाने पुन्हा दुर्लक्ष केल्याचे दिसत आहे. या घटनेतील जखमी कामगारांना नागपूर येथे दाखल करण्यात आल्याची माहिती आहे.

# राहुल गांधींचे नागपुरात जल्लोषात स्वागत
## शांतीदुत बुद्धासमोर समोर झाले नतमस्तक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

महाराष्ट्रात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी संविधान सन्मान संमेलनाच्या निमित्ताने बुधवारी नागपुरात आले.

राहूल गांधी यांनी सर्वात आधी दीक्षाभूमीला भेट देत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत भगवान बुद्ध यांना अभिवादन केले. नागपुरात आगमन होताच राहूल गांधी यांचे अनेक ठिकाणी जल्लोषात स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाचे निमित्त साधून विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचे रणशिंग फुंकले आहे.

ओबीसी युवा अधिकार मंचतर्फे सुरेश भट सभागृहात संविधान सन्मान संमेलन आयोजित



करण्यात आले होते. या संमेलनासाठी राहुल गांधी नागपुरात आले होते. यामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला. त्यांनी राहुल गांधी यांच्या स्वागतासाठी जय्यत तयारी केली होती.

९३ वर्षीय लीलाबाई चितळे यांनी राहूल गांधी यांचे स्वागत केले. त्याच्यासोबतची भेट प्रेरणादायी होती. त्यांनी १९४२ च्या भारत छोटो आंदोलनात सहभाग घेतला होता. त्या बाळापूर येथील यात्रेत सहभागी झाल्या होत्या. संविधानाची सुरक्षा करणे आवश्यक आहे, असे त्यांना राहूल गांधी यांना सांगितले.

लिलाताई चितळे यांनी राहूल गांधी यांचे स्वागत केले. राहुल गांधी यांनी दीक्षाभूमि येथे भेट दिली. यावेळी रमेश चेन्नीथला, पटोले, वडेट्टीवार व काँग्रेस पक्षाचे नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महायुतीचा प्रचार न करणाऱ्यांवर कारवाई

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :



बंडखोरी करणाऱ्या ४० भाजपा पदाधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. यापुढेही पक्षविरोधी कार्य करणाऱ्या, तसेच मित्रपक्षाचा प्रचार करणार नाही किंवा मित्र पक्षाच्या उमेदवार सोडून दुसऱ्या पक्षासाठी प्रचार करतील, असे भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या विरोधात कारवाई केली जाईल, असा थेट इशारा भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला. भाजपा कार्यकर्त्यांसाठी पक्ष हा आईसमान असून त्यासोबत बंडखोरी करणाऱ्यांना पक्षात राहण्याचा अधिकार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

कोराडी (नागपूर) येथे ते माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलत होते. राहुल गांधी बंद दाराआड चर्चा करतात. त्यांना मीडिया देखील नको आहे. त्यांचा प्रयत्न जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा आहे. राहुल गांधी शहरी नक्षलवादाला सहकार्य करण्यासाठी, राष्ट्रविरोधी कारवाईचे समर्थन करण्यासाठी जातात.

काँग्रेसने ८० वेळा संविधानात बदल केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दोन वेळा पराभूत करण्याचे काम काँग्रेसने केले. काँग्रेसला कधीच बाबासाहेबांचे विचार रुजले नाही. राहुल गांधी बाबासाहेबांच्या विचारांचे विरोधी असून ते आता संविधानाच्या गोष्टी करीत आहेत अशी टीका बावनकुळे यांनी केली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडकी बहिणीला वर्षाला २५ हजार रुपये देण्याचे ठरविले आहे, आता १८ हजार मिळत आहेत. त्याच प्रमाणे दिव्यांग, निराधारांना २१०० रुपये महिना मिळणार आहे. ऊद्धव ठाकरे यांचा अजेंडाच महाराष्ट्रात आलेल्या प्रकल्पांना विरोध करणे हाच आहे. यामुळे ते महाराष्ट्राचे नुकसान करत आले आहेत.

राज ठाकरे यांनी विदर्भाच्या मागसलेपणावर त्यांचे मत मांडले असले तरी १० वर्षांपूर्वीचा विदर्भ आणि आजचा विदर्भ यात बदल झाला आहे. काँग्रेसचे ४५ वर्ष आणि आमचे दहा वर्ष यात मोठा बदल झाला आहे. शरद पवार यापूर्वीही पावसात भिजले आहे, कधी सहानुभूती कार्ड खेळले आहे, मात्र जनता आता या सहानुभूती वर जाणार नाही. महायुतीने केलेल्या कामाकडे जनता लक्ष देईल, असे बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.

## आरएसएस आणि भाजप देशाला फसवत आले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

सत्ताधारी आरएसएस आणि भाजप हे देशाला फसवत आले आहेत. ज्यांनी संपूर्ण देश कर्जबाजारी करुन ठेवला आहे. त्यांनी राहुल गांधी यांच्यावर बोलण्याचा अधिकार नाही. राहुल गांधी नाही तर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे माध्यमांना घाबरतात, त्यांनी इतक्या वर्षांमध्ये एकतरी पत्रकार परिषद घेतली का?. राहुल गांधी यांनी आव्हान दिल्यानंतरही त्यांनी पत्रकार परिषद घेतली नाही, असा टोला राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी लगावला आहे.

विजय वडेट्टीवार पुढे बोलताना म्हणाले की, देवेंद्र फडणवीस गृहमंत्री असताना ओबीसी संघटनांना नक्षलवादी म्हणत असतील तर हा त्यांचा अपमान करत आहे.

राज्याचे गृहमंत्री असेलेल्या देवेंद्र फडणवीस यांच्याकडे यंत्रणा आहे, त्यामुळे त्यांनी चौकशी करावी, असे देवेंद्र फडणवीसांच्या राहुल गांधींना अर्बन नक्षलवाद्यांनी घेरले आहे या टीकेवर बोलताना त्यांनी म्हटले आहे.

### विजय वडेट्टीवार यांची सडकून टीका



### शिंदे सरकारच्या काळात अनेक घोटाळे

विजय वडेट्टीवार म्हणाले की, शिंदे सरकारच्या काळात महाराष्ट्रात अनेक घोटाळे झाले. गुजरातच्या अनेक जणांनी यांनी टेंडर दिले. हे सरकार टेंडरबाज, कमीशनखोर आहे. ५ लाख कोटींच्या जमीनी यांनी गुजरातच्या उद्योगपतींना दिल्या आहेत.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, महायुतीच्या प्रचारात ते जनतेला वेगवेगळ्या योजना सुरू करणार असे म्हणत आहे. ते यावेळी सत्तेत राहणार नाही, गेली 3 वर्षे ते राज्यात सत्तेत होते तेव्हा त्यांनी ते का नाही दिले, असा सवाल विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला आहे. तर 10 वर्षे यांचे सरकार असताना त्यांनी खूर्ची उबवत होतात. तेव्हा तुम्हाला या गोष्टी का आठवल्या नाही.

**२३ तारखेनंतर शिंदे सीएम नाहीत**

विजय वडेट्टीवार म्हणाले की, एकनाथ शिंदे २३ तारखेपर्यंत मुख्यमंत्री आहे. त्यानंतर ते मुख्यमंत्री राहणार नाही. मग या योजनानांची पूर्तता कोण करणार, असा सवाल वडेट्टीवारांनी उपस्थित केला आहे. तर अमित शहा हे शेतकऱ्यांच्या कर्जमाफीला उघड विरोध केला आहे, तर राज्यात हे कसे काय आश्वासन देतात, याला भाजपचा पाठहंबा आहे का? असा प्रश्न वडेट्टीवार यांनी यावेळी बोलताना उपस्थित केला.

## निवडणूक काळात बाळगता येतात फक्त ५० हजार रूपये

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :

राजकीय पक्ष, नेते, उमेदवार, कार्यकर्ते यांना माहित असलेल्या आचार संहितेतील तरतुदी सामान्य नागरिकांस माहित असतीलच असे नाही. या तरतुदी माहित नसणारा सामान्य व्यक्ती पण प्रसंगी अडचणीत येवू शकतो.

या निवडणूक काळात प्रवासात किंवा स्वतःजवळ ५० हजार रुपये बाळगता येतात. त्यापेक्षा अधिक रक्कम तपासणीत दिसून आल्यास तुम्हास चौकशीस सामोरे जाण्याची आपत्ती आहे. ५० हजार रुपये जर प्रवासात नाक्यावरील स्थिर तपासणी पथक किंवा भरारी पथक यांना तुमच्याजवळ आढळल्यास त्याचा हिशोब तुम्हास द्यावा लागणार आहे.

म्हणजे हे पैसे कुठून आणले, कशासाठी काढले, कोणास देणार अशी प्रश्न सरबत्ती होणार. त्यासाठी जवळ पुरावा असणे आवश्यक आहे. म्हणजे बँकेतून काढले असल्यास तसा पुरावा लागणार.

चेक देऊन काढले असल्यास चेकची झेरॉक्स किंवा तांत्रिक पुरावा म्हणजे बँकेचा पैसे काढल्याचा एसएमएस संबंधित तपासणी अधिकाऱ्यांस दाखवावा लागेल. तो नसेल तर मग तुमच्याकडील पैसे अधिकारी ठेवून घेईल. त्याची पावती देईल. व सदर रकमेचा पुरावा दिल्यानंतर तुमचे पैसे तुम्हास परत मिळतील. पण याबाबत निवडणूक संहिता थोडी उदार पण आहे. पैसे घेऊन जाणारी व्यक्ती कोण व कशी आहे हे प्रथमदर्शनी सहज ओळखता येवू शकते. म्हणजे शेतकरी शेती खर्चाचे किंवा माल विक्रीचे पैसे घेऊन जात असेल तर त्यास नाहक त्रास देवू नये, खरं काय ते ओळखावे असे धोरण आहे.

पण सामान्य माणूस या तपासणीत गोंधळून जातो. त्याच्याकडे असणाऱ्या रकमेचे त्यास योग्य समर्थन करता येईलच असे नाही. जवळ असलेल्या अधिकच्या पैश्याचे समर्थन पुराव्याशिवाय करता आले नाही तर ते पैसे ठेवून घेत त्या व्यक्तीस बँकेकडून पैसे काढले असे लिहून असणारा कागद आणावा लागणार. याची स्टॅंडर्ड ऑपरेशन प्रोसेस आहे. त्यानुसार कार्यवाही होणार. पण वाद होवू नये म्हणून असलेल्या रकमेचा पुरावा जवळ ठेवणे केव्हाही चांगले, असे सांगण्यात आले.

## गर्दी हेरून चोरट्यांचा धुमाकूळ

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :

दिवाळीच्या हंगामात बसस्थानक, रेल्वे स्थानक आणि बाजारात उसळलेली गर्दी हेरून अशा ठिकाणी चोरटे अधिक सक्रिय झाले आहेत. शहरातील मोर भवन, गणेशपेठ, रेल्वे स्थानक, सीताबर्डी मेनरोडवरील मार्केट आणि अन्य काही ठिकाणी चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे.

दिवाळीच्या काळात आताही बाजारात मोठी गर्दी आहे. बाहेरगावाहून आलेल्या पाहुण्यांसाठी खरेदी करणे सुरू आहे. मोर बसस्थानक आणि अन्य गर्दीची ठिकाणे हेरून चोरटे येथे सावज हेरतात. बसमध्ये चढताना अनेकांच्या पर्सवर हात साफ करण्याच्या घटना वाढल्या आहेत.

सद्यस्थितीत पोलीस अधिकारी आणि कर्मचारी विधानसभा निवडणुकीच्या बंदोबस्तात असून, गुन्हेगारीवर नियंत्रण आणण्याकडे त्यांचे फारसे लक्ष नाही. परिणामी, चोरांचे चांगलेच फावत असून, गेल्या आठवडाभरात शहरात चोरीच्या अनेक घटना घडल्या आहेत.

## सिकलसेल आजारावर जागरूकता कार्यक्रम


■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

हेमॅटोकॉन चा भाग असलेल्या इंडियन सोसायटी ऑफ हेमॅटोलॉजी अँड ब्लड ट्रान्सफ्युजनतर्फे सिकलसेल रोग जागरुकता कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

गुरूवार ७ नोव्हेंबर रोजी सकाळी ९:३० ते दुपारी १:३० या वेळेत इंडियन मेडिकल असोसिएशन हॉल (आयएमए हॉल), उत्तर अंबाझरी रोड, नागपूर येथे हा कार्यक्रम होत असून, डॉ. मोहनदास नारला (यूएसए), अध्यक्ष, अमेरिकन सोसायटी ऑफ हेमॅटोलॉजी, डॉ. कल्पना गुप्ता (यूएसए), डॉ. संतोष सराफ (यूएसए), डॉ. झेनाइड क्वेझाडो (यूएसए), डॉ. प्रा. उन्मुत गुरकान, पीएच.डी. (यूएसए), डॉ. आयझॅक ओदाम (कॅनडा), डॉ. लक्ष्मणन कृष्णमूर्ती (यूएसए) डॉ. तुफान डोलाई (भारत), डॉ. आर. के. जेना (भारत), डॉ. दिप्ती जैन (भारत) डॉ. विंकी रुघवानी आदिंचे प्रत्यक्ष आणि दूरदृष्य प्रणालीद्वारे मार्गदर्शन मिळणार आहे.

१५ वर्षाखालील मुलांचे पालक, सिकलसेल रुग्णांचे पालक, सिकलसेल ॲनिमियासाठी काम करणारे एनजीओ कर्मचारी, १५ वर्षावरील रुग्ण या कार्यक्रमात उपस्थित राहू शकतात. या कार्यक्रमात केवळ ३०० जणांना प्रवेश देण्यात येणार असून, नोंदणी शुल्क ५० रूपये आकारण्यात येईल.

नोंदणीसाठी डॉ.ए.के. गंजू, संघटन सचिव, हेमॅटोकॉन, 9422110765 यांचेशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजन समितीच्यावतिने करण्यात आले आहे.




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

नागपूर येथे मेराकी थिएटर्स आणि मेकर्स अड्डा ह्यांच्या सहयोगाने 'क्लॅप'तर्फे आयोजित नाट्यानुभवात ह्या नाटकाचे दोन प्रयोग होत आहेत. नागपूरच्या प्रेक्षकांना नाट्यानुभवाची ही संधी वारंवार मिळत राहावी असे मेराकी थिएटर्सचे प्रयत्न आहेत. १० नोव्हेम्बर रोजी संध्याकाळी ५ वाजता आणि रात्री ८ वाजता हे प्रयोग होतील.

नाटकाला ग्रामपंचयातीच्या निवडणुकीची पार्श्वभूमी आहे. दोन राजकीय गटातील सत्ता संघर्ष हा नाटकाचा केंद्रबिंदू आहे. 'ग्रामपंचयातीच्या निवडणुका' ह्या एका धाग्याने नाटकातील सगळी पात्र एकमेकांशी बांधली गेली आहेत.

दिनकर दाभाडे लिखित व्हाया सावरगाव खुर्द ह्या कादंबरीतील १८ स्वगतांचा हा एक कोलाज आहे. पात्रांच्या मनसोक्त आणि बेधडक बोलण्यातून नाटकाचे कथानक पुढे पुढे सरकत जाते. नाटकाला ढोबळ अशी काही एक गोष्ट नाही. नाटकातील पात्रांच्या आत्मकथनात्मक निवेदनातून नाटकाची गोष्ट उलगडत जाते. आपल्याला गावातल्या राजकारणाची, सामाजिक परिस्थितीची, माणसांमधल्या लैंगिक नातेसंबंधांची, एकमेकांविषयी असलेल्या द्वेषपूर्ण भावनेची,त्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षेची, कौटुंबिक कलहाची ओळख होत राहते.

काही काळापूर्वीपर्यंत गावे ही गावासारखी होती. अजूनही काही गोष्टी आहेत ज्या आपल्याला गावाच्या गावपणाची ओळख करून देतात. पण गावेसुद्धा आता बदलायला लागली आहेत. गावातल्या लोकांच्या महत्त्वाकांक्षा प्रचंड वाढल्या आहेत. गावात शहर आणि शहरात गाव घुसण्याची ही प्रक्रिया अटळ आहे.

नाटकाचे प्रयोग पुणे, मुंबई, कोल्हापूर आणि विदर्भात सादर झाले आहेत. नाटक द इयर एंड आर्ट फेस्टिवल २०२२, पुणे नाट्यसत्ताक महोत्सव २०२३, अखिल भारतीय विद्रोही मराठी साहित्य सम्मेलन २०२३, महिंद्रा एक्सलन्स इन थियेटर अवॉर्ड्स दिल्ली २०२३ (मेटा) येथे सादर झाले आहेत. मेटा २०२३ आणि झी नाट्यगौरव २०२३ मिळून एकूण ८ नामांकने नाटकाला मिळाली आहेत.

सुयोग देशपांडे आसक्त कलामंच ह्या नाट्यसंस्थेत गेली ८ वर्षे दिग्दर्शक आणि निर्मिती व्यवस्थापक म्हणून काम करत आहे. व्हाया सावरगाव खुर्द हे त्याचे नवीन नाटक आहे.

अभिषेक इंगोले, आनंद डांगरे, अतुल जैन, गिरीजा पातुरकर, इंद्रजीत मोपारी, शितल राउत, स्वप्नील नवले, गोरल पोहाणे हे कलाकार या नाटकात आपल्या अभिनयाची छाप सोडणार असून, अश्रुबा अंभोरे, गोविंद गायकी, तुळशीदास भाकडे, सुखदेवढाणके, अवंती लाटणकर, काशिनाथ ताटे यांनी गाणी आहेत. वेशभूषा देविका काळे यांची आहे.

## दारूड्या वाहन चालकाने तरुणाला चिरडले
### नागरिकांनी धू धू धुतले, पोलिसांकडून अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

मद्यधुंद अवस्थेत असलेल्या ट्रकच्या चालकाने एका तरुणाला चाकाखाली चिरडले. यात त्या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. या अपघातानंतर संतप्त जमावाने आरोपी वाहन चालकाला पकडून बेदम चोप दिला. पोलिस वेळीच घटनास्थळी पोहोचल्याने पुढील अनर्थ टळला.

या घटनेमुळे बराच वेळपर्यंत परिसरात तणाव होता. ही घटना वाठोडा ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी आरोपी ट्रक चालक विष्णू ढाकुलकर (४६) रा. अनमोलनगर याला अटक केली. विवेक विजय रणनवरे (२३) रा. चैतन्यश्वरनगर असे मृत तरुणाचे नाव आहे.

विवेक शिक्षणासाठी नागपुरात आला होता. तो येथे मामाकडे रहात होता. बुधवारी सायंकाळी तो घरासमोर मोटारसायकलवर बसलेला होता.

या दरम्यान टिप्पर क्र. एमएच-49/एटी-6792 चा चालक विष्णू याने त्याच्या मोटारसायकलला धडक दिली. विवेक वाहनासह खाली पडला. ट्रकच्या मागच्या चाकात आल्याने घटनास्थळीच त्याचा मृत्यू झाला. अपघातानंतर विवेकचे नातेवाईक आणि स्थानिक नागरिक गोळा झाले.

संतप्त लोकांनी टिप्पर चालक विष्णू याला पकडून बेदम मारहाण सुरू केली. या दरम्यान एका व्यक्तीने पोलिसांना फोन करून घटनेची माहिती दिली. वाठोडा पोलिस तत्काळ घटनास्थळी पोहोचले. विष्णूला नागरिकांच्या तावडीतून सोडवत ताब्यात घेतले.

नागरिकांच्या मनात विष्णू बद्दल प्रचंड रोष असल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. पोलिसांनी नागरिकांची समजूत काढून त्यांना शांत केले. विष्णू विरुद्ध गुन्हा नोंदवून त्याला अटक करण्यात आली. विद्यार्थ्याच्या मृत्यूने हळहळ व्यक्त होत आहे.

## जल आणि शाश्वत विकास आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

इंडियन वॉटर वर्क्स असोसिएशन नागपूर सेंटरच्या वतीने पाण्याची शाश्वतता आणि अधिक लवचिक न्याय्य जग घडवण्यात त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका याविषयावर आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्स चे आयोजन केले आहे.

व्हीएनआयटी कॅम्पसच्या ऑडिटोरियम येथे ८ व ९ नोव्हेंबर रोजी, सकाळी ९:३० वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संयोजक डॉ. राजेश गुप्ता व अध्यक्ष डॉ. ओ एन मुखर्जी यांनी पत्र परिषदेत दिली.

या कार्यक्रमात अमेरिका, सिंगापूर, दुबई, इंग्लंड आणि इंडियाचे येथील मान्यवर येणार आहे. आणि पाणी आणि शाश्वत विकास 2024, अंतरराष्ट्रीय कॉन्फरन्स मध्ये मार्गदर्शन करणार आहेत



### देश – विदेशातून ६०० प्रतिनिधी उपस्थित राहणार

असे सांगितले. पाण्याची शाश्वतता आणि अधिक लवचिक न्याय्य जग घडविण्यात त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका याविषयी संवाद पुढे नेण्यासाठी पाण्याचे संरक्षण करण्यासाठी आणि सर्वांसाठी अधिक शास्वत आणि समृद्ध भविष्यासाठी मार्ग मोकळा करण्यासाठी आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्सचे आयोजन केले आहे.

या आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्समध्ये देश - विदेशातून ६०० प्रतिनिधींची उपस्थिती राहील. पत्रकार परिषदेला डॉ. ओ एन मुखर्जी, डॉ. राजेश गुप्ता, डॉ. ईशा खेडीकर व मंचावरील उपस्थित अनिरुद्ध देशपांडे, नरेंद्र बांगरे, डॉ. राहुल राळेगावकर यांची उपस्थिती होती.

# जवाहर विद्यार्थी गृहातर्फे विदर्भ स्थरीय भव्य वरवधू परिचय मेळावा कार्यक्रम संपन्न




**महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ६ :** तेली समाजातील विवाह योग्य युवक युवतींचा भव्य विदर्भ स्तरीय परिचय मेळावा आणि सुयोग परिचय पुस्तकाचे प्रकाशन दरवर्षी प्रमाणे या वर्षी २ नोव्हेंबर रोजी दुपारी ३:०० वाजता सिव्हिल लाईन नागपूर येथे रमेश भाऊ गिरडे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला .मागील कित्येक वर्षापासून कार्यक्रमाच्या माध्यमातून मोठ्या संख्येत लग्न जुळलेले आहे. विदर्भ व मध्य प्रदेशाच्या कानाकोपऱ्यातून वर वधू व त्यांचे पालक व मान्यवर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

*प्रमुख पाहुणे डॉ. सतीश चापले इतिहास विभाग प्रमुख प्रामुख्याने उपस्थित होते.त्यांचे स्वागत गुलाबराव जुनकर यांनी केले.त्यांचा परिचय डॉ. दामोधर सातपुते यांनी केला .सर्वप्रथम संत शिरोमणी प.पूज्य संताजी महाराज व स्व.माकडे गुरुजी माजी मंत्री यांच्या पुतळ्यास पुष्पमाला अर्पण करून पूजन करण्यात आले .दीप प्रज्वलन कार्यक्रमाची सुरुवात झाली. मान्यवरांच्या हस्ते सुयोग पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले . वधू वर परिचय मेळाव्यात बोलताना डॉ.सतीश चापले यांनी समाजाला उदबोधन कले,व,रमेश गिरडे यांनी अध्यक्षीय मार्गदर्शन केले.

मिलिंद माकडे सहकार्यवाह,यांनी प्रास्ताविक केले .प्रदीप लाखे यांनी संचालन केले .सुयोग पुस्तकाच्या मेहनती बद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला संचालक नरेंद्र दिवटे , प्रमोद महाजन ,दिलीप तुपकर ,बबीता मेहेर प्रामुख्याने उपस्थित मंगेश घवघवे यांनी आभार प्रदर्शन केले मोठ्या प्रमाणात मान्यवर समाज बांधव व भगिनी उपस्थित होते.

# योगाचार्य सद्गुरुदेव डॉ.दासलाल महाराज आध्यात्मिक योग सत्संगाचे आयोजन



**८ ते १० नोव्हेंबर या कालावधीत तीन दिवसीय**

**महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ६ :** योगाचार्य सद्गुरुदेव डॉ.दासलाल जी महाराज, श्री सिद्ध गुफा सवाधाम यांच्या योगिक आश्रयाखाली श्री हनुमान मंदिर सांस्कृतिक भवन, अंचाबाई धर्मशाळा, आझाद चौक सदर येथे ८ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबर या कालावधीत तीन दिवसीय आध्यात्मिक योग सत्संगाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ५ ते रात्री ९ या वेळेत होणाऱ्या योगाभ्यास, आरती, जीवनतत्त्व साधने आणि योगासने व उपक्रमांबाबत जनतेला या कार्यक्रमात विनामूल्य प्रवेश असेल. या कालावधीत आयोजक सकाळपासून रात्रीपर्यंत सर्व साधकांसाठी व कार्यक्रमात सहभागी होणाऱ्यांसाठी भोग प्रसादाची व्यवस्था करतील. योग- योगेश्वर रामलाल जी महाराज आणि अनंत बिभूषिचचंद्र मोहन जी महाराज यांच्या अपार कृपेने, सिद्ध योग साधक योगमंडळ नागपूर आयोजित या तीन दिवसीय कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी देशभरातून सद्गुरू दसलाल जी महाराजांचे अनुयायी नागपुरात पोहोचणार आहेत. योग शिकू इच्छिणाऱ्या नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या माहितीसाठी ९८२३६६६९५०, ९८३४९३२२५७ आणि ३४२३०७८११२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. लोककल्याणासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात प्रवेशासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.



# वाहनांवरील स्टिकर्स द्वारे मतदान जनजागृती

## जिल्हाधिकारी डॉ. इटनकर यांनी स्वत लावले आय विल वोट फॉर शुअरचे स्टिकर

**महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ६ :** मतदारांच्या मनात आपल्या राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव निर्माण व्हावी तसेच येत्या नोव्हेंबर रोजी जास्तीत जास्त संख्येत घराबाहेर पडून नागरिकांनी लोकशाहीच्या उत्सवात आपले भरीव योगदान द्यावे याकरीता स्वीप अंतर्गत मनपाद्वारे नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत. याचा एक भाग म्हणून मनपाद्वारे वाहनांवर आय विल वोट फॉर शुअरचे स्टिकर लावण्यात येत आहे. जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विनायक महामुनी यांच्या शासकीय वाहनावर सुध्दा स्टिकर लावण्यात आले.

जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी स्वतः आपल्या वाहनावर आय विल वोट फॉर शुअरचे स्टिकर लावून उपक्रमाचा शुभारंभ केला. सिव्हिल लाईन्स स्थित जिल्हाधिकारी कार्यालयातील दालनात आयोजित छोटेखानी समारंभात अतिरिक्त जिल्हाधिकारी श्री तुषार ठोंबरे, मनपाचे अतिरिक्त आयुक्त तथा स्वीपचे नोडल अधिकारी श्री. अजय चारठाणकर, उप जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. प्रवीण महिरे, उपायुक्त डॉ. रंजना लाडे, जनसंपर्क अधिकारी श्री. मनीष सोनी, क्रीडा अधिकारी डॉ. पियुष आंबुलकर प्रामुख्याने उपस्थित होते. आय विल वोट फॉर शुअरचे स्टिकरच्या माध्यमातून येत्या नोव्हेंबरला विधानसभा निवडणुकीत नागपूर शहरातील मतदारांनी अधिकाधिक संख्येत घराबाहेर पडत मतदान करावे याचा संदेश दिला जात आहे.

# बसपा जनसंपर्क कार्यालय सुरू



## दक्षिण नागपुरात जनसंपर्क कार्यालय

**महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ६ :** दक्षिण नागपूर बसपाचे उमेदवार संजय सोमकुवर यांच्या सोमवारीपेठ येथील जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन बसपा नेते नागोराव जयकर, उत्तम शेवडे, रंजनाताई ढोरे, प्रा सुनील कोचे, अमित सिंग यांनी केले. याप्रसंगी बसपा नेत्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केल्यावर सभोजन करून कार्यक्रमाची सांगता केली.

याप्रसंगी प्रामुख्याने चंद्रशेखर कांबळे, आनंद सोमकुवर, नितीन वंजारी, जितेंद्र पाटील, शंकर थुल, विलास मुन, सहदेव पिल्लेवान, संगीत इंगळे, अजय शेवाळे, वासुदेव मेश्राम, निरंजन जांभुळे, सुमित जांभुळकर, सुरज यावले, महीपाल सांगोळे, कविता लांडगे, पंजाब फुलझेले, अभय डोंगरे, प्रवीण पाटील, जगदीश गजभिये, नितीन ठाकरे, अक्षय चिखले, प्रीतम खडतकर, आशिष निस्वाद्ये, सुनील शुक्ला, शिशुपाल सहारे, अंजली सोमकुवर, पल्लवी इंगळे, पंचफुला खंडारे, रुपेश मेंढे, भीमराव बागडे, महावीर मेश्राम, सोनू खान, जगदीश चौरे, रमेश निकोसे, आनंद बोरकर, विजय कांबळे, जगदीश गेडाम, राजकुमार राऊत, सुधाकर भगत, सय्यद शेख, पंकज मातकर, सागर वासनिक, हेमंत बोरकर, बालकदास बावनगडे, सुधाकर रंगारी, विमल इंगळे, लता झरे, विकी नानवटे, अजय हजारे, अभिनव गणवीर, किरण गौरखेडे, ईश्वर तुपकर, राजेश जारुंडे, सचिन पाटील, गौतम सोमकुवर, वामन सोमकुवर, कुणाल चौधरी, अमन गवळी, बंडू पाटील, मनोज मडके, प्रशांत तुपकर, अनिल भोवते, अरुण शेवडे, सतीश भोवते, राजेश पवार, यशवंत तागडे, आशिष मेश्राम, मुकेश वासनिक, सुधीर लीलारे, नितीन घुटके, किशोर चिखले, सुरज ठवरे यांचे सहित शेकडो कार्यकर्ते व पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# भूखंड विक्रीच्या नावावर ३.७० कोटींचा गंडा

## आर. मोर्स डेव्हल्पर्सवर गुन्हा दाखल




**नागपूर, क्राईम रिपोर्टर.** एकाच भूखंडाची तिघांना विक्री केली. त्यांच्याकडून ३ कोटी ७० लाख ५० हजार रुपये घेतले. मात्र, एकालाही भूखंड दिला नाही. फसवणुकीची ही घटना पाचपावली पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी आसीम नावेद मोहम्मद इसरारउल्लाह (५४) रा. आरएमएस कॉलनी, अनंतनगर, गिट्टीखदानच्या तक्रारीवरून आर. मोर्स डेव्हल्पर्सच्या संचालकांवर गुन्हा नोंदविला आहे. आनंद नारायण खोब्रागडे आणि शारदा आनंद खोब्रागडे अशी आरोपींची नावे आहेत.

आसीम यांचा पोकलेन आणि जेसीबी मशीन्स विक्रीचा व्यवसाय आहे. आरोपी खोब्रागडे दाम्पत्य मे. आर. मोर्स डेव्हलपर्स प्रा. लि.चे संचालक असून नवा नकाशा येथे त्यांचे कार्यालय आहे. आरोपी आनंद आणि आसीम एकाच शाळेतून शिकल्यामुळे त्यांच्यात जुनी ओळख होती. ऑक्टोबर २०२२ मध्ये आनंद याने आसीमला फोन करून कामठीच्या रनाळा भागात नवीन लेआऊट टाकत असल्याची माहिती दिली. आसीम यांनी त्याच्या लेआऊटमध्ये भूखंड खरेदीची इच्छा व्यक्त करून ११६ क्रमांकाच्या भूखंडाचा १ कोटी रुपयात सौदा केला. करारनामा झाल्यानंतर त्यांनी आरोपींना पूर्ण पैसेही दिले. मात्र आरोपींनी अनेक महिने लोटल्यानंतरही रजिस्ट्री करून दिली नाही. तसेच भूखंडाचा ताबा देण्यासही टाळाटाळ करू लागले.

आसीम यांनी विचारपूस केली असता एनआयटी आणि एनएमआरडीएकडून रिलीज लेटर आले नसल्याची बतावणी केली. त्यानंतर रिलिज लेटरचे काम करण्यासाठी आणखी २० लाख रुपये घेतले. त्यालाही अनेक महिने लोटले. दरम्यान आसीम यांनी भूखंडाच्या मार्किंगसाठी मजूर पाठवले असता त्यांना शिविगाळ करून मारण्याची धमकी दिली आणि आसीम यांना पुन्हा १ कोटी रुपयांची मागणी केली. पैसे दिले नाहीतर विक्रीपत्र करून देणार नाही, असे सांगितले. शेवटी कंटाळून आसीम यांनी पैसे परत मागितले असता आरोपींनी त्यांना धमकावले. पुन्हा भूखंडावर पायल ठेवल्यास तेथेच पुरण्याची धमकी दिली.

आसीम यांनी माहिती काढली असता आरोपींनी त्यांचाच भूखंड मेसर्स विरानी अॅन्ड कंपनी फायनंशीअर सर्व्हीसेसचे संदीप विरानी यांना दाखवून १ कोटी ३० लाख ५० हजार रुपये घेतले आणि त्यांनाही विक्रीपत्र करून न देता फसवणूक केल्याची माहिती मिळाली. तसेच ११८ क्रमांकाच्या भूखंडाचा विरेंद्रसिंग शेखावत यांच्याशी सौदा करून १ कोटी २० लाख घेतले आणि त्यांनाही भूखंडाचा ताबा दिला नव्हता. तिन्ही पीडितांनी खोब्रागडे दाम्पत्याविरुद्ध पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी फसवणूक, धमकावणे आणि खंडणी मागण्यासह विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

**पवन कुमार सिन्हा हिंगणा विधानसभेचे निरीक्षक...**



**महासागर प्रतिनिधी**
**हिंगणा, दि. ६ :** विधानसभा सार्वत्रीक निवडणूक २०२४ करिता आयएएस अधिकारी पवन कुमार सिन्हा यांची हिंगणा विधानसभा निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणुकी संबंधात कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास तक्रारदारास निवडणूक निरीक्षक पवन कुमार सिन्हा यांच्या कॉटेज क्र. ५, रवि भवन नागपूर येथे सकाळी ९.३९ ते सकाळी १०.३९ वाजेपर्यत भेटता येईल अशी माहिती हिंगणा विधानसभा (५०) उपविभागीय अधिकारी आकाश अवतारे,सहा. निवडणूक निर्णय अधिकारी सचिन कुमावत यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे .

# मार्केट यार्डात कापूस खरेदीचा शुभारंभ



**महासागर प्रतिनिधी**
**भिवापूर, दि. ६ :** आज दि. ०६ नोव्हेबर बुधवार ला भिवापूर कृषी उत्पन्न बाजार समिती भिवापूर येथे मा. सुशीलजी मेश्राम साहेब, संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती भिवापूर यांच्या हस्ते सन २०२४-२५ च्या नविन वर्षाच्या कापूस या शेतमालाचे शुभारंभ करण्यात आले. तरी या शुभारंभाला उपस्थित कृ.ऊ.बा.स. भिवापूर, उपसभापती बंडूजी ढाकुणकर , संचालक तुकारामजी मोहोळ ,. मिलिंद राऊत, आशुतोष मोरे, .राहुल गुप्ता,कृ. ऊ.बा.स.भिवापूर चे सचिव रामकृष्ण गोंगल तसेच संबंधित व्यापारी, अडतिया, त्याचप्रमाणे शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. संबंधीत शेतकऱ्याच्या कापूस या शेतमालाची बोली काढली असता संबंधीत शेतकऱ्याच्या मालाला ७१०० रू. प्रति क्विंटल भाव मिळाला.

# मध्य रेल्वे नागपूर विभागाने बेतुल रेल्वे स्टेशनवर स्टेशन महोत्सव साजरा केला, रेल्वे वारशाचा गौरव

**महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ६ :** मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने ०३ नवंबर २०२४ रोजी सेवाग्राम रेल्वे स्टेशनवर स्टेशन महोत्सव चे आयोजन केले. भारतीय रेल्वेच्या समृद्ध वारशाचा सन्मान करण्यासाठी आणि त्याच्या ऐतिहासिक योगदानाबद्दल जनजागृती करण्यासाठी हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या उत्सवात स्थानिक रहिवासी, रेल्वे कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

कार्यक्रमाची सुरुवात सांस्कृतिक सादरीकरणाने झाली, ज्यात स्थानिक कलांचा देखावा घडवण्यात आला. त्यानंतर रेल्वेच्या जुन्या छायाचित्रांचा, वस्त्रांचा आणि इतर ऐतिहासिक वस्तूंचा समावेश असलेली प्रदर्शनी आयोजित करण्यात आली. ज्यामुळे तरुण पिढीत रेल्वे बद्दल आदर निर्माण झाला. स्टेशन मास्टर व वरिष्ठ स्टेशन कर्मचाऱ्यांनी उपस्थितांना संबोधित करताना रेल्वे वारसा जतन करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचा समारोप रेल्वे कर्मचाऱ्यांचा सन्मान सोहळ्याने झाला.

स्टेशन महोत्सव केंद्रीय रेल्वेच्या समुदायाबद्दलच्या बांधिलकीचा आणि भारताच्या रेल्वे वारशाबद्दल कृतज्ञतेचा गौरवपूर्ण उपक्रम ठरला आहे.

# वाडी पोलिसांनी पकडली २२ क्विंटल सुपारी

**नागपूर, क्राईम रिपोर्टर.** वाडी पोलिसांनी गस्तीदरम्यान मिळालेल्या माहितीवरून एक ट्रक पकडला. झडतीमध्ये २२ क्विंटल सुपारी मिळाली. ही सुपारी निकृष्ट दर्जाची असून गैरकायदेशीररित्या खरेदी-विक्री झाली असल्याचा संशय पोलिसांना आहे. पोलिसांनी माल जप्त करून पुढील कार्यवाहीसाठी अन्न व औषधी प्रशासन विभाग (एफडीए)च्या स्वाधिन केला आहे.

बुधवारी दुपारी २ वाजताच्या सुमारास वाडी पोलिसांचे एक पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान मेघराज लेआऊट येथील महाराष्ट्र रोडलाईन्ससमोर यूपी-७७/एएन-३१८२ क्रमांकाचा ट्रक उभा आहे. त्या ट्रकमध्ये निकृष्ट दर्जाची सुपारी असून अवैधरित्या तिची खरेदी-विक्री झाली असल्याची माहिती पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तेथे धाड टाकून ट्रक जप्त केला. ट्रक चालक सतीश रामकुमार यादव रा. कानपूर याला मालाबाबत विचारले असता तो समाधानकारक उत्तर देऊ शकला नाही. पंचासमोर ट्रकची झडती घेतली .

# दाभा महाप्रज्ञा बौध्द विहारात वर्षवास उत्साहात




**महासागर प्रतिनिधी**
**वाडी, दि. ६ :** दाभा येथील न्यु शांतिनगर मधील महाप्रज्ञा बौद्ध विहारात भंते संघकीर्ति महाथेरो यांच्या मार्गदर्शनात वर्षवास उत्साहात पार पडला. यावेळी धम्मसभागृहात महापरित्राण पाठ, बुद्ध पुजा,बुद्ध वंदना, धम्मदेसन, ध्यान साधना, सुत्त पठन आदी कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी भदंत महापंथ महाथेरो, भदंत संघकीर्ति महाथेरो, भदंत धम्मसेन, भदंत शिलरक्षीत, भदंत शिलपंथ,भदंत नागदिपंकर, भदंत शीलवंस यांना धम्मदान ,चिवरदान देण्यात आले. भिक्षु संघ व उपासक ,उपासिका यांना भोजनदान देण्यात आले.संचालन मध्यमा स्वाई यांनी तर आभार मुख्य आयोजक भदंत संघकीर्ति महाथेरो यांनी मानले. यावेळी आमदार समीर मेघे, माजी मंत्री रमेशचंद्र बंग, राष्ट्रवादी काँगेसचे जिल्हाध्यक्ष संतोष नरवाडे, प्राणेश भगत,सुभाष मुन,जोत्सना मुन, माजी नगरसेवक दिनेश कोचे, श्याम मंडपे, आशीष नंदगवळी, फारूक खान, राजकुमार बोरकर, जनार्दन भगत यांच्यासह लाव्हा, सोनबानगर, नवनीत नगर, डॉ.आंबेडकर नगर, टेकडीवाडी, खडगाव, भिवसन खोरी, गिट्टीखदान, कोराडी शेकडो नागरीक उपस्थित होते.

# ३.३९ लाखांची घरफोडी

**महासागर क्राईम रिपोर्टर**
**नागपूर, दि. ६ :** दिवाळीनिमित्त बाहेरगावी गेलेल्या कुटुंबाचे घरफोडून अज्ञात आरोपींनी रोकड व दागिन्यांसह ३ लाख ३९ हजार रुपयांच्या मालावर हातसाफ केला. ही घटना एमआयडीसी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी अजयप्रकाश रामप्रकाश तिवारी (६०) रा. समर्थनगर, हिंगणा रोडच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. गत २६ ऑक्टोबर रोजी अजयप्रकाश घराला कुलूप लावून कुटुंबासह कानपूर येथे गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचा कडीकोंडा तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. घरातील सोन्याचांदीचे दागिने व रोख १९ हजार असा एकूण ३,३९,००० रुपयांचा माल चोरी करून पसार झाला. सोमवारी सायंकाळी तिवारी कुटुंब घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले. अजयप्रकाश यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# विदर्भातील तरुणांना केवळ ४ ते ७ टक्के नोकऱ्या मिळाल्या

## विदर्भवाद्यांनी विचारले २० प्रश्न



**महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ६ :** विदर्भाचा अनुशेष २.५ लाख कोटींवर गेला, सिंचनाचा अनुशेषही दूर झाला नाही आणि विदर्भातील तरुणांना नोकऱ्याही मिळत नाही, मग गेल्या दहा वर्षांत विदर्भासाठी काय केले, असा सवाल विदर्भवादी संघटनांनी केला आहे.

महाविदर्भ जनजागरणचे संयोजक नितीन रोंघे यांनी मंगळवारी पत्रपरिषदेत विदर्भाची समस्या दर्शविणारे २० प्रश्न उपस्थित केले होते. विदर्भातील तरुणांना केवळ ४ ते ७ टक्के नोकऱ्या मिळाल्या, मग नोकऱ्यांसाठी काय केले, राज्यावरील कर्ज ७.४ लाख कोटींहून ८.५ लाख कोटींवर गेले, या कर्जातून विदर्भासाठी किती टक्के खर्च केले ? गेल्या १० वर्षांत विदर्भातील ११ जिल्ह्यांत किती व कोणते उद्योग आणले व रोजगार निर्मिती केली, स्वतंत्र विदर्भ राज्याबाबत काय भूमिका आहे, विदर्भ वैधानिक विकास मंडळाच्या पुनरुज्जीवनासाठी काय उपाय केले, वीज प्रकल्प विदर्भात असताना विदर्भातील सामान्य ग्राहकांना व उद्योगांना कमी पैशात वीज का दिली जात नाही, गाजावाजा केलेल्या मिहान प्रकल्पात किती उद्योग आणले, किती तरुणांना नोकऱ्या दिल्या या प्रश्नांचा यात समावेश आहे. कोराडी येथील प्रस्तावित ऊर्जा प्रकल्प पुण्यात का स्थानांतरित केला जात नाही, तसेच प्रस्तावित रिफायनरी व पेट्रोकेमिकल्स कॉम्प्लेक्स, अमरावती येथील टेक्सटाईल पार्क, विदर्भात किती परकीय गुंतवणूक झाली, पर्यटन विकासाचे काय झाले, शैक्षणिक व आरोग्य सुविधा सुधारण्यासाठी काय केले, वन्यप्राण्यांच्या त्रासामुळे शेतकऱ्यांच्या नुकसानभरपाईसाठी काय उपाय केले, नमो महारोजगार मेळाव्यात किती तरुणांना कुठे नोकऱ्या मिळाल्या, शेतमालाचे भाव आणि नवीन जिल्हे निर्मितीबाबत काय पावले उचलली, असे २० प्रश्नांची उत्तरे भाजप नेत्यांनी द्यावी, अशी मागणी रोंघे यांनी केली.


# महाराष्ट्रातील उद्योगधंदे गुजरातला पाठवणाऱ्या सरकारला घरी पाठवण्याची वेळ आली -खा. डॉ अमोल कोल्हे

## हिंगणा विधानसभा मतदारसंघातील वाडी येथे महाविकास आघाडीची जाहीर प्रचार सभा संपन्न

■ **महासागर प्रतिनिधी**
**हिंगणा, ६ :**
हिंगणा विधानसभेच्या प्रचाराला येताना एक गोष्ट प्रखरतेने जाणवते म्हणजे मी या ठिकाणी निष्ठावंत उमेदवाराच्या प्रचाराला आलो ज्यावेळेस शरदचंद्र पवार साहेबांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फोडल्या गेला त्यावेळेस विदर्भातील जे निष्ठावंत पवार साहेबांसोबत राहिले त्यातील एक नाव म्हणजे रमेशचंद्र बंग. त्यामुळे या हिंगणा विधानसभा क्षेत्रात रमेशचंद्र बंग उमेदवार नसून त्यांच्या रूपाने खुद्द शरदचंद्र पवारच उमेदवार आहेत हे मी जबाबदारीने सांगतो. या महाराष्ट्राचं वाटोळ करणाऱ्या मराठी माणसांचे पक्ष फोडून मराठी अस्मितेला धक्का लावणाऱ्या खोकेबाज गद्दार सरकारला घरी पाठवण्याची हीच योग्य वेळ आहे असे वाडी येथील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार रमेशचंद्र बंग यांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत खासदार तथा सिने अभिनेता डॉ अमोल कोल्हे बोलत होते. पुढे बोलताना अमोल कोल्हे यांनी हिंगणा बुटीबोरी एमआयडीसीतील बंद पडलेले उद्योग लाडक्या बहिणींना महागाईचे चटके कसे पडतात माझा मराठी तरुण कसा बेरोजगार होतो आहे यावरून युती सरकारवर सडेतोड टीका केली आणि महाराष्ट्राच्या राजकारणाचा चिखल करणाऱ्या महाराष्ट्राची भाकरी खाऊन गुजरातची चाकरी करणाऱ्या गद्दार खोकेबाज सरकारला मतदार बंधू भगिनींनी घरी पाठवावं व शरदचंद्र पवार साहेबांचे निष्ठावंत रमेशचंद्र बंग यांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे असे आवाहन केले.



जाहीर सभेला व्यासपीठावर माजी आमदार प्रकाश गजभिये,शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे राज्य कार्यकारिणी सदस्य हर्षल काकडे, जिल्हाध्यक्ष उत्तम कापसे, राष्ट्रवादी काँग्रेस( श प ) पक्षाचे कामगार सेल चे राष्ट्रीय अध्यक्ष शब्बीर विद्रोही,राजाभाऊ टाकसांडे, समाजवादी पार्टी जिल्हाध्यक्ष टी एच खाण, आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे नारायण बागडे, राष्ट्रवादी काँग्रेस(श प)जिल्हाध्यक्ष प्रवीण कुंटे, ईश्वर बाळबुधे, जि प सदस्या ममता धोपटे, युवक काँग्रेसचे अश्विन बैस,भीमराव कडू प्रकाश कोकाटे,वेदप्रकाश आर्या,प्रेम झाडें, राजेश जैस्वाल,संतोष नरवाडे, प्रा सुरेंद्र मोरे, श्याम मंडपे,सुधाकर ढोणे,वसंतराव ईखनकर, दिनेश उईके,योगेश सातपुते,संजय कुंटे,अमित हुसनापुरे,रोशन खाडे, मुकेश ढोमणे,प्रवीण सिंग,वाहिद खाण, अनिल पाटील, शैलेश थोराने, प्रतीक्षाताई पाटील, संतोष केचे, संजय अनासने, मधू मानके, हिम्मत गडेकर, विलास भोंबले,दिलीप दोरखंडे, प्रवीण लिचडे योगेश चरडे, अशोक माने, भीमराव लोखंडे, बेबी ढबाले, प्रमिला पवार, अरुणा पगाडे, ललिता चौबे, सुनंदा ठाकरे, मोहन ठाकरे, शिवराज सिंग चव्हाण, अखिल पोहनकर, रॉबिन शेलारे, महेश चोखांद्रे, दुर्योधन ढोणे यांच्यासह भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्ष, समाजवादी पक्ष, रिपब्लिकन पार्टी (गवई व खरात गट ) आम आदमी पार्टी यांच्यासह महाविकास आघाडी व इंडिया गटबंधनच्या सर्व प्रमुख पदाधिकारी व मोठ्या संख्येने कार्यकर्ते मतदार बंधू-भगिनी तरुण वर्ग सभेला उपस्थित होता. सभेचे सूत्रसंचालन प्रा.सुरेंद्र मोरे यांनी तर मधू मानके पाटील यांनी मानले



# आजपासून नितीन गडकरी यांचे झंझावाती दौरे

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, ६ :**
महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील भाजपा आणि महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री ना. श्री. नितीन गडकरी यांचा झंझावाती दौरा उद्या, नोव्हेंबर पासून सुरू होत आहे.
येत्या नोव्हेंबरपर्यंत महाराष्ट्राच्या विविध भागांत श्री. गडकरी यांच्या तब्बल जाहीरसभा होतील. प्रदेश भाजपने श्री. गडकरी यांच्या प्रचार दौऱ्यास अंतिम स्वरूप दिले असून, त्यांच्या सोबत भाजप आणि महायुतीचे अन्य ज्येष्ठ नेते प्रचारात सहभागी होतील. तसेच १६, १७ आणि १८ नोव्हेंबर २०२४ या काळात अर्थात निवडणूक प्रचाराच्या अंतिम

# पंकज घाटोडे यांच्या नेतृत्वाखाली सावनेर-कळमेश्वर विधानसभा क्षेत्राच्या प्रगतीची नवी लाट

## अपक्ष उमेदवाराची स्वप्नील दृष्टी आणि तरुणांचा ठोस पाठिंबा

■ **महासागर प्रतिनिधी**
**सावनेरकळमेश्वर** विधानसभेच्या निवडणुकीत अपक्ष उमेदवार म्हणून उतरलेले पंकज घाटोडे यांचे नेतृत्व क्षेत्राच्या विकासासाठी एक नवी उमेदवार घेऊन येत आहे. त्यांच्या मते, सावनेर-कळमेश्वरचविकास दिल्ली मॉडेलप्रमाणे होणार आहे, जिथे जनतेच्या गरजांना केंद्रस्थानी ठेवून प्रगतिशील धोरणे राबवली जातील. दिल्ली मॉडेलमधून प्रेरणा घेत, शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा आणि स्थानिक आर्थिक विकासाला प्राधान्य देणारी धोरणे त्यांनी तयार केली आहेत. घाटोडे यांचे विकास मॉडेल हे आधुनिकता, प्रगती आणि स्थिरतेची हमी देणारे असून, त्यामध्ये शेतकरी, तरुण वर्ग आणि उद्योगधंद्यांसाठी अनेक प्रकल्पांचा समावेश आहे. तरुणाईचा उत्स्फूर्त पाठिंबा आणि प्रचंड जनसमर्थन हे त्यांचे खरे सामर्थ्य आहे. उच्चशिक्षित असलेले घाटोडे स्थानिकांमध्ये एक विश्वासार्ह नेतृत्व मानले जातात, ज्यामुळे त्यांच्याकडे एक परिवर्तनकारी नेत्याची ओळख निर्माण झाली आहे.
सामाजिक न्याय, कृषी क्षेत्राचा विकास, रोजगार निर्मिती आणि स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत करण्याची त्यांची दृष्टी सावनेर-कळमेश्वर विधानसभेसाठी एक नवीन आशा निर्माण करत आहे. जनतेला आता असा विश्वास आहे की, येणाऱ्या पाच वर्षांत त्यांच्या नेतृत्वाखाली हा परिसर अधिक विकसित, समृद्ध आणि प्रगत होईल. दिल्लीच्या यशस्वी विकास मॉडेलच्या धर्तीवर सावनेर-कळमेश्वरच्या विकासाला नवा आयाम मिळेल अशी अपेक्षा आहे. पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाऊन, पंकज घाटोडे यांच्याकडे सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी संघर्ष करणारे आणि सावनेर-कळमेश्वरच्या उज्ज्वल भविष्यासाठी काम करणारे एक सक्षम नेतृत्व म्हणून पाहिले जात आहे.

# ७५ पैकी तब्बल २५ वाघ गेल्या एक वर्षात बेपत्तार णथंबोरच्या जंगलात जे घडतेय

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, ६ :**
७५ पैकी तब्बल २५ वाघ गेल्या एक वर्षात बेपत्ता रणथंबोरच्या जंगलात जे घडतेय...
नागपूर : रणथंबोर राष्ट्रीय उद्यानातील वाघांपैकी तब्बल वाघ गेल्या एक वर्षात बेपत्ता झाले आहेत, असे राजस्थानचे मुख्य वन्यजीव रक्षक पवनकुमार उपाध्याय यांनी सांगितले. राजस्थानमधील रणथंबोर येथून वाघ बेपत्ता होण्याची ही पहिलीच घटना नाही, तर यापूर्वीही या राष्ट्रीय उद्यानातून वाघ बेपत्ता झाले आहेत.
एका वर्षात एवढ्या मोठ्या संख्येने वाघ बेपत्ता होण्याची मात्र ही पहिलीच वेळ आहे. यापूर्वी जानेवारी २०१६ ते जानेवारी २०२२ दरम्यान रणथंबोरमधून तेरा वाघ बेपत्ता झाल्याची नोंद झाली होती. दरम्यान, या बेपत्ता झालेल्या वाघांच्या चौकशीसाठी राजस्थानच्या वन्यजीव विभागाने सोमवारी त्रिसदस्यीय समिती स्थापन केली. ही समिती देखरेखीच्या नोंदींचे पुनरावलोकन करेल आणि उद्यान अधिकाऱ्यांकडून त्रुटी आढळल्यास कारवाईची शिफारस करेल. १७ मे २०२४ ते ३० सप्टेंबर २०२४ या कालावधीत न दिसलेल्या वाघांचा शोध घेण्यावर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. यासंदर्भात चार नोव्हेंबरला अधिकृत आदेश काढण्यात आला.
या आदेशात असे म्हटले आहे की, रणथंबोरच्या निरीक्षण मुल्यांकनातून वाघ बेपत्ता झाल्याच्या बातम्या वारंवार समोर येत आहेत. यासंदर्भात रणथंबोर राष्ट्रीय उद्यानाच्या क्षेत्र संचालकांना वारंवार नोटीस पाठवण्यात आल्या. मात्र, त्यानंतरही कोणत्याही लक्षणीय सुधारणांची नोंद करण्यात आलेली नाही. १४ ऑक्टोबर च्या



अहवालानुसार, एक वर्षांहून अधिक काळापासून ११ वाघांचा काहीच ठावठिकाणा नाही. तर इतर चौदा वाघांची स्थितीदेखील सारखीच आहे. त्यामुळे रणथंबोरमधील बेपत्ता वाघांची चौकशी करण्यासाठी चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे, असेदेखील या आदेशात म्हटले आहे. समिती दोन महिन्यात अहवाल सादर करेल. दरम्यान, आम्ही वाघांच्या देखरेखीतील त्रुटी ओळखल्या आहेत आणि आम्हाला त्या दूर करायच्या आहे, असे मुख्य वन्यजीव रक्षक पवनकुमार उपाध्याय म्हणाले. साप्ताहिक निरीक्षण अहवालात वाघांची सापळ्यात नोंद झालेली नाही. तर कॅमेरा ट्रॅपमध्येही काहीही आढळले नाही. उद्यानावरील दबाव कमी करण्याच्या प्रयत्नांमध्ये बफर झोनमधून गावे स्थलांतरित करणे समाविष्ट आहे, परंतु २०१६ मध्ये शेवटचे स्थलांतरण झाल्यामुळे प्रगती मंदावली आहे. वाघांमध्ये तरुण वाघ आणि बछड्यांचा समावेश आहे. उद्यानाचे क्षेत्र ९०० चौरस किलोमीटर असून वाघांनी बाहेर पडू नये म्हणून याठिकाणी अधिकाऱ्यांची धडपड सुरू आहे. भारतीय वन्यजीव संस्थेने २००६ ते २०१४ दरम्यानक केले.

# अल्पसंख्याकांच्या मतांसाठी ठाकरेंनी बाळासाहेबांना काय म्हणाले फडणवीस



अल्पसंख्याकांची मते मिळणार नाहीत, या भीतीने उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणातून बाळासाहेबांना हिंदूहृदयसम्राट म्हणणे बंद केले आहे, अशी टीका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, ६ :**
नागपूर : अल्पसंख्याकांची मते मिळणार नाहीत, या भीतीने उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणातून बाळासाहेबांना हिंदूहृदयसम्राट म्हणणे बंद केले आहे, अशी टीका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.
फडणवीस यांनी मंगळवारी दक्षिण-पश्चिम मतदारसंघात प्रचार मिरवणूक काढली. यावेळी ते प्रसार माध्यमांशी बोलत होते. फडणवीस म्हणाले, मला देखील याचं दुःख आहे. ज्यांना हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे असे म्हणायचे त्यांना केवळ अल्पसंख्याकाची मते मिळावी म्हणून हिंदुरुदय सम्राट नाव लावणे ठाकरे यांनी सोडून दिले आहे. बाळासाहेब ठाकरे आमच्यासाठी आदरणीय आहे. महाविकास आघाडीमध्ये आता हिंदूहृदय सम्राट म्हटले तर आपल्याला अल्पसंख्याकांची मते मिळणार नाही, अशी त्यांना भीती वाटते. त्यामुळे त्यांनी आता जाहीर भाषणातून हिंदूह्दयसम्राट बाळासाहेब ठाकरे म्हणणे बंद केले आहे, असे फडणवीस म्हणाले.
स्वतःवर होणा-याटिकेबाबत ते म्हणाले, माझ्यापासून कोणाला तरी धोका वाटत असेल, ल्यामुळे मला लक्ष्य केले जात आहे. मात्र जनता माझी शक्ती आहे. राज ठाकरे यांनी धनुष्यबाण ही कोणाची प्रॉपर्टी नसल्याची टीका केली आहे. त्यावर बोलताना फडणवीस म्हणाले. कोणत्याही राजकीय पक्षाचे चिन्ह कोणाचीही मालमत्ता नाही. धनुष्यबाण अधिकृतपणे शिंदेंना मिळाले आहे. महाविकास आघाडी हे विभाजित घर आहे. लोकसभा निवडणुकीच्या काळात संविधानाविषयी पसरवलेला भ्रम आता दूर झाला आहे. राहुल गांधी आणि काँग्रेसचे नाटक जनता आता चालू देणार नाही, असेही फडणवीस म्हणाले.
दक्षिण पश्चिम मतदार संघाने मला तीन वेळा निवडून दिले आहे. आजही लोकांचा प्रतिसाद मिळत आहे. माझा मतदार संघा हा माझा परिवार आहे परिवाराचे लोकांचे माझ्यावर प्रेम आहे त्यामुळे ते निश्चित निवडून देतील असेही फडणवीस म्हणाले.
फडणवीस यांनी मंगळवारी दक्षिण-पश्चिम मतदारसंघात प्रचार मिरवणूक काढली. यावेळी ते प्रसार माध्यमांशी बोलत होते.
मतदारसंघात मी कमीत कमी वेळ देऊ शकणार आहे. मात्र जो काही वेळ असेल त्यामध्ये मी लोकांचा आशीर्वाद घेत आहे. माझ्या मतदारसंघातील जनता समजदार आहे. ज्या नेत्याला निवडून देतो तो महाराष्ट्रात भाजपचे नेतृत्व करतो. त्यामुळे ते जनता माझ्यासोबत असल्याचे फडणवीस म्हणाले. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आहे. मी आणि अजित दादा राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून काम करत आहे. आमच सरकार योग्य काम करत आहे.
जनता पुन्हा आम्हाला निवडून देईल असेही ते म्हणाले.

# कॅनडातील हिंदू मंदिरावरील हल्लेखोरांवर कठोर कारवाई न केल्यास कॅनडा सरकारला जागे !



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, ६ :**
कालच कॅनडाच्या ब्रेम्प्टन भागातील हिंदू मंदिरावर सीख फॉर जस्टीस या संघटनेने आणि खलिस्तानवादी कार्यकर्त्यांनी जाणीवपूर्वक हल्ला केला; मात्र या हिंसक हल्लेखोरांवर कठोर कारवाई करण्याऐवजी त्यांनाच पाठिशी घालण्याचा प्रकार कॅनडा सरकारने केला आहे. याचा आम्ही तीव्र शब्दात निषेध करतो. यापूर्वीही कॅनेडामध्ये मंदिरांवर हल्ले झाले आहेत. कॅनडा सरकारने हे सर्व हल्ले रोखण्यासाठी उपाययोजना करून सर्व हल्लेखोरांवर कठोर कारवाई करावी, अशी आमची मागणी आहे. अन्यथा कॅनड सरकारला जागे करण्यासाठी भारतातील त्यांच्या दूतावासासमोर हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या वतीने निषेध आंदोलन करण्यात येईल, अशी चेतावणी हिंदु जनजागृती समितीने दिली आहे. भारतीय उच्चायुक्त हे कॅनडातील मंदिराच्या भेटीसाठी जाणार हे माहिती असतांनाही त्यांच्या आणि मंदिर यांच्या सुरक्षेसाठी वा सदर हल्ला होऊच नये म्हणून कॅनडा सरकार काहीही ठोस कृती केलेली नाही. त्यामुळे या हल्ल्याला कॅनडा सरकारची मुकसंमती होती का ? असा प्रश्न निर्माण होत आहे. खलिस्तानी अतिरेकी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येनंतर कॅनडामध्ये हिंदूंवरील, तसेच मंदिरांवरील हल्ले रोखण्यात कॅनडा सरकार पूर्णपणे अपयशी ठरले आहे. त्यामुळे भारत सरकारने हे सूत्र आंतरराष्ट्रीय स्तरावर मांडून कॅनडा सरकारवर कारवाई करण्यासाठी दबाव निर्माण केला पाहिजे, अशी आमची भारत सरकारकडे मागणी आहे. हल्लेखोर संघटनेचे भारतात जे कोणी पाठिराखे असतील, त्यांच्यावर भारत सरकारने कठोर कारवाई करावी, अशी आमची मागणी आहे.

### थंडीला सुरूवात झाली नसल्याने तिब्बती शरणार्थी स्वेटर मार्केटवर

# याहीवर्षी मंदीचे सावट

■ सुजाता बंडावार
नागपूर, दि. ६ :
1970 पासून नागपूर येथे शरणार्थी तिबेटी हिवाळी हंगामात स्वेटरचे स्टॉल लावत आहेत . पण गेल्या अनेक वर्षांच्या तुलनेत यंदा नोव्हेंबर महिना उजाडला तरी थंडीची सुरूवात झाली नसल्याने तिबेटींचा स्वेटर विक्रीचा व्यवसाय गेल्या वर्षीच्या तुलनेत 25 टक्के तोट्यात आला आहे . तिब्बती शरणार्थी स्वेटर मार्केट असोसिएशनच्या सदस्यांनी याबाबत चिंता व्यक्त केली आहे . याशिवाय अन्यत्रही स्वेटर विक्रेत्यांचा व्यवसाय मंदीत चालू आहे

गणेशपेठ बस स्टँडनजिक नेहमीप्रमाणे यंदाही तिब्बती शरणार्थी स्वेटर मार्केट लावण्यात आले असून जवळपास 70 तिबेटी शरणार्थी परिवार नेहमीप्रमाणे नोव्हेंबर ते जानेवारी असे तीन महिने आपले बस्तान बसवत स्वेटर विक्रीचा व्यवसाय करणार आहेत.

येथे 75 स्टॉल्स लावण्यात आले आहेत. त्यासाठी लागणारा माल दिल्ली, पंजाब, हरियाणा, लुधियाना येथे खरेदी करून नागपुरात विकल्या जातो. लहान मुलांपासून तर वृद्धांपर्यंत तसेच नवयुवक व युवतिंसाठी विविध प्रकारचे डिझायनर असलेले शॉर्ट पॅटर्न स्वेटर, जर्किंग, स्टोल, ओव्हरकोट, तर विविध वर्क असलेल्या शाली व मोफलर, मोजेपासून तर ब्लॅकेट पर्यंत येथे गरम वस्त्र तीनशे ते पंधराशे पर्यंतच्या किमतीत उपलब्ध आहेत.



थंडीसाठी तिबेटी विक्रेते सज्ज असले तरी नोव्हेंबर महिना उजाडला तरी थंडीने मात्र हुलकावणी दिल्याने मार्केटमध्ये भेट दिली असता सर्वत्र शुकशुकाट होता. त्यामुळे स्वेटर विक्रीचा व्यवसाय मागच्या वर्षीच्या तुलनेत 25% ने तोट्यात असल्याची माहिती तिब्बती शरणार्थी स्वेटर मार्केट असोसिएशनच्या सदस्यांनी दिली आहे. त्यामुळे त्यांच्यावर मंदीची अवकळा पसरली आहे. शाकाहारी जिनींग अँड प्रेसिंग सोसायटीने गणेश पेठ बस स्टॅन्ड परिसरातील आपली जागा स्वेटर विक्रीसाठी तिबेटी शरणार्थींना उपलब्ध करून दिली आहे. या जागेचे भाडे एक लाख पंचविस हजार प्रति महिना असून मेंटेनन्स खर्च 15 हजार रुपयांच्या घरात आहे. ही रक्कम या 75 स्टॉल्स वरील विक्रेत्यांकडून वसूल केली जाते.

तिबेटवर चीनने आक्रमण केल्यानंतर 1959 मध्ये एकंदर दीड लाखाच्या घरात हे तिबेटी परिवारासह भारतातील दक्षिण भारत, ओरिसा, छत्तीसगड, महाराष्ट्र येथील गोंदिया जिल्हा, कर्नाटक येथे स्थिरावले. 1967 पासून त्यांनी स्वेटर विक्रीचा व्यवसाय सुरू केला असून 1970 पासून पिढ्यान पिढ्या पारंपारिक पद्धतीने नागपुरात ते हा व्यवसाय करीत आहे.

हिवाळा हंगाम संपल्यानंतर ते भारत सरकारने लीजवर दिलेल्या जमिनीवर शेती हा व्यवसाय करतात. आगामी दिवसात थंडी या विक्रेत्यांवर प्रसन्न झाली तर त्यांचा व्यवसाय जोम धरेल व ग्राहकांनाही थंडीमध्ये तऱ्हेतऱ्हेचे गरम वस्त्र घालून मिरवता येईल.

## माहेश्वरी सभा नागपूरच्यावतिने सप्तरंगी दिवाळी स्नेहसंमेलन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :
नगर माहेश्वरी सभा नागपूरच्या सप्तरंगी दीपावली स्नेह स्पर्शचा भव्य कार्यक्रम शुक्रवार, ८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजतापासून सतवचन लॉन, भंडारा रोड, नागपूर येथे आयोजित करण्यात आला आहे.

यासंदर्भात माहिती देताना कार्यक्रमाचे प्रभारी निलेश राठी, मुख्य संयोजक शरद टावरी यांनी सांगितले की, कार्यक्रमाला सात रंगीत कार्यक्रमाची रंगत देण्यात आली असून त्यात संजीव राधा कृष्णाचे आगमन, अन्नकूट तबला दर्शन, कुंज बिहारीलाल यांची संगीतमय आरती, राजस्थानी फॅशन शोमध्ये राहा, सामाजिक संदेश देणारी लघु नृत्य नाटिका, स्फोटक लाइव्ह ड्रम शो, बॉलीवूड म्युझिकल ऑर्केस्ट्रा, फटाके शो आणि प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर समाजासाठी आकर्षक पुरस्कारांची रंगीत व्यवस्था करण्यात आली आहे.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून इंदूर निवासी सुप्रसिद्ध लेखक, प्रशिक्षक, प्रेरक वक्ते, आर्थिक व जीवन व्यवस्थापन तज्ञ, चार्टर्ड अकाउंटंट जयंत गुप्ता (माहेश्वरी) उपस्थित राहतील, असे संघटनेचे सचिव गिरधर चांडक यांनी सांगितले.

मुख्य संयोजक शरद टावरी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाला भव्यदिव्य करण्याची जबाबदारी निलेश राठी, संयोजक सविता मुंधरा यांच्यासह सर्व झोन अध्यक्ष, सचिव, झोन निमंत्रक, नगर माहेश्वरी महिला समितीचे किशोर भैय्या व माहेश्वरी युथ क्लबचे जितेंद्र माहेश्वरी, हेमंत भट्टड, सीए अजय राठी, रमाकांत कलंत्री, कुरिया नीरज लखोटिया पार पाडत आहेत. नगर माहेश्वरी सभा नागपूर अध्यक्ष कमल तापडिया, सचिव गिरधर चांडक, नगर माहेश्वरी महिला समिती अध्यक्ष नीता सारडा, सचिव ज्योती मंत्री आणि सर्व झोन अध्यक्ष, सचिव महेश एम बजाज, आनंद राठी, ओमप्रकाश बंग, नंद किशोर यांचा समावेश आहे.

सर्व समाज बांधवांनी सहकुटूंब सप्तरंगी दिवाळी स्नेह स्पर्शला उपस्थित राहावे असे आवाहन काबरा, डॉ. जगमोहन राठी, पवन बजाज, प्रकाश हेडा, सीए रुपेश पनपालिया, हरीश राठी, आनंद डागा, प्रकाश पनपालिया, अजय नबिरा आदिंनी केली आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कृष्णा राठी, विजय पनपलिया, सुरेश गांधी, सतीश लखोटिया, सोमप्रकाश मंत्री, सीए नितीन सारडा, विनोद चांडक या नगर सभेचे पदाधिकारी यांचे विशेष सहकार्य लाभत असल्याचे नगर माहेश्वरी सभेचे प्रचार मंत्री विनोद चांडक यांनी सांगितले.

## ५.७९ लाखांच्या मालावर डल्ला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :
नातेवाईकाच्या लग्नासाठी बाहेरगावी जाणे एका कुटुंबाला चांगलेच महागात पडले. या दरम्यान चोरांनी घरफोडी करून रोकड व दागिन्यांसह ५ लाख ७९ हजार रुपयांच्या मालावर डल्ला मारला. ही घटना यशोधरानगर पोलिस ठाण्यांतर्गत घडली.

पोलिसांनी हरीश रफीक अकबानी (२६) रा. नामदेवनगरच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपींवर गुन्हा नोंदविला आहे. ३ नोव्हेंबर रोजी हरीश हे कुटुंबासह घराला कुलूप लावून लग्नानिमित्त नातेवाईकाकडे कारंजा लाड येथे गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपींनी मुख्य दाराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. दोन कपाटांतून सोन्याचे दागिने व रोख १५ हजार असा एकूण ५,७९,००० रुपयांचा माल चोरी करून पसार झाले. अकबानी कुटुंब घरी परतले असता चोरी झाल्याचे उघडकीस आले. हरीश यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरांची फुटेज तपासण्यात येत आहे.

## सर्च आणि लोक बिरादरी प्रकल्पाला सनराईज फाउंडेशनची भेट

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :
येथील सनराईज फाऊंडेशन या संघटनेच्यावतिने गडचिरोली जिल्ह्यातील सर्च आणि लोकबिरादरी या सेवाभावी प्रकल्पांना भेट देण्यात आली .

मानव सेवा हीच ईश्वर सेवाः या ब्रीदवाक्याला संपूर्णपणे वाहून घेतलेल मानवी सेवेचे दोन महान पुजारी आणि त्यांचे कार्य प्रत्यक्षात अनुभवायला मिळाल्याचे फाऊंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले . सुरुवातीला सर्च फाउंडेशन ला भेट दिली असता शिस्त, स्वच्छता, निःशुल्क मोफत उपचार, वैद्यकीय सोयीसुविधा वाखाण्याजोग्या आहेत. डॉ. अभय बंग त्यांच्या कामातील अति व्यस्ततेमुळे त्यांच्यासोबत प्रत्यक्ष भेट होऊ शकली नाही. परंतु, डॉ.राणी बंग यांची भेट झाली. प्रकल्पाविषयी त्यांनी माहिती दिली.

पुढे, भामरागड तालुक्यातील लोक बिरादरी प्रकल्पाला फाऊंडेशनच्या सदस्यांनी भेट दिली . आदिवासी मुलांसाठी मोफत वसतिगृह, शाळा, व्यायाम शाळा आणि मोफत दवाखाना आदिंना भेटी देण्यात आल्या. नंतर डॉ. प्रकाश आमटे आणि त्यांच्या सहचारीणी डॉ. मंदाकिनी प्रकाश आमटे यांची भेट झाली . त्यांनीच त्यांच्या कार्याबद्दल माहिती दिली. सुरुवातीला बाबा आमटे यांनी 1972 ला या ठिकाणी भेट दिली होती. त्यानंतर आम्ही 1973 पासून या कायार्ला स्वतःला संपूर्ण वाहून घेतलं. तेव्हापासून बाबांचे कार्य मी, माझी मुलं डॉ. अनिकेत आमटे, डॉ. दिगंत आमटे आणि त्यांची मुलं म्हणजे माझे नातू हे मानवी सेवेचा अखंड व्रत समर्थपणे पेलवीत, सांभाळत आहोत, असे आमटे दाम्पत्याने सांगितले.




फाऊंडेशनच्यावतिने डॉ. रश्मी कावडे, सेवानिवृत्त मुख्याध्यापिका रेखा कावडे, कॉन्ट्रॅक्टर जयेश कावडे, सनराइज फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शत्रुघ्न वैद्य शिक्षक व उपाध्यक्ष हर्षा वैद्य, दिव्यांनी जयेश कावडे, प्रणित भाऊ, श्रेयस कावडे आणि इतर पदाधिकारी या भेट प्रसंगी उपस्थित होते.

## तीन दिवसीय आध्यात्मिक योग सत्संग

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :
योगाचार्य सद्गुरुदेव डॉ. दासलाल महाराज, श्री सिद्ध गुफा सवाधाम यांच्या योगिक आश्रयाखाली श्री हनुमान मंदिर सांस्कृतिक भवन, अंचाबाई धर्मशाळा, आझाद चौक सदर, नागपूर येथे ८ ते १० नोव्हेंबर या कालावधीत तीन दिवसीय आध्यात्मिक योग सत्संगाचे आयोजन करण्यात आले आहे.



सकाळी ५ ते रात्री ९ या वेळेत होणाऱ्या योगाभ्यास, आरती, जीवनतत्त्व साधने आणि योगासने व उपक्रमांबाबत विनामूल्य प्रवेश असेल. कार्यक्रमात सहभागी होणाऱ्यांसाठी आयोजक भोग प्रसादाची व्यवस्था करतील. योग- योगेश्वर रामलाल महाराज आणि अनंत बिभूषिचचंद्र मोहन महाराज यांच्या अपार कृपेने, सिद्ध योग साधक योगमंडळ नागपूर आयोजित या तीन दिवसीय कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी देशभरातून सद्गुरू दसलाल जी महाराजांचे अनुयायी नागपुरात पोहोचणार आहेत. योग शिकू इच्छिणाऱ्या नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या माहितीसाठी 9823666950, 9834932257 आणि 3423078112 या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. लोककल्याणासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात प्रवेशासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

## प्रबोधनकार ठाकरे समाज प्रबोधन पुरस्कार डॉ. मिलिंद बोकील यांना जाहीर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :
महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक चळवळीचा उज्वल इतिहास साऱ्या देशाला परिचित आहे. तसेच सामाजिक व सांस्कृतिक चळवळीचा एक अभुतपुर्व असा वारसा महाराष्ट्राला लागला आहे



वारकरी संप्रदायापासून तर संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व इतर अनेक संतांनी देखील सामाजिक जागरणाचे काम अतिशय निष्ठेने केल्याची उदाहरणे आहेत. सांस्कृतिक व सामाजिक परिवर्तनासाठी महाराष्ट्रातील अनेक मान्यवरांचा नामोल्लेख करता येईल. या परंपरेत प्रबोधनकार ठाकरे यांचे नाव अभिमानाने घेता येईल.

प्रबोधनकार ठाकरे यांनी त्या कालखंडात जे सामाजिक परिवर्तनाचे कार्य केले, त्या कार्याच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मारवाडी फाऊंडेशनच्या वतीने समाज प्रबोधन करणाऱ्या माननीय व्यक्तिला १ लाख रुपये रोख व मानचिन्ह देण्यात येते.

२०२४ या वर्षीचा स्व. प्रबोधनकार ठाकरे समाज पबोधन पुरस्कार पुणे देखील समाजशास्त्राचे अभ्यासक व लेखक डॉ. मिलिंद बोकील यांना देण्यात येणार आहे जयप्रकाश नारायण यांच्या संपूर्ण क्रांती चळवळीतून सामाजिक कार्याला त्यांची सुरूवात झाली. कोकण व पश्चिम महाराष्ट्रातील आदिवासी भागात आदिवासींच्या विकासविषयक प्रश्नांच्या संदर्भात त्यांचा सखोल अभ्यास असून, ग्रारमिण महाराष्ट्रातील शेती, दुष्काळ, पाणी अभ्यास व त्यावर अनेक संशोधन प्रकल्प पूर्ण केलेत. त्यांच्या या अभ्यासावरील अनेक पुस्तके प्रकाशित आलेली आहेत.

आतापर्यंत हा पुरस्कार स्व. डॉ. भा. ल. भोळे, पन्नालाल सुराणा, बाबा आढाव, डॉ. आ. ह. साळुंखे, प्रा. एन. डी. पाटील, रामकृष्णदादा बेलुरकर, शरद जोशी, डॉ. सदानंद मोरे, ॲड. मा. ग. गडकरी, गिरीश कुबेर, सत्यपाल महाराज, डॉ. मोहम्मद शरफुद्दीन साहिल, विजयकुमार चोप्रा या मान्यवरांना देऊन गौरविण्यात आले आहे.

हा पुरस्कार प्रदान समारंभ २० नोव्हेंबरला प्रबोधनकार ठाकरे यांच्या स्मृतिदिनी आयोजित करण्यात येतो. परंतु, यावर्षी या दिवशी मतदान असल्यामुळे पुरस्कार वितरणाची तारीख नंतर जाहीर करण्यात येईल, असे वनराईच्यावतिने पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

## ठाण्याच्या लॉकअपमधून पळाला आरोपी — बैतूलमधून अटक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :
एक आरोपी अजनी ठाण्याच्या लॉकअपमधून पळाला. ही घटना पुढे येताच पोलिस विभागात खळबळ उडाली. तत्काळ पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आणि बैतूल येथून त्याच्या मुसक्या आवळल्या. इरफान समशाद अंसारी (२०) रा. अंबेनगर, पारडी असे आरोपीचे नाव आहे.

इरफान गत ४ वर्षांपासून गुन्हेगारीत सक्रीय आहे. त्याच्याविरुद्ध चोरी, लुटपाट, लैंगिक अत्याचार आणि घरफोडीसह ८ गंभीर गुन्हे दाखल आहेत. नवरात्रीच्या वेळी त्याने जादू महलजवळील दुर्गा मंडपात असलेली दानपेटी फोडून रोकड चोरी केली होती. जवळपास दीड महिन्यापूर्वी त्याच्याविरुद्ध सक्करदरा ठाण्यात लैंगिक अत्याचार आणि पोक्सो ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. या प्रकरणात सक्करदरा पोलिसांनी त्याला अटक केली होती. सध्या तो न्यायालयीन कोठडीमध्ये कारागृहाची हवा खात होता.

कोर्टातून प्रोडक्शन वॉरंट घेत अजनी पोलिसांनी त्याला मंगळवारी ताब्यात घेतले. तो ठाण्याच्या लॉकअपमध्ये बंद होता. लॉकअपच्या सुरक्षेसाठी तैनात कर्मचारी पहाटे ५ वाजताच्या सुमारास लघुशंका करण्यासाठी गेला. ही संधी साधून इरफान लॉकअपच्या सळाखी आणि भिंतीमध्ये असलेल्या फटीतून बाहेर आला आणि पसार झाला. तत्काळ वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देण्यात आली.

इरफानशी योजनाबद्धरित्या संपर्क करण्यात आला. तो इटारसी स्थानकाच्या आऊटरवर रेल्वेतून खाली उतरला. बागमती एक्स्प्रेसमध्ये बसून नागपूरला परत येत होता. पोलिस निरीक्षक राजकुमार यांनी आरीपएफशी संपर्क केला आणि त्याला बैतूल स्थानकावर अटक करण्यात आली.

**प्रेयसीच्या घरी जाऊन बदलले कपडे**
ठाणेदार नितीनचंद्र राजकुमारही पोलिस ठाण्यात पोहोचले. इरफानच्या कुटुंबीयांची चौकशी करण्यात आली. तो त्याच्या प्रेयसीला भेटायला गेला होता. तेथे त्याने कपडे बदलले आणि निघून गेल्याची माहिती मिळाली. तो रेल्वेने पळणार असल्याची माहिती मिळताच एक पथक रेल्वे स्थानकावर पोहोचले. इरफान संघमित्रा एक्स्प्रेसमध्ये बसला. सहप्रवाशांच्या फोनने त्याने परिचितांना कॉल केला होता.

सांगण्यात येते की, ठाण्यातील लॉकअपच्या सळाखी आणि भिंतीमध्ये मोठी फट आहे. ती फट बूजविण्यासाठी अजनी पोलिसांनी पीडब्ल्यूडीला पत्रही लिहिले होते. ती फट भरण्याचे कामही सुरू झाले. मात्र मध्येच दिवाळी आल्याने काम थांबले.

## महावितरणचे वाहन पुरवठादार आंदोलनाच्या पवित्र्यात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :
पेट्रोल, डिझेलसह सर्वच इंधनाचे दर वाढल्यावरही महावितरण मागील चार वर्षांपासून भाड्याने घेत असलेल्या वाहनांचे दर वाढवत नाही, असा आरोप करीत या पुरवठादारांनी निवडणुकीच्या तोंडावर आंदोलनाचा इशारा दिला आहे. हे आंदोलन झाल्यास राज्यातील वीज यंत्रणा विस्कळीत होण्याचा धोका आहे.

राज्यातील मुंबईचा काही भाग वगळता बहुतांश भागात महावितरणकडून वीज पुरवठा केला जातो. महावितरणकडून ग्राहकांना अखंडित वीज पुरवठ्यासाठी अधिकारी- कर्मचाऱ्यांना गस्त घालणे व देखभाल दुरूस्तीसाठी पुरवठादारांकडून भाड्याने वाहने घेत असते. या पुवठादारांच्या माहितीनुसार, राज्यभरातील अधिकाऱ्यांसाठी महावितरण पुरवठादारांकडून टॅक्सी तर वीज यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीसाठी लागणारे टॉवर लॅडर व इतर वाहने भाड्याने घेत असते.

दरम्यान मागील काही वर्षांपासून सतत वाढते इंधन दर, कामगारांच्या वेतनानुसार या पुरवढादारांच्या वाहन भाड्याच्या दरात महावितरणकडून वेळोवेळी वाढ अपेक्षित आहे. परंतु, २७ फेब्रुवारी २०२० नंतर दरात वाढच झाली नाही. महापारेषणकडून मात्र २०२१ मध्ये भाड्याने घेतलेल्या वाहनाच्या दरात सुधारणा करण्यात आली. त्यामुळे महावितरणच्या तुलनेत महापारेषणमध्ये पुरवठादारांना किमान तोटा होत नाही.

> महावितरणला वारंवार दर वाढवण्याची विनंती केल्यावरही दर वाढत नाही. आताही दर न वाढवल्यास नाईलाजाने आम्हाला आंदोलन करावे लागेल.
> **योगेश गोमासे, सचिव**
> नवचेतना टॅक्सी चालक- मालक संघटना, नागपूर.

> निवडणूक राष्ट्रीय कर्तव्य असल्याने पुरवठादारांनी तूर्तास संयम ठेवावा. वाहन भाडेवाढीचा प्रस्ताव त्यांनी दिला असेल तर वरिष्ठ पातळीवर निश्चितच योग्य कार्यवाही होईल.
> **भारत पवार**
> मुख्य जनसंपर्क अधिकारी, महावितरण, नागपूर.

वीज यंत्रणेच्या दुरुस्तीसह इतर कामासाठी सध्या अधिकाऱ्यांसाठी सुमारे ७०० टॅक्सी तर ७०० टॉवर लॅडर महावितरणच्या वापरात आहेत. या सगळ्या वाहनांवरील चालक आणि पुरवठादार असे मिळून सुमारे तीन हजार कुटुंबाचा उदरनिर्वाह या वाहनांमुळे चालतो. ते सर्वच आर्थिक संकटात आहेत. त्यामुळे महावितरणने दरवाढ न केल्यास तीव्र आंदोलन करू, असा इशारा पुरवठादारांकडून देण्यात आला आहे.

वर्ग एकच्या अधिकाऱ्यांसाठी २४ तास भाड्याच्या वाहनाकरितासाठी महिन्याला ३५ हजार ७०० रुपये, वर्ग दोनच्या अधिकाऱ्यांसाठी २९ हजार ९०० रुपये, टॉवर लॅडरसाठी ३३ हजार ५०० रुपये, असे दर महावितरणकडून ठरवण्यात आले आहेत. दुसरीकडे महापारेषणमध्ये मात्र वर्ग एकच्या अधिकाऱ्यासाठी महिन्याला ६० हजार रुपये तर वर्ग दोनच्या अधिकाऱ्यासाठी ५० हजार रुपये भाडे दिले जाते.

## सर्वच बसस्थानकावर प्रवाशांची तोबा गर्दी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :
दिवाळीच्या सुट्या संपवून पाहुणेमंडळी गावाकडे परत निघाल्याने नागपूरसह जिल्ह्यातील सर्वच बसस्थानकांवर प्रवाशांची तोबा गर्दी पाहायला मिळत आहे . नागपूर येथील गणेशपेठ मध्यवर्ती बसस्थानकावर हजारोंच्या संख्येने प्रवासी दिसत असून, त्यात महिलांची संख्या लक्षणीय आहे.

दिवाळीनिमित्त गावाकडे गेलेले नागरिक तसेच पाहुणेमंडळी आता परतीच्या प्रवासाला निघाले आहेत. येथून सुटणाऱ्या सर्वच बसेस फुल्ल भरल्याचे दिसून येते.

# ॲग्रोव्हिजन राष्ट्रीय कृषी प्रदर्शनीची तयारी आरंभ

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :
दाभा, नागपूर येथे होणाऱ्या १५व्या ॲग्रोव्हिजन राष्ट्रीय कृषी प्रदर्शन, कार्यशाळा आणि परिषदेचा भूमीपूजन समारंभ मंगळवारी आयोजित करण्यात आला होता. गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांच्या हस्ते हा समारंभ पार पडला. या प्रदर्शनासाठी स्टॉल्स आणि वर्कशॉप हॉलच्या बांधकामाला भूमिपूजन समारंभाने अधिकृतपणे सुरुवात झाली.

या प्रदर्शनासाठी, अंदाजे 11,000 चौरस मीटरचे हँगर्स आणि 6,000 चौरस मीटरचे खुले मैदान स्टॉल उभारले जातील, ज्यामध्ये कार्यशाळेसाठी चार हॉल नियुक्त केले जातील. मागील ॲग्रोव्हिजन इव्हेंटला शेतकरी आणि कृषी-संबंधित उपस्थितांचा सहभाग लाभला. यावर्षी 15 व्या ॲग्रोव्हिजनसाठी असाच उत्साह अपेक्षित आहे, 300 हून अधिक कंपन्यांनी सहभाग निश्चित केल्याचे ॲग्रोव्हिजनचे संघटक सचिव रवी बोरटकर यांनी सांगितले.




भारतातील कृषी उत्पादनांचे उत्पादन करणाऱ्या अनेक नामवंत कंपन्या, संशोधन संस्था, सरकारी विभाग, विविध राज्ये आणि कृषी विद्यापीठे या प्रदर्शनात त्यांचे तंत्रज्ञान सादर करतील. याशिवाय देशातील प्रगत कृषी तंत्रज्ञान, संशोधन आणि सेवा क्षेत्रातील आघाडीच्या संस्थाही यात सहभागी होतील.

यावर्षी युपीएल डब्ल्युएक्सई ॲग्राव्हिजनसाठी इव्हेंट प्रायोजक आहे, ज्यामध्ये टॅफे, कुबोटा, महिंद्रा, सोनालिका, जॉन डियर ट्रॅक्टर्स, अंकुर सीड्स, अजित सीड्स, महाबीज, रासी सीड्स, महिको सीड्स सारख्या बियाणे कंपन्या आणि इतर ट्रॅक्टर कंपन्यांचा सहभाग आहे. बीकेटी टायर्स, आयटीसी, धानुका, क्रिस्टल क्रॉप केअर, सल्फर मिल्स, पारिजात इंडस्ट्रीज, टाटा ॲग्रीको, प्लास्टो, जैन इरिगेशन, थानोस, तसेच सौर क्षेत्रातील कंपन्या, नाबार्ड, बँकिंग संस्था आणि नामवंत शैक्षणिक संस्थांनीही त्यांच्या सहभागाची पुष्टी केली आहे.

मागील वर्षांप्रमाणेच, या वर्षीच्या ॲग्रोव्हिजनमध्ये एमएसएमईसाठी खास पॅव्हेलियन असेल, ज्यामध्ये सवलतीच्या दरात स्टॉल उपलब्ध असतील. टरटए व्यवसायांना 12 नोव्हेंबरपूर्वी स्टॉल बुक करून या संधीचा लाभ घेण्यास प्रोत्साहित केले जाते.

15 व्या ॲग्रोव्हिजनमध्ये शेतकऱ्यांसाठी 30 विषयांवर कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत. ऊस उत्पादन, शेतकरी-उत्पादक संघटना , तरुणांना शेतीतील संधी, विदर्भातील दुग्धव्यवसायाची व्याप्ती आणि महिला बचत गट या विषयांवर विशेष दीर्घ कालावधीच्या कार्यशाळा आयोजित केल्या जातील.

मध्य भारतातील सर्वात मोठे कृषी शिखर म्हणून ओळखले जाणारे, 15 वे बॅग्रोव्हिजन 22 ते 25 नोव्हेंबर 2024 या कालावधीत होणार आहे. सहभागी होण्यासाठी ॲग्रोव्हिजन सचिवालय, गोविंद अपार्टमेंट, शंकर नगर, नागपूर येथे संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.

कार्यक्रमाला ॲग्रोव्हिजन सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. सी. डी. मायी यांच्यासह गिरीश गांधी, संयोजक डॉ. रवी बोरटकर, संघटन सचिव; सीसीआरआयचे संचालक डॉ. डी के घोष; डॉ.एन. जी.पाटील; सीआयसीआरचे डॉ.जी. टी. बेहेरे; डॉ. के. पांडियन; ॲग्रोव्हिजनचे सदस्य शिरीष भगत, मिलिंद टिककुले, प्रशांत कुकडे, कॅप्टन एल. बी. कलंत्री, प्रवीण भालेराव, डॉ. हितेंद्र सिंग, प्रशांत वासाडे, डॉ. सुनील सहतपुरे, डॉ. के. डी. ठाकूर, डॉ. विलास आतकरे. कृषी महाविद्यालयाचे डॉ. प्रकाश कडू, डॉ. विजय इलोरकर, डॉ. व्ही.एस.खवळे, डॉ. राहुल वडसाकर, माफसूचे डॉ. नितीन कुरकुरे, आनंदबाबू कदम यांची उपस्थिती होती.